# माणूस

शनिवार
२५ जानेवारी ७५
एक रुपया



# अेक वैशिष्टयपूर्ण बँक !


(आमची बँक ही एक वैशिष्टपूर्ण बँक आहे ती विकास बँक म्हणून कार्य करते.)
समाजातील सर्व घटकांच्या सतुलित विकासासाठी ती प्रयत्नशील आहे.

| | |
|---|---|
| भाडवल व निधी | : रु. २५ कोटी |
| अेकूण ठेवी | : रु १२८ कोटी |
| अेकूण कर्ज | : रु. १६५ कोटी |
| खेळते भाडवल | : रु. २३२ कोटी |

शाखा . मुबईत २५ आणि नागपुरात ६

## दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि.

९, बेकहाऊस लेन, फोर्ट, मुंबई-१



# ‘जेव्हा आपण’—

जेव्हा
आपण खात होतो
समाजवादी बिर्याणी,
सस्त्या क्रांतीची भजी,

आणि
पीत होतो वर
बकरीचं दूध
आपल्याच आईच म्हणून.

जेव्हा
आपण घुमवीत होतो
कबुतरं
दुसऱ्याच्या आकाशांत

आणि
बाटीत होतो
रंडकी भुई
दुसऱ्याचीच तिसऱ्याला.

जेव्हा
आपण चघळीत होतो
शुचितेची व्हिटॅमीन्स

आणि
खात होतो
तटस्थतेचा हुरडा
बहारदार.

जेव्हा
आपण वाजवीत होतो
टिनपाट रेकॉर्ड
आपल्याच शब्दांची

आणि
जागो जागी
मोडता मोडता
संभाळीत होतो शुभ्रता
परीट घडी कपड्यांची.

जेव्हा
आपल्या डोईवर
केसांची वस्ती होती

आणि
विचारांची वादळं
नजरेपार होत होती.

जेव्हा
आपली व्हिएतनामी पोरं
रस्त्यावर रडत होती

आणि
कुत्रीं सुद्धा आपल्याला
धूप घालून
भीत नव्हती.

तेव्हा
आपला ओला बाप
सुकत होता
आंतड्यांतून

तेव्हा
आपल्या बुबुळांखाली
माती पण
गेली थिजून

जेव्हा
आपली बायकापोरं
रस्त्यांवर
झोपत होती

आणि
झोपड्यांची वीणपण
कुत्र्यांगत वाढत होती.

जेव्हा
रस्त्यावर बसून सुद्धा
आपल्या आया–बहिणींना
हगायची शरम होती

आणि
माणसं पण
पैसे खाउन
थोडी कामं करीत होती.

जेव्हा
दुष्काळाचे झेंडे मिरवीत
नवीन वर्ष
येत नव्हती

आणि
पेरल्यावर पिकण्या येवढी
भुईपण
स्वस्त होती

जेव्हा
कालची पोरं सुद्धा
विदूषक म्हणून
हंसत होती


आणि
परवाची खंदी नाणी
बद्द बद्द
वाजत होती.

जेव्हा
आपली सारी तत्त्वं
विधवा होऊन
हिंडत होती,

तेव्हा
तुझी बायको
कॅन्सरनं
झडत होती.

तेव्हाच
मौनाची
ओली लाकडं
छातीमध्ये
धुमसत होती !
रक्तामध्ये
धुमसत होती ! !

—अशोक प्रभाकर डांगे



महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालय द्वारा

# सा प्ता हि क मा णू स

| | | | |
|---|---|---|---|
| संपादक | साहाय्यक | शनिवार | वर्ष : चौदावे |
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर | २५ जानेवारी | अंक : पस्तिसावा |
| | सौ. निर्मला पुरंदरे | १९७५ | किंमत : एक रुपया |


# हे वारे शिडात भरले जायला हवे असतील तर !

जयप्रकाशांनी निवडणुकीचे आव्हान स्वीकारलेले असले तरी त्यानी गेली दहा बारा वर्षे चालविलेले भूदान–ग्रामदानाचे कार्य अगदी सोडून द्यायला नको आहे. हा दोर जर त्यांनी तोडला तर त्यांचा संपूर्ण क्रांतीचा पतंग हवेत कुठेतरी भरकटत जाण्याचा खूप धोका आहे. खरी गरज आहे या दोन्ही कार्यक्रमांची व्यवस्थित सांगड घालण्याची, दोन्ही आघाड्यांवर संघर्ष व रचना चालू ठेवण्याची. भूदान–ग्रामदान निस्तेज झाले कारण त्याला राजकारणाची, प्रस्थापित हितसंबंधांशी झगडण्याची जोड देण्यात आली नाही. आपले गेल्या पंचवीस-तीस वर्षातले राजकारण पोकळ व उथळ झाले, कारण भूदान–ग्रामदानासारखा एखादा मूलभूत आणि समाज आणि व्यक्ती यांच्या अंतर्बाह्य परिवर्तनाचा कार्यक्रम या राजकारणाच्या मुळाशी नव्हता. भूदान–ग्रामदान हे नित्याचे कार्य आहे. राजकारण, संघर्ष ही नैमित्यिक, स्थळ-काळ-वेळ पाहून करावयाची कामे आहेत. ही दोन्ही साधावी लागतात, एक सोडून दुसरे उभे राहात नाही, टिकत नाही. भूदान–ग्रामदान हे गांधीजींच्या चरख्याचे विकसित रूप आहे. जमीनवाटपाच्या आणि ग्रामीण पुनर्रचनेच्या आपल्या मूलभूत व कळीच्या प्रश्नालाच या आंदोलनाने स्पर्श केला होता. पण दुर्दैवाने हा फक्त पुसटता, प्रथमस्पर्श राहिला. भिडायची तयारी न ठेवल्यामुळे या स्पर्शातून वणवा पेटला नाही, शांततामय क्रांतीची प्रक्रियाही चालू राहिली नाही. बिहारमध्ये तर असे भिडायला हवेच होते, अजूनही हवे आहे; स्पर्शाचे एखाद्या धडक मोहिमेत तेथे रूपांतर व्हायला हवे. कारण मोठमोठ्या जमीनदाऱ्या अद्याप बिहारमध्येच टिकून आहेत. तेथील सगळेच पक्षोपपक्ष जमीनदारांचे हितसंबंध सुरक्षित ठेवणारे पक्ष आहेत. अगदी डावेही याला अपवाद नाहीत ! म्हणून भूदान-ग्रामदानाचा एखादा क्रांतिकारक आविष्कार वास्तविक बिहारमध्ये प्रकट व्हायला हवा. पण तसे अद्याप तरी घडलेले नाही. उलट विनोबांचेच बिहारमध्ये वॉटर्लू झाले. हे चित्र जयप्रकाश बदलू शकले तर ती खरी संपूर्ण क्रांतीची सुरुवात ठरेल. नाहीतर ' उजाडले पण सूर्य कुठे ' अशी अवस्था होईल; वातावरण तापेल, नवे वारे वाहतील, हे वारे गरिबी हटावच्या वाऱ्यांपेक्षा नक्कीच चांगले व आरोग्यदायी असतील, नव्हे आहेतही. पण हे वारे शिडात भरले जायला हवे असतील तर पुनर्रचनेचा ठोस कार्यक्रम हाती घ्यायला हवा. हा कार्यक्रम राबवणारी यंत्रणा तयार हवी. निदान त्या दृष्टीने आतापासूनच पावले पडायला हवीत. महाराष्ट्रातून काही तरुण बिहारमध्ये कामासाठी जात आहेत अशी वार्ता आहे. निदान या तरुणांनी तरी हा खोल आशय जयप्रकाशांच्या आंदोलनात ओतण्याचा कसून प्रयत्न करायला हवा. नाहीतर निवडणुका जिंकल्या तरी संपूर्ण क्रांती पराभूत होईल. आणि हा पराभव पचवणे मग ' भारतातील ' लोकशाहीला फार जड जाईल.

होय, भारतातीलच म्हटले पाहिजे. कारण ' भारतीय ' लोकशाहीचा आधुनिक आविष्कार अद्याप प्रकट व्हायचा आहे. जयप्रकाशांचे आंदोलन ही या प्रकटीकरणाचीच एक नांदी आहे. □

मुक्काम मुंबई

# गोदी कामगार चिडला

भारतकुमार राऊत

१६ जानेवारी, गुरुवार. नेहमीच्या वेळेला सूर्य उगवला. सूर्याबरोबरच इतर सगळं जगही जागं झालं. आपापल्या कामाला लागलं. जागी झाली नाही ती मुंबईची गोदी. कोंबड्याच्या आरवण्याआधी सुरू होणारे क्रेन्सचे खटा्र् खट्ट आवाज आज पहाटेच्या थंडीत दूरवर ऐकू गेलेच नाहीत. गोदी थंडच राहिली. गोदी कामगारांचा राष्ट्रव्यापी संप सुरू झाला होता. देशातल्या दीड लाख गोदी कामगारांबरोबर मुंबईतले पन्नास हजार गोदी कामगार संपाच्या रिंगणात उतरले होते.

जगातले यच्चयावत संप चालू होण्याआधी ज्याप्रमाणे शेवटच्या घटकेपर्यंत वाटाघाटी चालतात आणि नंतर त्या तात्त्विक भूमिकेवर फिसकटतात त्याच प्रमाणे या वाटाघाटी सुद्धा चालल्या आणि फिसकटल्या. मुंबईच्या कार्नाक बंदराच्या आवारात गोदी कामगार नेते एस. आर. कुलकर्णी यांचं जोरदार भाषण झालं. प्रचंड गर्दीत आणि घोषणांच्या कल्लोळात बेमुदत संपाची घोषणा झाली. त्या आधी एस. आर. कुलकर्णी, मनोहर कोतवाल, डॉ. शांती पटेल आणि एच. एन. त्रिवेदी ही नेते मंडळी दिल्लीला वाटाघाटी करायला गेली होती.

अर्थात, महागाईभत्तावाढ हीच या संपाची सुद्धा मुख्य मागणी आहे. महिना शंभर रुपये वाढ अशी सणसणीत मागणी कामगार नेत्यांनी केंद्र सरकारपुढे टाकली. अर्थात कोणतीही मागणी असो ती पहिल्यांदा नाकारायची. मग तिचा विचार करण्याचं आश्वासन द्यायचं, नंतर त्या करता समिती नेमायची, त्या समितीनं अहवाल सादर करायचा, या अहवालावर पुन्हा विचार करायचा, आणि शेवटी कुंथत कुंथत मागण्या मान्य करायच्या असा आपला सरकारी शिरस्ता आहे. त्या प्रमाणेच हे यथासांग चालू आहे.

संप सुरू झाल्यानंतर मुंबईतल्या काही गोद्यांमध्ये चक्कर टाकली. इंदिरा गोदी ही मुंबई बंदरातील महत्त्वाची गोदी. तिथं सकाळी ९ वाजता सुद्धा अक्षरशः सामसूम होती. गोदीच्या गेटपाशी कडेकोट पोलीस पहारा. गेट चक्क 'बंद.' खरं म्हणजे सरकारनं टाळेबंदी पुकारलेली नाही. त्यामुळे 'गेट' लावून घेण्याचं काहीच कारण नाही. मोठ्या मुश्किलीनं शेकडो तपासण्या झाल्यानंतर गोदीत प्रवेश मिळवला. संप शंभर टक्के यशस्वी झाला होता. धक्क्याजवळ एकही जहाज नाही. सफाई कामगार वगळता इतर कुणाचाच इतक्या प्रचंड गोदीत पत्ता नाही. मात्र पांढऱ्या वेशातले नौदलाचे लोक इकडून तिकडे धावाधाव करताना दिसतात. त्यांची धावपळ त्यांनाच ठाऊक. गोदीतून बाहेर पडलो. बाहेर रस्त्यावर कामगारांच्या गटागटानं चर्चा चालू होत्या. विषय अर्थातच संप. यातला बराचसा कामगारवर्ग श्रमजीवी. त्यापैकी निम्म्याहून जास्त लोक कोकणातले आणि विशेषतः रत्नागिरी, मालवण भागातले. संप पूर्ण यशस्वी असल्याबद्दल सगळेच लोक खुश दिसले. पण तरी सुद्धा संपाच्या भवितव्याबद्दल त्यांना काळजी वाटत होती. नुकत्याच झालेल्या रेल्वे संपाची आठवण जवळ जवळ प्रत्येक कामगार बोलून दाखवीत होता. त्यातच गोदीमध्ये नौदलाच्या मदतीनं काम चालवणार अशी बातमी आली. या बातमीमुळे कामगार चिडलेले दिसले.

या कामगारांशी त्यांच्या मागण्यांबाबत बोललो. खरोखरच आपल्या मागण्या काय आणि त्या कितपत मिळतील या बाबत या कामगार वर्गाला बरीच माहिती होती. रेल्वे संपाच्या पार्श्वभूमीवर कामगारांमधली ही जाण बरीच लक्षणीय वाटली. हे कामगार नेत्यांचं यश आहे. या बोलण्यामधून दुसरी महत्त्वाची गोष्ट लक्षात आली ती म्हणजे कामगारांचा नेत्यांवरील विश्वास. एसार हा माणूस कामगारांचा देव आहे. बुशशर्ट पँट घालणारा, बुटक्या शरीरयष्टीचा हा मध्यमवयीन माणूस आज साऱ्या दीड लाख कामगारांचा विश्वास संपादन करून बसला आहे.

महागाई भत्त्यामध्ये शंभर रुपये वाढीची मागणी आधी केली गेली असली तरी चालू वर्षी ६० रुपये वाढ स्वीकारायला कामगारनेते तयार होते. सरकारसुद्धा पन्नास रुपये वाढ द्यायला राजी आहे. पण संप झाला तो फक्त दहा रुपयांच्या फरकासाठी नव्हे. मुख्य घोळ आहे १९७४ सालच्या महागाई भत्त्याचा. १९७४ च्या जानेवारी ते डिसेंबर या काळासाठी दरमहा ५० रुपये महागाई भत्ता जाहीर करा या कामगार नेत्यांच्या मुख्य मागणीवर सरकार अडलं. वाटाघाटी करता करता ७४ साला करता एक रकमी ४०० रुपये देण्याचा प्रस्ताव सरकारनं ठेवला. वरदेखी हा प्रस्ताव सरकारच्या रडक्या धोरणाच्या मानानं बरा वाटतो. पण त्यात सुद्धा मोठी मेख आहे. हे ३०० रुपये पहिल्या सहा महिन्यांकरता १२० आणि दुसऱ्या सहा महिन्यांकरता १८० रुपये अशा हिशोबानं मिळणार आहेत. दुसऱ्या सहा माहीत सक्तीची बचत योजना लागू झाली, यामुळे या १८० रुपयांपैकी ९०



UH 744

रुपये कापले जाणार. म्हणजे कामगारांच्या हातावर जेमतेम २१० रुपये पडणार. कामगार नेत्यांनी ही मागणी धुडकावून लावली आहे. महागाई भत्ता ७४ सालापासून देण्याचं मान्य करा मग रकमेबद्दल वाटाघाटी करू असं नेत्यांनी सांगितलं. वाटाघाटी इथंच फिसकटल्या.

गोदी कामगारांशी बोलतांना कळलं की, तिथल्या सामान्य कामगाराला साधारणतः पावणे तीनशे ते तीनशे रुपये मासिक–पगार मिळतो. त्याच दर्जाच्या इतर क्षेत्रांतल्या कामगारांना चारशे ते पांचशे रुपये दरमहा मिळतात असं या कामगारांनी सांगितलं. कामगारांच्या मागण्या मान्य केल्या तर सरकारवर बावीस कोटी रुपयांचा जादा बोजा पडेल. ही रक्कम बंदरांची फी वाढवून सहज भरून काढता येईल, असं कामगार म्हणतात.

१९७४ सालच्या महागाई भत्त्याची आठवण कामगारांना आणि त्यांच्या नेत्यांना इतक्या उशिरानं कशी काय झाली, असं पोर्ट ट्रस्टमध्ये काम करणाऱ्या एका कामगाराला छेडलं. त्यावर तो म्हणाला की, गेल्या वर्षी याच प्रश्नावर संप होणार होता, पण लोकूर समिती नेमून सरकारनं कामगारांना गप्प बसवलं. या समितीनं अद्याप आपला अहवाल सादर केलेला नाही. तो मार्च महिन्यापर्यंत सादर होईल. पण त्यातल्या शिफारशी १९७५ सालापासूनच्या असणार. म्हणजे ७४ सालचा प्रश्न शिल्लक रहातोच. महागाई भत्त्यासंबंधीचा कामगार युनियन बरोबरचा करार डिसेंबर १९७३ मध्ये संपला. त्यानंतर नवी सुधारीत वेतनश्रेणी तयार करण्याची मागणी कामगारांनी केली. पण सरकारनं ती नेहमी प्रमाणेच ताबडतोब मान्य केली नाही आणि त्यामुळे शेवटी हा संप उद्‌भवला.

बॉम्बे पोर्ट ट्रस्ट हे एक मोठं संस्थान. त्यांच्या वसाहती वेगळ्या. त्यांची रेल्वेसुद्धा स्वतंत्र. त्यांच्या ऑफिसात गेलो. इथं तिथं भटकलो. सगळंच शांत. यांच्या एका मोठ्या अधिकाऱ्याला भेटलो. संप शंभर टक्के असल्याचं त्यानंसुद्धा मान्य केलं. मात्र संपाच्या शक्तीची पोर्ट ट्रस्टवाल्यांना आधीच कल्पना होती. त्यांनी संप सुरू व्हायच्या आधीच ४८ बोटी धक्क्यावरून खोल समुद्रात नेऊन ठेवल्या, आज समुद्रात साठ बोटी उभ्या असल्याचं समजलं.

एकूण हा संप जर चिघळला तर त्याचे भयानक परिणाम होणार हे उघड आहे. त्याची फार मोठी जाहीरातसुद्धा सरकार संपाबद्दलची लोकांची सहानुभूती घालवण्याकरता करीत आहे. या संपाचा मुख्य परिणाम होईल तो धान्याच्या ने–आणीवर. साहजिकच आधीच अन्नधान्याची बोंब. त्यात या संपाची भर. पण त्याला इलाज नाही. गेली दोन वर्षे हा संप बऱ्याच वेळा टाळला गेला पण त्याचं मूळ कारण सुटलं नाही. त्यामुळे तो आता अटळ ठरला होता तसा तो झाला.

केंद्रीय नौकानयन मंत्री कमलापती त्रिपाठी यांची अवस्था, रेल्वे संपाच्या वेळी ललित नारायण मिश्रांची झाली होती तशीच झाली आहे. असो. तर गोदी संप झाला. सध्या तरी कामगारांची एकी बेफाट आहे. मागण्या रास्त आहेत. कामगारांचं मनोधैर्य आज तरी चांगलं आहे. सगळं कसं ठाकठीक आहे. पण तरी सुद्धा रेल्वे संपाच्या आठवणी विसरता येत नाही. –१७ जानेवारी, ७५

□ □


गुणवत्ता आणि
नम्र सेवा हेच
स्वस्तिक
उत्पादनांच्या
वाढत्या विक्रीचे
रहस्य आहे



स्वस्तिक पादत्राणांचे
आणखी एक वैशिष्टय
आहे त्यांची विविधता

स्वस्तिक पादत्राणे दर्जेदार असल्याबद्दल ग्राहकाची खात्री झाली नि तेव्हापासून त्याची मागणी सतत वाढतच आहे. पुरुषांसाठी व मुलांसाठी चामडी बूट, महिला, पुरुष व मुलांसाठी चपला, कॅनव्हासची पादत्राणे आणि लहान मुलांच्या सॅंडल्स वगैरे विविध प्रकारची पादत्राणे नवीन व आकर्षक डिझाईनमध्ये मिळतात. 'स्वस्तिक'ची गुणवत्ता देश-विदेशात सुविख्यातच आहे. आपली पुढील खरेदी 'स्वस्तिक'च्या अधिकृत दुकानांतच करा.

स्वस्तिक
रबर प्रॉडक्टस् लि.
खडकी, पुणे-४११००३.

Dattaram-SRP-32-MAR

# सोलकढी

## □ 'पियानो टु पिन'

"**म**हाराष्ट्र राज्य नाटचस्पर्धेत विजय बोंद्रे यावर्षी 'पिन टु पियानो' नावाचे, अमराठी वाटणारे पण मराठीच असणारे, अभिनव नाटक सादर करणार आहेत. माधव मनोहराना ते आवडेलच; इतराना ते कसे वाटते ते बेताबेताने कळेलच."

—अनंतराव ('मी पाहिलेले नव नाटकराव' या लेखातून · 'माणूस' दिवाळी अंक १९७४)

दरवर्षी, सरकारी नाटचस्पर्धेत होऊ घातलेल्या नाटकाच्या वार्ता, स्पर्धेपूर्वी पुष्कळ दिवस, माझ्या कानावर येत असतात. त्या वार्तेप्रमाणे प्रत्येक नाटक आगळेवेगळे आणि दिग्दर्शक–नटसचाला व परीक्षक–प्रेक्षकानासुद्धा आव्हान देणारे असते. आव्हानविव्हान गोष्टीना मी फार घाबरतो. त्यामुळे आगामी नाटचस्पर्धेत आपल्यापुढे काय वाढून ठेवले आहे या कल्पनेने मी दचकतडुचकत असतो. 'पिन टु पियानो' या नाटकाचे असेच झाले: स्वत: दिग्दर्शक विजय बोंद्रे यानीच या नाटकाची माहिती माझ्या कानात सागितली, 'अ' पासून 'ज्ञ' पर्यंतचे सर्वसगळे विषय या नाटकात असल्यामुळे त्याला नाव काय द्यावे हा प्रश्न पडला होता; इतक्यात एका दुकानाचे 'पिन टु पियानो' नाव पाहण्यात आले; पिन पासून पियानोपर्यंत सर्वसगळ्या वस्तू देणाऱ्या दुकानासारखे हे नाटक होते; म्हणून त्याला 'पिन टु पियानो' हे नाव चपखल देऊन टाकण्यात आले—ही बारशाची गोष्ट मी ऐकली. नाटक औपहासिक, व्यंगचित्रणात्मक असून 'गॉसिप ग्रूप मधल्याच उद्धव देसाई नामे एका पोरटयाने लिहिले आहे हे कळले. या नाटकासाठी, सौ. शोभा बोंद्रे सोडून इतर आठदहा मुली पूर्व विलेपार्ल्यातच सापडल्याची नवलकहाणी समजली. पाश्चात्य नृत्यसगीताची कल्पक जोड देऊन या नाटकाचे निर्मितिसकल्पन झाले आहे, हे देखील मला सांगण्यात आले. मी ऐकले. असले बत्तीसगुणी आणि छत्तीसलक्षणी नाटक बघायलाच हवे असे मी मनोमन ठरवले आणि मोजूनमोजून चुरमुरे खात बसलो.

आता अंतिम स्पर्धा सपत आली तरी मी आपला मोजूनमोजून चुरमुरेच खात बसलो आहे.

पहिले चुरमुरे मोजणे चालू असतानाच राराराररा (राजमान्य राजश्री राजवर्खी राजाराम) हुमण्यांच्या सेन्सॉर बोर्डाने 'पिन टु पियानो' नाटकात काही काटछाटी सुचवल्या. या व्यगनाटकात एवढेसुद्धा व्यग राहू नये ही श्रीहुमण्याची इच्छा! अडचणीची गोष्ट अशी होती की सास्कृतिक खात्याच्या नाईक–दारव्हेकर–पराजपे–माडगूळकर प्रभृतीच्या सेन्सॉरने हे नाटक एकही काटछाट न सुचवता मजूर केले होते. पण त्या मजुरीचे हुमण्याच्या सेन्सॉरला काय होय? त्यानी लग्नाआधी सोडमुंजीचा आग्रह धरला; विजय बोंद्रे यांनी लग्नासाठी मुंडावळ्या बाधूनच, सोडमुंज करणार नाही, असे बाणेदारपणे सागितले. (बाणेदारपणा अलीकडे फार वाढला आहे की काय, असा सशय मला येऊ लागला आहे. जेथे पाहावे तेथे हा बाणेदारपणा आहेच. त्यामुळे या माझ्या महाराष्ट्रात आणखी कुठलाच '——पणा' उरणार नाही काय?) बाणेदारापुढे हुमणेदारानी माघार घेतली. स्पर्धेत 'पिन टु पियानो' पाहायला मिळणार अशी खात्री झाली. त्यापूर्वी पूर्व विलेपार्ल्याला 'लोकमान्य सेवा सघा'त सरावासाठी एक प्रयोग विजय बोंद्रे यानी लावला. (त्याआधी सभासदासाठी एक प्रयोग झालाच होता.) या प्रयोगाला मला बोलावणे होते. पण असल्या देवाला–भुताला दिलेल्या किंवा थुईऽ घालून केलेल्या प्रयोगाला मी जात नाही. मी घरीच बसलो आणि सगळा घोटाळा झाला. एका सेनेच्या (ही सेना म्हणजे शिवसेनाच असे काहीजण मुळुमुळु म्हणत होते.) काही जबाबदार व जागरुक स्वयसेवकानी, लोकशाही उपायानी हा प्रयोग बद पाडला. कारण या नाटकात सेना आणि सेनापतीचे चारित्र्यहनन केले आहे असे त्याना वाटले. स्पर्धेत हे नाटक कसे करता ते पाहून घेऊ, असे सभ्य आणि सभावित आव्हान विजय बोंद्रे यांना दिले. सभ्य आणि सभावित झाले तरी ते आव्हानच हो. त्याने बाणेदार बोंद्रेसुद्धा माझ्या इतकेच घाबरले. कारण या नाटकाबाबत सेना-पतीशी झालेल्या चर्चेत नाटक सुटले नाही; आणि पूर्व विलेपार्ल्याच्या त्या जबाबदार व जागरुक सेना-स्वयसेवकानी आपल्या मतदार–सघात नाटकवाल्यांवर लोकमताचा पुण्यप्रभाव टाकण्यासाठी योजलेल्या प्रगल्भ आणि परिणामकारक लोकशाही उपाययोजनेतून नाटकवाले सुटू शकले नाहीत.

या सगळ्या औत्सुक्यामुळे, मागे 'सखाराम बाईंडर' प्रकरणी उडाली होती तशी, बऱ्यापैकी धूमधमाल उडाली. या माझ्या महाराष्ट्रात मधूनमधून सारखे असे काही घडत राहते म्हणून तर इथले मीठ छान खारट लागते. 'पिन टु पियानो'च्या निमित्ताने विजय बोंद्रे बदनाम झाले; कारण ते घाबरले. सेना आणि सेना-पती बदनाम झाले; कारण त्यानी घाबरवले. राजाराम हुमणे बदनाम झाले, कारण त्यांनी नाटक दाखवले नाही. मी बदनाम झालो; कारण मी हे ऐतिहासिक महत्त्वाचे नाटक देखले नाही. खुद्द नाटकसुद्धा बदनाम झाले; कारण पिन टु पियानो अशा कष्टाने आणि निष्ठेने उभे केलेले हे नाटक पाहता पाहता (म्हणजे न पाहता न पाहाता) पियानो टु पिन असे खाली बसले.

झालेल्या बदनामीला घाबरून की काय, पण कोणत्याही नाटकात यापुढे कसलाही हस्तक्षेप (किती मार्मिक शब्द आहे बरे) करायचा नाही असे सेना–पती आणि सेना–सैनिकानी निर्धारपूर्वक ठरवले आहे, असे 'महाराष्ट्र टाईम्स'मध्ये चक्क छापून आले आहे.

म्हणजे लढाई जरी सेना आणि सेनापतीनी जिंकली तरी युद्ध मात्र विजय बोंद्रे यांनी जिंकले आहे, असे काही नाटकरावांना म्हणताना मी ऐकले आहे. आम्ही नुसते युद्ध–वार्ताहर. बोंद्रे यांना झालेल्या जखमा बांधायला आम्हाला कुठे वेळ आहे? अर्थात त्याची फारशी गरज नाही. कारण नाटक गाजायचा सोहळा यथासाग पार पडला आहे. त्यामुळे जखमा मिरवत 'पिन टु पियानो' रसिक मराठी प्रेक्षकांसमोर सादर करायला विजय बोंद्रे बद्धपरिकर झाले आहेत.

मी तर असेही ऐकले आहे की २९ डिसेंबर १९७४ च्या 'सोबत'मध्ये लिहिलेल्या 'पिन टु पियानो . न झालेल्या एका प्रयोगाची कहाणी' या लेखात माधव मनोहरानी केलेल्या शिफारसीप्रमाणे या नाटकाचे पुढील प्रयोग शिवसेनेच्या सौजन्याने आणि पुरस्काराने होणार आहेत.

१ मे १९७५ रोजी होणारा या नाटकाचा एकशे एकावन्नावा प्रयोग पाहायचा, असे मी मोजूनमोजून चुरमुरे खात म्हणतो आहे.

—अनंतराव

# नव्या कुलगुरूंपुढील आव्हाने

वा. दा. रानडे

महाराष्ट्रातील पुणे, शिवाजी, औरंगाबाद, नागपूर आणि ठाकरसी विद्यापीठात नव्या कुलगुरूंच्या नेमणुका झाल्या व आता नव्या विद्यापीठ कायद्यानुसार या विद्यापीठाचा कारभार सुरू होईल. विद्यापीठ शिक्षणाचा दर्जा आणि विद्यापीठाचा कारभार यांच्यात सुधारणा घडवून आणण्यात नवे कुलगुरू कितपत यशस्वी होतील, विद्यापीठ शिक्षणातील मुख्य समस्या सोडविण्यात त्यांना कितपत यश येईल हे सरकार, प्राध्यापक आणि विद्यार्थी यांच्याकडून त्यांना कितपत सहकार्य मिळते त्यावर अवलंबून आहे. येथे फक्त काही अपेक्षा मी व्यक्त करीत आहे.

पहिला महत्त्वाचा प्रश्न म्हणजे विद्यापीठ आणि सरकार यांचे संबंध. विद्यापीठाच्या कारभारात सरकारचा अनावश्यक हस्तक्षेप व नियंत्रण प्रत्यक्ष अप्रत्यक्ष अनेक प्रकारांनी येत असते. विद्यापीठांना सरकारी अनुदानावर मोठ्या प्रमाणात अवलंबून राहावे लागते. कारण विद्यार्थ्यांची फी हेच त्यांचे मुख्य उत्पन्नाचे साधन, त्यावर खर्च भागत नाही. वाढता खर्च भागविण्यासाठी अनुदान वाढवून मागावे लागते. दानशूर उद्योगपतींकडून देणग्या मिळविण्याचे प्रयत्न होतात पण त्यालाही मर्यादा असतात. शिक्षण हा विकासाचा पाया आहे, तेव्हा त्यासाठी येणाऱ्या खर्चाची तरतूद कोणतीही खळखळ न करता सरकारने केली पाहिजे. सरकारी अनुदान ही काही कृपा नव्हे. विद्यापीठाचा तो हक्क आहे. हे अनुदान मिळते म्हणून विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांनी सरकारचे मिंधे होण्याचे, सरकारी धोरणाची तळी उचलून धरण्याचे कोणतेही कारण नाही. विद्यापीठाची स्वायत्तता जपणे ही कुलगुरूंवरील सर्वांत मोठी जबाबदारी आहे. विद्यार्थ्यांची निदर्शने दडपून टाकण्यासाठी काही वेळा पोलीस विद्यापीठ आवारात प्रवेश करतात. महाराष्ट्रात असे घडलेले नाही. पण उत्तरेकडील विद्यापीठातून अनेकदा घडते. कुलगुरूंच्या परवानगीशिवाय किंवा कुलगुरूंनी स्वत:च मदत मागविल्याशिवाय पोलिसांनी विद्यापीठ आवारात प्रवेश करावयाचा नाही हा संकेत कुलगुरूंनी निर्धाराने अमलात आणला पाहिजे.

विद्यापीठांना स्वायत्तता हवी हे खरे. पण स्वयत्तता म्हणजे वाटेल तसा कारभार करण्याची मोकळीक नव्हे. स्वायत्ततेत स्वयशिस्त अभिप्रेत आहे. डॉ. आपटे कुलगुरू असतानाच्या काळात स्वायत्ततेचा दुरुपयोग केला जाऊन कारभारात अनेक गैरप्रकार घडले त्यामुळे सरकारने हस्तक्षेप करून नवे कुलगुरू व नवी कार्यकारिणी नेमली. तेव्हा सरकारला हस्तक्षेपाची वेळच येऊ नये यासाठी विद्यापीठाचा कारभार स्वच्छ हवा, चोख हवा. त्याबाबतीत मुख्य जबाबदारी कुलगुरूंवरच पडते.

स्वायत्ततेच्या संदर्भातच आणखी एक विचार म्हणजे नव्या विद्यापीठ कायद्यात स्वायत्ततेला बाधक तरतुदी कोणत्या आहेत त्याचा विचार होऊन त्या दूर करण्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. नव्या कायद्यातील कुलगुरू निवडीची पद्धत मला योग्य वाटत नाही. या पद्धतीने अंतिम निर्णय प्रत्यक्षात सरकारकडेच जातो. यात विद्यापीठाची स्वायत्तता राहिली कोठे ? सिनेटच्या सभासदांनी कुलगुरू निवडणे हीच पद्धत अधिक चांगली. त्यात गटबाजीस वाव मिळतो हे खरे. पण गटबाजी हा आजच्या निवडणुकीचा एक अटळ भाग झालेला आहे. गटबाजी आहे म्हणून निवडणुका नकोत, लोकशाही नको असे म्हणणे चुकीचे होईल. गटबाजीशी सामना करूनच आपणास पुढे जावयाचे आहे. लोकशाहीवादी शक्ती संघटित करून हा सामना देणे कठीण आहे असे नाही. जीवनाच्या सर्वच क्षेत्रात हा लढा आपणास लढावा लागणार आहे.

उच्च शिक्षणाचा विकास हे विद्यापीठाचे मुख्य क्षेत्र. संख्यावाढ आणि गुणवत्ता वाढ ही विकासाची दोन अंगे आहेत. उच्च शिक्षणाचा प्रसार होत आहे पण दर्जा घसरत चालला आहे. दर्जा सुधारण्याचा प्रश्न सोपा नाही. त्याचा विचार करावयाचा तर प्राथमिक शिक्षणापासून करावयास हवा, कारण दर्जा तेथपासून घसरत आलेला आहे, तो महाविद्यालयात एकदम कसा सावरणार ? दर्जा राखण्याची काळजी प्राथमिक शिक्षणापासून घ्यावयास हवी. आमच्या शिक्षणपद्धतीत नेमके या महत्त्वाच्या गोष्टीकडे दुर्लक्ष झालेले आहे. आणि ही चूक सुधारण्याची निकड कोणालाही वाटत असल्याचे दिसत नाही. कच्चे विद्यार्थी एस. एस. सी.च्या वर्गापर्यंत वर ढकलले जातात. तसे केले नाही तर शिक्षकावर, मुख्याध्यापकावर दडपणे येतात. एस. एस. सी.चा निकालही फार सोपा लावला जातो. मग हेच दर्जा खाली आणण्याचे लोण विद्यापीठ परीक्षापर्यंत पोचते. परीक्षाच्या वेळी सामुदायिक कॉपी करण्याचे प्रकार उत्तरेकडील विद्यापीठाइतके आपल्याकडे होत नसले तरी आपल्याकडेही त्याचे प्रमाण वाढू लागले आहे. कॉपीला आळा घालण्यासाठी प्रश्नपेढीची पद्धत आता अमलात यावयाची असून त्यातलेच प्रश्न परीक्षेत विचारले जावयाचे आहेत. त्यातसुद्धा नेमके प्रश्न जाणून घेण्यासाठी गैरप्रकार होणार नाहीत याची काय खात्री ?

विद्यार्थी शिकतात कशासाठी ? पदवी मिळविण्यासाठी. पदवी कशासाठी मिळवायची ? चांगली नोकरी मिळविण्यासाठी. असे हे शिक्षण, पदवी व नोकरी याचे चक्र आहे. शिक्षणाने आपले ज्ञानाचे क्षितिज विस्तारावे, एखाद्या विषयाचा खास अभ्यास करावा, त्यात संशोधन करावे अशी ओढ

किती विद्यार्थ्यांना असते? समाजासाठी आपण काही तरी केले पाहिजे अशी ओढ आमचे शिक्षण किती विद्यार्थ्यांत निर्माण करते?

सारीच समाज व्यवस्था सडली आहे. शिक्षणावर त्याचा परिणाम झाल्याशिवाय कसा राहील? सर्वांगीण क्रांतीचा एक भाग म्हणून होणारी शैक्षणिक क्रांती हाच हे सारे बदलण्याचा परिणामकारक मार्ग आहे. तो लांबपल्ल्याचा आहे. पण त्या दिशेनेच पावले टाकली पाहिजेत. सध्याची विद्यापीठे व शिक्षणसंस्थांतून नवसमाजाच्या निर्मितीस आवश्यक असे शिक्षण मिळण्याची आशा नाही. तो त्यांचा उद्देशच नाही. सध्याच्या शिक्षण पद्धतीतील उणीवा दूर करण्यासाठी पर्यायी शैक्षणिक कार्यक्रम हाती घेतला पाहिजे. तो अंमलात आणण्यासाठी लोकांकडूनच मदत जमा करावी लागेल. प्रथम छोटया प्रमाणावर काही निवडक केंद्रात हा प्रयोग हाती घ्यावा, त्याला प्रतिसाद चांगला मिळाल्यास मग त्याची वाढ करता येईल.

केवळ मुख्यमंत्री बदलल्याने कारभारात सुधारणा होईल ही अपेक्षा करणे जसे चुकीचे तसेच नव्या कुलगुरूंच्या नेमणुकीने विद्यापीठाच्या कारभारात एकदम फार मोठा बदल होईल अशी अपेक्षा करणे चुकीचे आहे, पण नवी दिशा ते दाखवू शकतील, नवे वळण लावू शकतील, नवे वातावरण निर्माण करू शकतील. वाढती बेकारी, महागाई, कोणत्याच मूल्यांवर श्रद्धा नाही, नवे काही करण्याची उमेद नाही. निराशा, वैफल्य यांनी आजचा विद्यार्थी ग्रासला गेला आहे. उद्याच्या उज्ज्वल भवितव्याचा दिलासा देणारा कार्यक्रम त्याच्यापुढे ठेवला पाहिजे. विद्यार्थ्यांची शक्ती एक मोठी शक्ति आहे, तिला योग्य वळण लावल्यास समाजपरिवर्तनाच्या कार्यात ती महत्त्वाचा वाटा उचलू शकेल. □


स्थापना २६ मार्च १९५८

# किर्लोस्कर न्युमॅटिक कं. लि., पुणे-४११ ०१३

रजिस्टर्ड ऑफिस—हडपसर इंडस्ट्रियल इस्टेट.

**संचालक**

श्री. एस. एल. किर्लोस्कर (चेअरमन) श्री. व्ही. पी. वर्दे. श्री. एन. ए. कल्याणी,
श्री. पी. एल. किर्लोस्कर श्री. एस. एम. घाटगे श्री. व्ही. बी. कीर्तने,
श्री. आर. एस. पेडुर (नियुक्त, आय. सी. आय. सी. आय. लि.)

**मॅनेजिंग डायरेक्टर** मेजर जनरल—एच्. एम्. मोहिते (रिटायर्ड)

—व्यवहार—

कॉम्प्रेस्ड अेअर मशिनरी, रेफ्रिजरेशन कॉम्प्रेसर्स, पॉवर ट्रान्स्मिशन इत्यादी इंजिनियरिंग मालाचे उत्पादन आणि विक्री

## ठेवी स्वीकारणे आहेत

| मुदत वर्षे | १ | २ | ३ | ५ | ७ | १० |
|---|---|---|---|---|---|---|
| व्याजाचा दर | ९ १/२ % | १०% | ११% | १२% | १२ १/२ % | १३ १/२ % |

भागधारकांकडून स्वीकारलेल्या मुदत कर्जावर अर्धा टक्का अधिक व्याज दिले जाईल. व्याज दर सहामाहीस दिले जाईल.

अर्जाचा नमुना आणि नियमांसाठी कृपया वरील पत्यावर पत्रव्यवहार करावा.
या जाहिरातीतील मजकूर कंपनीच्या व्यवस्थापकांनी १६-७-१९७४ रोजी मंजूर केलेला आहे आणि ही जाहिरात त्यांच्या आदेशावरून प्रसिद्ध केली जात आहे.

—एन्. बी. वर्दे (सेक्रेटरी)

KIRLOSKAR®

| | वर्षअखेर ३१-३-७२ | वर्षअखेर ३१-३-७३ | वर्षअखेर ३१-३-७४ |
|---|---|---|---|
| | रुपये | रुपये | रुपये |
| करपूर्व निव्वळ नफा | १५,४५,०७२ | ७८,८१,५९३ | १,१६,२७,९२४ |
| करानंतर निव्वळ नफा | १०,८३ ७९० | ३८,८१,५९३ | ४५,९७,९२४ |
| इक्विटी डिव्हीडड | १५ टक्के | १५ टक्के | १२ टक्के |

**भाग भांडवल आणि देणे**
**३१-३-७४ या दिवशी**

| | | |
|---|---|---|
| वसूल भाग भांडवल | रुपये | १,३९,९१,६०० |
| फ्री रिझर्व्हस | ★रुपये | २,९७,६०,७७० |
| तारणावरील कर्जे | रुपये | २,४७,१४,५९१ |
| डीबेंचर्स (तारण ४९ टक्के फक्त) | रुपये | १,००,००,००० |
| मुदत ठेवी | रुपये | ६६,१२,००० |
| इतर कर्जे | रुपये | ५५,३०,००० |

★ डिव्हिडंड पोटी रुपये १६,७८,९९२ धरून
★ आयकर पोटी रुपये ७०,३०,००० धरून

TOM & BAY/KPC. 7457 M


# हॉन डॅट

मूळ व्हिएतनामी लेखक : अॅन्ह डक
इंग्रजी भाषांतर : रॉबर्ट सी. फ्रेंड
मराठी भाषांतर : लक्ष्मण लोंढे

## माझी भूमिका

व्हिएतनामचं स्वातंत्र्ययुद्ध हा एक चमत्कार आहे. आपल्या पोथ्यापुराणातल्या दैवी चमत्काराहून अगदी वेगळा—माणसानं घडवलेला. हे युद्ध जगातल्या आजच्या सर्वात बलाढ्य आणि समृद्ध सत्तेशी, शस्त्रास्त्रे, मनुष्यबळ आणि भौतिक प्रगती यात तुलनेनं फार मागे असलेल्या एका छोटया आशियाई राष्ट्राकडून खेळलं जातंय. प्रबळ सत्ताधाऱ्यांपाशी आणि त्यांच्या पाठीराख्यांपाशी जे नाही आणि व्हिएतनामी स्वातंत्र्यसैनिकांपाशी जे आहे आणि ज्याच्या बळावर ते एकामागोमाग विजय मिळवीत आहेत अशी एकच गोष्ट आहे—ती म्हणजे स्वातंत्र्याची दुर्दम्य प्रेरणा. शस्त्रास्त्रांपेक्षाही ही अदम्य स्वातंत्र्योर्मीच युद्धाचं पारडं फिरवीत आहे. युद्धात शस्त्रापेक्षा शस्त्र धारण करणारा माणूस अधिक महत्त्वाचा असतो हे शाश्वत सत्य व्हिएतनामच्या स्वातंत्र्ययुद्धान पुन्हा एकदा सिद्ध होतंय.

हा लढणारा व्हिएतनामी नागरीक आहे तरी कसा हे जाणण्याची मला उत्सुकता होती. तो मला हॉन डॅट कादंबरीत भेटला. आणि मी त्याची ओळख मराठी वाचकाला करून द्यायला उद्युक्त झालो. मला ह्या कादंबरीत ऊट ह्या दहा-बारा वर्षाच्या मुलापासून साठी उलटलेल्या म्हाताऱ्या साऊपर्यंत सगळी माणसं भेटली. कादंबरीच्या प्रस्तावनेत हे स्पष्ट केलेलं आहे की ही कादंबरी संपूर्ण सत्यावर आधारित आहे. यातली व्यक्तिमत्त्व जिवंत आहेत. ही सगळी खेडूत गावकरी मंडळी आहेत. जवळजवळ सगळीच अशिक्षित आहेत. ह्या परिवारात एक लोहार आहे, शेतकरी आहेत,



शेतमजूर आहेत, विद्यार्थी आहेत, कोळी आहेत, कुभार आहेत, छोटे दुकानदार आहेत. युद्धाच्या छायेतही त्याचे आपापले पोटापाण्याचे व्यवसाय चालू आहेत. मुलांची शिक्षण चालू आहेत. तरुणांची प्रेमप्रकरण सुद्धा चालू आहेत.

–आणि ह्या जीवनाचाच एक भाग म्हणून आपल्या गावाच स्वातत्र्य अबाधित राखण्याच कामही ही मडळी करीत आहेत. व्हिएतनामच्या युद्धाच हे वैशिष्टच मला या कादबरीत आढळल. हे युद्ध दोन पगारी सैन्यात चाललेल नाही. एका बाजूला सारी जनताच आहे ! ह्या जनतासैनिक म्हणूनच पोटार्थी सैनिकाहून फार निराळा आहे. त्याच्याजवळ शस्त्रास्त्रं नाहीत, जीपा, रणगाडे नाहीत फार काय त्याला गणवेशही नाही ! ह्या जनतासैनिकाच आपल्या गावावर प्रेम आहे, आणि तो आपल्या स्वातत्र्याला जिवाची बाजी लावून जपतोय ! तो काही मिळवण्याच्याउद्देशानं लढत नाही, तर जीवनाचा एक भाग म्हणूनच लढतोय !

ह्या कादबरीचं दुसरं वैशिष्ट्य पहिल्या वैशिष्ट्यावर आधारित आहे. ह्या कादबरीत कोणी नायक नाही, नायिका नाही. यात एका अगर दुसऱ्या व्यक्तिला महत्त्व नाही. कारण हा साऱ्या जनतेचा लढा आहे. आपलं स्वातत्र्य टिकवण ह्या प्रेरणेन प्रत्येक जण इथे आपापला क्रांतिकार्यातला वाटा मनापासून निस्वार्थीपणे उचलतोय–कुणी प्रत्यक्ष युद्धात भाग घेतोय तर कुणी त्याना मदत करतोय. लढा सशस्त्र आणि नि शस्त्र अशा दोन्ही पातळीवर सुसूत्रपणे चालू आहे. हा लढा चालू ठेवणारे हे सारे नागरीक ह्या कादबरीचे हीरोच आहेत.

अखेरीस व्हिएतनामचा लढा हा मानवाच्या मुक्तिसग्रामाचा एक भाग आहे. साऱ्या जगात इतरत्र जिथे जिथे मानवाचा मुक्तिसग्राम चालू आहे तिथे तिथे ह्या लढ्याचा अभ्यास झाला पाहिजे. अशा अभ्यासाचा त्या त्या लढ्याना फायदा होईल अशी माझी श्रद्धा आहे. आणि ही श्रद्धाच ह्या कादबरीच्या भाषातरामागची माझी प्रेरणा आहे.

बस. मला सांगायचं होत ते एवढच ! चला मडळी आता आपल्या व्हिएतनामी दोस्तांना भेटायला.

**–लक्ष्मण लोंढे**

## ह्या भागातील प्रमुख पात्रांचा परिचय

सू : एक क्रातिकारक स्त्री.
सॅन : सूचा नवरा
कुएन : सू ची बहीण
थुय : सू ची मुलगी
साऊ : सू व कुएनची आई.
गॅन : कुएनचा प्रियकर
टाम चान : पार्टीचा जिल्हा सेक्रेटरी
डाट : टाम चानचा शरीररक्षक
हाईथेप : पार्टीच्या हॉन डॅट गावच्या शाखेचा प्रमुख
बा रेन : एक क्रातिकारक
नाम न्हो : कुएन व सूची मैत्रीण
बा ऊ : छोटी दुकानदार स्त्री
टू राऊ : एक कोळी
वी आणि ऊट : टू राऊचे मुलगे

### इतर पात्रांचा परिचय

झॅम : शत्रूच्या वनरक्षक तुकडोचा प्रमुख
मू : झॅमचा बाप
का झोई : झॅमची आई
का माय : झॅमची बहीण
बा फी : शत्रूचा हेर

# हॅन इॅट

## लेखांक : एक

'आता तुला मान्य करावेच लागेल– तो तुला विसरला नाही हा माझा विश्वास रास्त होता.' कुएन आपल्या बहिणीला–सू ला म्हणाली ' बघ, त्यानं किती मनापासून पत्र लिहिलं आहे– आणि हे त्याचं अठरावं पत्र आहे. विसरू नको. देवा, देवा, तुझ्या मनात कसल्या शंका येत होत्या ! आता सगळं स्पष्ट झालं. जशी तुझी पत्रं त्याला पोहोचू शकली नाहीत तशीच त्याची पत्रं सुद्धा तुझ्यापर्यंत येऊ शकली नाहीत. उत्तर व्हिएतनाममध्ये आपले राज्य असूनही सात–सात वर्षे पत्र गहाळ होतात, पोचू शकत नाहीत ह्या विचारानं तू वेडी झाली होतीस. पण आता तुला तुझ्या नवऱ्याची काळजी करण्याची जरूर नाही, हो की नाही सू ? आता तुला तुझं मत बदलावंच लागेल. आधीच तू म्हणू लागली होतीस, ' तिकडच्या सुखी आयुष्यात मश्गुल झाल्यामुळे त्याला आपला विसर पडलाय ' तुझा समज चुकीचा होता. होता की नाही ?

कुएन बडबडत होती. तिचा आनंद ओसंडून जात होता. आपल्या मेव्हण्याचं समर्थन करण्याचा तिचा इरादा नव्हता. पण सतत सात वर्षे पत्र लिहून लिहून कंटाळलेल्या सू ला त्या पत्रामुळे जो दिलासा मिळाला होता त्यानं तिला बरं वाटलं होतं. सू च्या आनंदात ती सहभागी झाली होती. आपल्या बडबडीने ती तो आनंद द्विगुणित करीत होती. तिच्या डोळ्यात खटयाळ हास्य होतं. मधूनच ती आपले ओठ दातानं दाबत होती. आणि तिच्या लांबसडक हाताच्या हालचालीनं तिच्या शब्दाला वजन येत होतं.

तिनं मेव्हण्याचा फोटो आपल्या जवळ ठेवला आणि पत्र सू ला दिलं. घाईघाईनं ती व्हरांड्यात आली. जिन्याजवळ छोटी थुय खेळत होती. कुएननं तिला जवळ बोलावलं, ' नीट बघ थुय. आईला सांग हा फोटो कुणाचा ?'

' बाबांचा ' फोटो नीट न्याहाळून बघत थुय म्हणाली, ' हो, हो नक्की बाबांचा. '

' तुला कसं ग कळलं ?'

' आईनं सांगितलंन् ' असं ती पटकन म्हणाली खरी पण कुएनच्या प्रश्नानं थुयचा गोंधळ उडाला. तिनं कुएनला विचारलं, ' मावशी, खरंच हे बाबा आहेत ना ?'

कुएननं मुलीला उचलून घेतलं. ती पलंगावर बसली आणि थुयला मांडीवर घेत मान हलवीत ती म्हणाली, ' खरंच बाबाच आहेत ते. बाबा कसे आहेत नीट पहा आणि लक्षात ठेव आता तुझी आणि बाबांची ओळख झाली की नाही ?'

मग सूकडे वळत ती म्हणाली ' सॅनच्या पत्रावरून असं दिसतं की त्याला तुझी शेवटची चिठ्ठी आणि थुयबरोबर घेतलेला तुझा फोटो पोचलाय. आपली मुलगी काय दिसते हे सॅनला सात वर्षानंतर कळलं. सू, काय वाटलं असेल नाही सॅनला ? '

भाचीच्या कपाळावरून प्रेमानं हात फिरवीत कुएन म्हणाली, ' पोरी, सात वर्षानं तुझ्या बाबांना तुझा फोटो बघायला मिळाला. तो गेला तेव्हा तू जन्माला सुद्धा आली नव्हतीस, माहीत आहे ?'

कालच घडल्यासारख्या सात वर्षांपूर्वीच्या घटना सूच्या डोळ्यासमोर उभ्या राहिल्या. उत्तरेत परत जमवाजमव होण्यापूर्वी सॅन छोटीशी रजा घेऊन आला होता. हे घर असंच होतं. असाच मुंग्यांनी घरात उकर काढला होता. त्यातच सॅन आडवाराला आला होता. नेहमीसारखाच तो हसतखेळत होता आणि लढाईच्या आदेशाची वाट पहात होता. त्या वरवरच्या हसण्या–खेळण्यामागे त्याच्या मनात काय घालमेल चालली होती याची फक्त सूलाच कल्पना होती.

' हं, मला काय फक्त दोनच वर्षांसाठी बोलावलं आहे. म्हणजे काही फार नाही. ' असं तो गावातल्या सगळ्यांना सांगत होता. शेवटच्या रात्री त्याने सूपाशी आपले मन उघडं केलं होतं.

' सू, आईला वाईट वाटू नये म्हणून मी दोन वर्षं– दोन वर्षं म्हणून घोकतोय्. पण ते काही फारसं खरं नाही. तुला खरं खरं सांगू ? युद्ध पुन्हा एखाद वर्षात सुरू होईल. मग तीन–चार–पाच वर्षंसुद्धा चालेल. आपल्या मनाची पूर्ण तयारी हवी. ' मध्यरात्र उलटून गेल्यावर त्यानं तिला कुशीत घेतलं. थोडा वेळ तो शांत होता. मग स्वतःशीच बोलल्यासारखं म्हणाला– ' आपल्या इथल्यासारखी निरनिराळ्या प्रकारची फळं तरी तिकडे असतील की नाही, देव जाणे ? आंबे, कोकम, द्राक्षे... मला वाटतं तिकडं द्राक्षं नक्कीच असतील. शिवाय तिकडे द्राक्षाचा मोसम कधी असतो कुणास ठाऊक ? पण आपल्या इथल्यासारखा तो टेटच्या सुमारास नसावा असं वाटतं. '

आपल्या जाण्याचा विषय टळावा म्हणून तो काही बाही बोलतोय् असं तिला प्रथम वाटलं. पण मग एकदम त्याला काय म्हणायचंय् हे तिला समजलं. वरवर साध्यासुध्या दिसणाऱ्या त्या शब्दामागच्या त्याच्या भावना उमजल्या. दोन वर्षांपूर्वीची गोष्ट. लॉंगचाऊह्याच्या लढाईनंतर विजयोत्सव साजरा केला जात होता. पार्टी होती. ती विजयीवीरांना जेवण वाढत होती. तिथं सॅनची आणि तिची पहिली नजरानजर झाली होती. तिला पहिल्या नजरभेटीत कसलीच शंका आली नाही. त्यानं खूप दिवसानंतर तिला सांगितलं होतं– 'तुझ्या सुंदर केसातील द्राक्षांच्या फुलांच्या सुगंधानं माझं लक्ष वेधून घेतलं.'

मग पार्टी संपेपर्यंत ते भेटत होते आणि त्यातून त्यांची पक्की दोस्ती जमली. मग एके दिवशी आजूबाजूला कोणी नाही असे पाहून त्यानं कुजबुजल्या आवाजात हसत हसत विचारलं होतं, 'आजकाल द्राक्षाची फुलं केसात घालायचं सोडून दिलं वाटतं एका माणसानं.'

सू लाजली, गोंधळली आणि आपलं हसू लपविण्यासाठी तिनं आपले ओठ दातात घट्ट दाबून धरले.

इथं त्यांच्या प्रेमाला सुरुवात झाली. देशभर चाललेल्या विजयी लढायांच्या धामधुमीतच त्यांच्या प्रेमाचं कमळ फुललं.

हिवाळ्याचे दिवस होते. ह्या मोसमात हॉनडॉटच्या आसमंतात द्राक्षाच्या फुलांना बहर येत होता आणि त्याच वेळी त्यांच्या सहवासाच्या वेलीवर प्रेमाचं फूल फुलत होतं आणि सुवासानं ती बेभान होत होती. दोन वर्षांनंतर त्यांनी लग्न केलं. त्याच सुमारास दिएन बिएन फूचा प्रचंड विजय मिळाला होता म्हणून त्यांच्या आनंदात सारी पंचक्रोशी सामील झाली होती. आनंदाला उधाण आलं होतं.

लग्नानंतर फक्त एकच महिना ती दोघं एकत्र राहिली होती. मग––सात वर्ष लोटली. एवढ्या प्रचंड कालावधीनंतर आजच सूला तिच्या नवऱ्याची बातमी कळत होती. एक त्रोटक पत्र आणि त्याबरोबर एक छोटासा हसरा फोटो.



सात वर्षं ! छे इतका काळ लोटला ? तिला खरंच वाटेना. ' काळ कसा झपाझप जातो. सात वर्षं होऊन गेली ' ती स्वतःशीच आश्चर्यान पुटपुटली.

' पण आपल्यावर त्या सात वर्षांत काय काय प्रसंग ओढवले याची त्याला कल्पनाच करता येणार नाही. शत्रून सॅनचा धिक्कार करणाऱ्या कागदावर तुला सही करायला लावण्याची जबरदस्ती करण्याचा प्रयत्न केला हे त्याला कळलं तर त्याला काय वाटेल ! त्यांनी तुला किती किती प्रकारे छळल ! काय वाटेल त्याला हे सगळं कळलं तर ? '

' त्याला कस कळेल हे सगळ ? ' सून हसत हसत म्हटलं, ' हृ, अशा छळाच्या गोष्टी त्यान लोकांकडून ऐकल्या असतील. पण त्या शभर टक्के खऱ्या आहेत हे त्याला तिकडे राहून कस समजणार ? '

त्या दोघी सभाषणात गुग आहेत हे पाहून थुय हळूच कुएनच्या मांडीवरून उतरली आणि तिच्या आईच्या शिवणकामाच्या पिशवी-कडे गेली. तिनं पिशवीतून एक छोटासा आरसा काढला. मग ती हळूच पलगाच्या एका कोपऱ्याकडे सरकली आणि भिंतीशी टेकून शांतपणे थोडावेळ आरशात त्या आपल्या प्रतिमेकडे पहात बसली. मग तिन आपल्या वडिलांचा फोटो हातात घेतला आणि काळजी-पूर्वक न्याहाळला. परत आपल्या आरशातल्या प्रतिबिंबाकडे पाहिल. आपलं नाक, डोळे, तोंड आपला प्रत्येक अवयव ती आपल्या वडि-लांच्या अवयवाशी पडताळून पहात होती. डोळे, भुवया त्यांत खास सारखेपणा नव्हता. तिचे डोळे गोल होते. तिच्या वडिलाचे लाबट होते. त्यांच्या भुवया दाट होत्या. वा, सापडलं ! तिच नाक आणि जिवणी तिच्या वडिलांशी एकदम मिळतीजुळती होती. आनदान थुयची छाती धपावू लागली. ती पुन्हा निरखून इतर अवयवाकडे पाहू लागली.

आपण आपल्या वडिलासारखं दिसाव अशी तिची फार फार इच्छा होती. तिला ते फार आवडतं. आपल्याला सुद्धा आपले स्वतःचे बाबा आहेत असे तिला ज्या दिवशी कळल त्या दिवसा-पासूनच तिच्या मनात ही इच्छा मूळ धरून होती. एकदम तिला खात्री वाटू लागली, जे जे बाबाच आहे ते ते सगळं फार चांगल आहे. जगातल्या इतर वस्तूपेक्षा बाबाना आपण जास्त आवडत असणार. त्याबद्दलही तिची खात्री पटली. आज सकाळी आईनं तिच्या हाती फोटो देऊन ' हे तुझे बाबा ' असं म्हणताक्षणी तिची लगेच खात्री पटली. कारण अर्थात दोन होती. एकतर आई आता-पर्यंत तिच्याशी कधीच खोटं बोलली नव्हती. दुसरं आणि अधिक महत्त्वाच म्हणजे फोटोकडे बघता क्षणी तिला वाटल आपण बाबांना कुठं तरी पाहिलं आहे. खरं म्हणजे आईनं जे जे सांगितल होतं त्या-वरून तिन आपल्या मनात बाबाची फक्त एक प्रतिमा उभी केली होती.

सूला एका गोष्टीच आयुष्यात नेहमीच फार दुःख वाटत आल होत. सॅन निघून गेल्यावर तिनं त्याचा एक फोटो आपल्या पाकि-टात जपून लपवून ठेवला होता. पण १९५६ मध्ये शत्रून तिला जेव्हा अटक करून जिल्ह्याच्या गांवी नेल तेव्हा घेतल्या गेलेल्या झडतीत तो त्यांच्या हाती पडला होता आणि त्यांनी त्याचे तुकडे तुकडे करून टाकले होते. थुयचा जन्म त्याच वर्षी झाला होता.

कुएनशी बोलता बोलता थुयच्या नकळत सू तिच्याकडे बघत होती. मग तिनं आपली नजर कुएनकडे वळवली. कुएनचं सुद्धा थुयच्या हालचालीकडे लक्ष होतं. तिला तर हसूच आवरत नव्हत. आपल्या तोंडावर हात ठेवून ती हसू दाबण्याचा प्रयत्न करीत होती. पण शेवटी तिला हसू आलच. मावशीच्या हसण्यानं थुय एकदम दचकली, लाजली आणि फोटो आणि आरसा छातीशी लावण्याचा प्रयत्न करू लागली.

सू हसली नाही. तिनं फक्त विचारलं—

' काय ग, दिसतेयेस का तू बाबांसारखी ? ' काहीही उत्तर न देता थुयन मान वळवली. तिचे डोळे पाण्याने भरले होते. हळूवार मनाच्या थुयला आता रडू येणार हे तिच्या आईने ओळखले. सूची आई सुद्धा एकदा सूला म्हणाली होती— ' तू सहा वर्षांची होतीस तेव्हा अगदी तुझ्या मुलीसारखी दिसायचीस. '

सू थुयला प्रश्न विचारीत होती पण तिचे स्वत.चे डोळेही, तिच्या नकळत भरून आले होते. न रहावून तिनं थुयला पोटाशी कवटाळले— आणि दोघीच्या डोळ्यांतून एकदमच अश्रू ओघळू लागले.

त्या दृश्याकडे पाहून कुएनच हृदय दाटून आल. ते अश्रू आन-दाश्रू होते हे खरच पण त्यांनी गेल्या वर्षानुवर्षांच्या कडू आठवणी आणि अपेक्षानाही जागं केलं होत. त्या कडू आठवणींनी आजच्या आनंदावर विरजण पडू नये अशी कुएनची इच्छा होती, म्हणून तिने आपल्या भावना आवरल्या आणि एकदम उठून उभी रहात ती म्हणाली— ' आपण एवढ्या कशा ग वेंधळ्या ? जेव्हा त्याची काही बातमी कळत नव्हती तेव्हा त्या कारणान रडत होतो. आता चागली बातमी कळली तरी आपल्या आपण रडतोच आहोत ? ' मग दाराकडे वळत ती म्हणाली, ' ठीक आहे. तुम्ही बसा इथच. तुमची हृदय मोकळी करीत. मी आईला शोधून काढते आणि प्रथम तिला ही बातमी सांगते. '

' आईला आधीच कळलय.' हुदके देत देत सू म्हणाली,—'आजच्या रात्रीच्या जेवणासाठी बंदरावर ती कोलबी पकडायला गेलीय. '

कुएन थबकली आणि सूला चिडवायच्या सुरात म्हणाली. ' अच्छा, अस्स आहे काय ? नुसत पत्र आल तर एवढा मेजवानीचा बेत. तो स्वत: घरी येईल तेव्हा तर आई नक्कीच डुक्कर कापील. '

' छे, छे पार्टी त्याच्यासाठी नाही. आज रात्री आपल्याकडे टामचान आणि गॅन येणार आहेत म्हणून—

' हां आठवलं आठवल. पार्टीच्या जिल्हा कमिटीच अधिवेशन आजच सकाळी सपल. टामचान आणि गॅन आज दुपारपर्यंत परत येणारायत. शेजारच्या गावातल्या गॅनच्या व्ही टीड तुकडीतल्या काही कॉम्रेडस्नी मला सांगितलं की टामचानची काही दिवसांसाठी आपल्या गावात नेमणूक झाली आहे. '

सू आता हुदके द्यायची थावली होती '-मला वाटत त्याची जिल्ह्याचा सेक्रेटरी म्हणून निवडणूक झाल्येय. खर का ग ! '

' अर्थात्, नुसता जिल्हा सेक्रेटरीच नाही, आंदोलन आणि प्रचार खाते याचाही तोच आता मुख्य आहे. मला वाटत, तो या सगळ्या जबाबदाऱ्या पेलायला लायक आहे. आठवत, त्या भयानक काळात जेव्हा जेव्हा शत्रुपक्षाचा हल्ला येई तेव्हा तेव्हा पार्टी त्याची इथे नेमणूक करी. त्याही काळात धीरोदात्तपणे न डगमगता तो सारं काम पहात असे. '

' खरंच, त्या दिवसात जेव्हा जेव्हा मी त्याला भेटे तेव्हा तेव्हा मला धीर येई. आता त्या प्रसंगाची आठवण आली की कौतुक वाटतं. क्रांतीच्या काळात आपल्या साध्यासुध्या शेतकऱ्यांनीही किती हुषारीनं कामं केली. टामचानचंच उदाहरण घे ना ! आई सांगत्ये ना फ्रेंचांच्या काळात तो विनमानमध्ये रहात असे. तो एक शेतकरी होता. पावसाळा आला की आपला आपली खोळ घेऊन शेतात हजर असायचा. पण ह्यावेळी सुद्धा तो एक चांगला सैनिक होता. खरंच जीव ओवाळून टाकावा त्याच्यावर. मी तुरुंगात होते ना तेव्हा तो मला पत्र पाठवायचा. मला धीर देणारी त्याची किती पत्रं आली होती. मला वाटतं मी ती तुला दाखविली होती नाही ? '

' हं, आठवतं. मी वाचली होती ती सगळी पत्रं. ' सू खटचाळपणे हसत हसत म्हणाली. ' टामचानं नसता ना तर तुझी आणि गॅनची मैत्री तुटणार होती. टामचाननं सर्व गोष्टीचा नीट खुलासा केला नसता तर आज तुझ्यावर रडत बसण्याची पाळी आली असती. '

कुएनच्या चेहऱ्यावर समाधानाचं हास्य झळकलं. कुएन स्वभावतःच हंसरी होती. कोणत्याच प्रसंगी तिचा चेहरा उदास दिसत नसे. मधल्या त्या महिन्यातच फक्त तिचा चेहरा उतरलेला लोकांनी पाहिला होता. त्यानंतरही तिचा उदास चेहरा कोणाला पहावयास मिळाला नव्हता.

सूनं चिडवल्यामुळं अठ्ठावन्न सालातल्या घटना कुएनच्या डोळ्यासमोर उभ्या राहिल्या. राचगिआ या गावी गॅनचा छापखाना होता. तो एका भूमिगत संघटनेचा गुप्त हस्तक होता. १९५५ मध्ये त्याच्यावर शत्रूची धाड पडली होती आणि त्याची रवानगी फूलोईच्या तुरुंगात झाली होती. दिएमच्या तुरुंगाधिकाऱ्यांनी आणि अमेरिकनांनी कैद्यांना विष घालण्याचा प्रयत्न केला होता. त्यातून कैद्यांमध्ये आणि तुरुंगाधिकाऱ्यांमध्ये चकमक झडली होती. शेवटी कैद्यांना लॉऱ्यात भरून समुद्रात बुडवून टाकण्याची योजना होती. अशाच एका लॉरीतून तो निसटला होता. आजूबाजूच्या शेतकऱ्यांनी मग त्याच्या हातकड्या तोडून त्याला लपवून ठेवलं होतं. आणि पळून जायला मदत केली होती. तिथून तो १९५९ च्या सुमारास हॉनडॉटमध्ये आला होता. त्यावेळी तो फक्त बावीस वर्षांचा होता. पण तो एकोणिशीचा असताना तुरुंगातच त्याला पार्टीचा सभासद करून घेण्यात आलं. तेव्हा पार्टीचं निशाणही तिथं नव्हतं. त्यानं कुएनला सांगितलं होतं–' वळलेली मूठ उंच उगारून मी मनातल्या निशाणालाच सलामी दिली होती. '

हॉनडॅटमध्ये त्याला तरुणांची संघटना बांधण्याचं काम दिलं गेलं होतं आणि त्या कामातच त्याची कुएनशी ओळख झाली होती. ती त्यावेळी फक्त १७ वर्षांची होती.

इतर अनेक गावांसारखा हॉनडॅटमध्येही त्यावेळी गो दिन दिएमच्या हस्तकांचा सुळसुळाट होता. एकदा कुएनच्या घराच्या लाकडी जमिनीखालच्या तळघरात गॅनला जवळजवळ दोन महिने लपून रहावं लागलं होतं. त्याच काळात त्यानं कुएनला क्रांतिकार्याचे पहिले धडे दिले होते. ती स्वतंत्रपणं काम करू लागणार न लागणार तोच शत्रूला त्याचा ठावठिकाणा कळल्याचा सुगावा त्याला लागला होता. आणि त्यानं त्याची जागा बदलली होती. मग तो स्मशानातल्या एका बनावट कबरीत जाऊन लपला होता. आजूबाजला



त्यानं कुएनला सांगितलं होतं

खरीखुरी थडगी होती. दररोज रात्री मग ती त्याच्यासाठी त्या थडग्यात जेवण घेऊन जात असे आणि कामासंबंधी बोलत असे. त्याच्याकडून सूचना घेत असे. कधी कधी ती त्याला केळी, आंबे अशी फळं घेऊन जाई. तो थडग्यातच आपले कपडे बदली आणि त्याचे पारोसे कपडे लपत छपत ती घरी घेऊन येई व धुऊन टाकी. एखाद्या दिवशी काही कारणानी तिला जाता आलं नाही तर तिची आई साऊ तिच्याऐवजी जाई. पण प्रत्येक वेळी साऊ जेव्हा तिथं जाई तेव्हां तिच्या डोळ्यात पाणी उभं राही.

एकदा साऊनं गॅनला विचारलं होतं–' गॅन आपल्याला या नरकयातनांना कल्पांतापर्यंत तोंड द्यावं लागणार का रे ? ते आपल्या लोकांची पोटं फाडून आतडी बाहेर काढतात. डोकी फोडतात. काल माझ्या मुलींना चिखलात हाडामासाचे तुकडे सापडले. परवाच्या दिवशी पकडलेल्या आणि मारझोड केलेल्या आपल्या सात लोकांच्या शरीराचे ते तुकडे होते.–' साऊला पुढं बोलवेना. तिचे शब्द हृदयात घुसमटलेल्या हुंदक्यात बुडून गेले.

' काय केलं त्या हाडांचं ? ' गॅननं विचारलं.

' माझ्या मुलींनी ते गोळा केले. एका कपड्यात गुंडाळले आणि एका गुहेत ठेवून दिले. ' साऊनं सांगितलं.

दुसऱ्या एका प्रसंगी साऊन गॅनचे हात आपल्या हातात घेतले होते. बोलू की नको बोलू अशा मनाच्या ओढाताणीत बराच वेळ गेल्यावर तिनं त्याला विचारलं होतं–' गॅन, तू मला माझ्या मुलासारखा आहेस. खरं खरं सांगशील ? तुला कुएनसंबंधी काय वाटतं ? तू तिच्यावर प्रेम करतोस का ? हे खरं असेल तर माझी तुमच्या लग्नाला परवानगी आहे. '

गॅननं यावर साऊचे हात घट्ट धरून ठेवले होते. कुएनवर त्याचं खरंच प्रेम जडलं होतं. पण साऊनं ह्यावेळी तिचं मन मोकळं केलं ह्याचंच त्याला बरं वाटत होतं. आजकाल शत्रू फार माजला होता. त्यामुळं त्याला ह्या अभद्र आणि चमत्कारिक जागेत स्वतःला

कोंडून घ्यावं लागत होतं. आणि अशा वेळी ही साऊ कुएनच्या लग्नाविषयी बोलत होती याचं त्याला समाधान वाटलं. एक तर या कृतीनं साऊचं त्याच्याविषयीचं प्रेम व्यक्त होत होतच पण त्यातूनही त्याच्या कार्याविषयी तिची आस्था आणि निष्ठाही त्यातून प्रकट होत होती. त्या अंधाऱ्या जागेत एकटा बसलेला असताना तो आश्चर्यानं विचार करी. उद्या मी कदाचित मारला जाईन या गोष्टीची साऊला काहीच चिंता का वाटत नाही ? ज्या माणसाचं जीवन असं काटयाकुटयानी भरलेलं आहे अशा माणसाच्या हाती आपल्या मुलीचं सौभाग्य सोपवताना तिला कसलीच भीती वाटत नाही ? कुएन तारुण्याच्या ऐन उंबरठ्यावर होती. सुंदर होती. सरकारी सैन्यातले इतर किती तरी तरुण अधिकारी तिच्याशी आपुलकीने वागत. ह्यॉन ट्रे च्या किनाऱ्यावर पोहण्यासाठी शहरातून येणाऱ्या तरुण श्रीमंत पोरांचीही कमतरता नव्हती. पण कित्येक प्रसंगी साऊनं आपल्या शेजाऱ्यापाशी आपले विचार व्यक्त केले होते–' माझी मुलगी मी असल्या पोरांना देणार नाही. '

तिला मागणी घालू पहाणाऱ्या ह्या असल्या तरुणांवर कुएनही वैतागत असे. पण रोज रात्री जेंव्हा ती स्मशानात पोहोचे तेव्हा तिचा सारा वैताग वितळून जाई आणि तिच्या आशांना नवे धुमारे फुटत. लहानपणी तिला त्या बाजूला यायची दिवसासुद्धा भीती वाटत असे. पण आता तिची भीती पार नाहीशी झाली होती. भुताखेताची काळजी करण्याची आता तिला मुळीच गरज वाटत नव्हती–ही पोलिसांची पाळत मात्र चुकवावी लागत होती. सुदैवान पोलिसांनी स्मशानाकडे पार दुर्लक्ष केलं होतं. म्हणून गॅनचे दोन महिने त्या जागेत सहज निघून गेले. नंतर तो जंगलातल्या दुसऱ्या गुप्त जागी निघून गेला.

एके दिवशी दुपारच्या वेळी तो त्या जागेतून बाहेर पडला आणि त्याचं दुर्दैव आडवं आलं. गावाच्या वेशीवरच काही लोकांनी त्याला पकडलं. त्याच रात्री जंगलातल्या त्या गुहेलाही वेढा पडला. सुदैवान अड्डयावरची सगळी माणसं खेकडे पकडण्यासाठी बाहेर गेली होती. सरकारी सैनिकांना गुहा रिकामीच आढळली.

' अड्डा इथे असला पाहिजे. नक्कीच. फक्त आपल्या येण्याचा सुगावा त्यांना लागला, आणि त्यांनी आधीच सू बाल्या केलेला दिसतोय. '

अर्धा तासपर्यंत सैनिक गुहेशेजारी दबा धरून वाट बघत बसले. कोणीच येताना दिसले नाही तेव्हा ते निघून गेले.

' गॅननच आपली माहिती दिली असणार. ' त्या अड्डयावरचा एक ह्या घटनेनंतर म्हणाला,

' दुसरा कोण असणार ?' दुसऱ्यानं दुजोरा दिला.

' काही कळत नाही बुवा पण खरं असावसं वाटतं. आपण त्याच्यावर विश्वास ठेवला. वास्तविक त्याला अटक झाल्यावर आपण तो अड्डा सोडून जायला हवं होतं. आपलं चुकलं आणि त्यानं सगळं त्यांना सांगितलं '

गॅनच्या अटकेच्या बातमीन कुएनला धक्का बसला. त्या पाठोपाठ त्यानं दगलबाजी केल्याची बातमीही तिला कळली. हा धक्का आणखी जबरदस्त होता. एकाच दिवशी हे दोन आघात तिच्यावर झाले. गॅन असा गुन्हा करील यावर तिचा विश्वासच बसेना. तिच्या बहिणीचा; आईचाही ह्या बातम्यांवर विश्वास बसेना. पण मग ही बातमी झपाटयानं आजूबाजूच्या पंचक्रोशीत पसरली. कुएनच्या प्रियकरानं शत्रूला गुप्त अड्डयाची जागा दाखविली. मोठ्या मनाची माणसं तिला सहानुभूती दाखवू लागली इतर तिच्याकडे कुत्सितपणे बघू लागली. एखाद्यानं बेसावधपणे डोक्यावर काठीचा फटका मारावा आणि एकदम डोळ्यापुढे काजवे चमकावे तसं तिला झालं. त्या दिवशी रात्रभर ती रडत होती. संपलं आपलं प्रेम, संपले ते संबंध या विचारानं तिला झोप आली नाही. मग एकदम आतापर्यंतची आपल्या प्रियकराची वागणूक तिला आठवली. आणि झोपेत ती ओरडली. ' नाही, नाही, खोटं आहे हे ! '

पण अफवा अधिकच पसरत होती. आणि तरीही आपल्या सदसद्विवेक बुद्धीच्या आणि गॅनवरील विश्वासाच्या आधारावर ती पुन:पुन्हा मनाला पटवीत होती की ती बातमी खोटी आहे.

पण मनाच्या या ओढाताणीत ती पार थकून गेली आणि एके दिवशी सरळ पार्टीचा सेक्रेटरी हाईथेप याच्यापुढे जाऊन उभी राहिली.

' मुली, घाबरू नकोस. शांत रहा ' त्याने तिला समजावले. ' कमिटी तपास करत्येय. सबळ पुरावा मिळाला नाही म्हणून अजून कोणताच निर्णय घेता येत नाही. ज्या गोष्टी कळल्या त्या इतक्या तोकडया आणि अपुऱ्या आहेत की त्याच्या आधारावर एका कॉम्रेडवर विश्वासघातासारखा गंभीर आरोप करणं शक्य नाही. आपण जागरूक राहिलं पाहिजे. पण शत्रू दुटप्पी प्रचार करीत असण्याची शक्यता नाकारता येणार नाही. मी तपास करतोय, काही कळलंच तर मी तुला कळवीन. '

कुएनच्या आशा परत थोडया पालवल्या. घरी आल्यावर ती सूला म्हणाली–' अजून काहीच नक्की कळलं नाही. पार्टीनं अद्याप काही निर्णय घेतला नाही. '

' मी म्हटलं नव्हतं तुला ? कुठून तरी एक साधी चिठ्ठी पार्टीच्या सभासदांना मिळाल्ये. जागरूक राहा. असा त्यात आदेश आहे. बस एवढंच. उगाच लहान मुलासारखी तू रडत राहू नकोस. जरा धीर धर. '

' ठीक आहे. तुझ्या आणि पार्टीच्या म्हणण्याप्रमाणे मी वागेन. माझं मन आता थोडं ताळ्यावर आलय. '

' शाबास. ' सू म्हणाली आणि थांबली. मग कुएनवर सरळ नजर रोखीत तिनं विचारलं–' पण हे पहा, गॅन घसरला नसेल तर ठीकच आहे पण त्याने खरोखर...मग काय करणार तू ?

कुएन बराच वेळ स्तब्ध होती. अखेर भग्न आवाजात संथपणे म्हणाली–' काय करणार ? करण्यासारखं काही मग उरणारच नाही; तो मला मेल्यासारखा होईल. माझ्या आयुष्यात कधी आलाच नव्हता असं मानावं लागेल. '

परंतु आठ दहा दिवसात जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणाहून टामचान गावात आला व त्यानं तिला बोलावणं पाठविलं. कुएन त्याच्यापाशी पोचताच त्यानं ऑर्डर दिली. ' हे बघ कुएन, आज मस्तपैकी कोंबडीचं जेवण करणार का आपल्यासाठी ? म्हटलस तर एक चांगली बातमी सांगीन. ' कुएनला समजायला वेळ लागला नाही. तिची छाती धडधडू लागली. एकदम पुढे होऊन तिनं त्याचा हात

घट्ट पकडला. ' खटयाळपणे त्यानं तिच्याकडे बघत पुन्हा विचारलं, ' काय कोंबडी कापणार की नाही ? कबूल कर. '

' कबूल, कबूल ' म्हणताना कुएन लाजली. मग टामचान तिला खोलीच्या एका कोपऱ्यात इतरांपासून दूर घेऊन गेला आणि हलक्या आवाजात म्हणाला, ' मला असं कळलंय की, इतके दिवस तू काळजीत पडली होतीस. उदास होतीस. खरं का हे ? ठीक, आता तुला वाईट वाटण्याचं काही कारण नाही. गॅननं तसं काही केलं नाही. '

तो थोडा थांबला. मग हातातल्या सिगरेटची राख झाडीत म्हणाला– ' आम्ही नुकतंच त्यांच्या काही हेरांना पकडलं. त्यांनी इतर अनेक गोष्टींबरोबरच गेल्या महिन्यातल्या त्या घटनेसंबंधी सुद्धा सांगितलं. आपल्या अड्ड्यावर हल्ला झाला त्याचं कारण गॅन नव्हे. त्यांचे काही हस्तक चुआ गावात एका उंच झाडावर बसून जंगलात येणाऱ्या–जाणाऱ्यांची टेहेळणी करीत होते. एके दिवशी दुपारी त्यांना झाडीतून धूर येत असताना दिसला. त्यांनी ते त्यांचा ऑफिसर झॅम याला कळवलं. बस्. नुसत्या धुराच्या सुगाव्यावरून त्यांनी छापा घातला. दुसरं काही नाही. '

मोठं ओझं उतरल्यावर सोडावा तसा कुएनने एक दीर्घ सुस्कारा सोडला.

' उलटपक्षी तुरुंगातल्या आपल्या बातमीदारांनी कळवलंय की' गॅन त्यांच्या धमक्यांना एकदाही बळी पडला नाही. बातमी मिळविण्यासाठी त्यांनी गॅनचा खूप छळ केला. पण गॅननं हूं की चूं केलं नाही. गॅन फितूर झाला अशी अफवा त्यांनी उठवली नव्हती. पण एकदा तशी अफवा उठल्यानंतर मात्र त्यांनी ती मुद्दाम खूप पसरविली. '

कुएनला खूप आनंद झाला. तसेच स्वतःची खूप निर्भर्त्सनाही करावीशी वाटली. एखाद्या कंजूष माणसाची पर्स चोरीला जावी आणि ती परत मिळाल्यावर त्यातली रक्कम वाढलेली आढळावी तसं तिला झालं. मनातील गॅनविषयीची कटुता आणि द्वेष एकदम नाहीसा झाला. कौतुकानं तिचं मन हळुवार झालं.

गॅन तिरस्करणीय तर नव्हताच, तर तिच्या अपेक्षेपेक्षाही अधिक चांगला होता. आता तिला तिच्या प्रियकराला सोडावं तर लागणार नव्हतंच. पण उलट तो तिच्या प्रेमाला अधिक लायक ठरला होता. अत्यानंदानं तिनं टामचानचा हात इतका जोराने हलवला, की जणू काय ती तो मुळापासूनच उखडून टाकणार होती. तिनं एक डोळा मागितला होता. तिला दोन मिळाले होते.

सर्वांत आश्चर्याची गोष्ट म्हणजे टामचाननं हे सांगितल्यावर पाचव्या दिवशी रात्री कोसळणाऱ्या पावसात भिजत गॅन स्वतः हॉन डॅटमध्ये परत आला होता ! अर्थात तो येईल अशी कोणालाच अपेक्षा नव्हती. रात्रीची झोपाझोप झाली होती. कुएनला एकदम





**‘ मला ताबडतोब नवीन अड्डयावर घेऊन चल ’...गॅन म्हणाला**

दारावर टकटक आणि त्याच्या पाठोपाठ तिला हाका मारल्याचा आवाज आला. प्रथम तर तिला आपण स्वप्नातच असल्याचा भास झाला. पण लगेचच तिनं त्याचा आवाज ओळखला. नक्की तोच होता. ‘ आई, कुएन दार उघडा. ’ आई उठत होती. पण कुएननं तिला हातानंच थांबवलं आणि ती स्वतःच उठली. अंधारातून कडी काढायला दाराकडे जाताना तिची छाती धडधडत होती. दरवाजा अर्धवट उघडताच नखशिखांत भिजलेला गॅन आत कोसळला.

‘ कुएन. ’ तो पुटपुटला.

‘ हां, गॅन. ’

‘ मी पळून आलोय. ते मला नदीवर नेऊन ठार मारणार होते. मी त्यांच्यावर लाथा झाडल्या आणि स्वतःच नदीत उडी घेतली आणि सग्ळ इकडे आलो. ’

‘ बापरे ’ म्हणत कुएननं त्याला घट्ट मिठी मारली. त्यानं तिला थांबवलं– ‘ मला ताबडतोब आपल्या नवीन अड्डयावर घेऊन चल. ते माझा पाठलाग नक्कीच करतील. ते कोणत्याही क्षणी इथं येऊन थडकतील. ’

थोडा विचार करून कुएननं म्हटलं– ‘ तू इथंच थांब. ’

‘ इथं कसा थांबू ?’ त्याला तिच्या सूचनेचं आश्चर्य वाटलं.

‘ मी सांगत्ये ना ? आपल्या जमिनीखालच्या जुन्या जागेत तू सुरक्षित राहशील. दुसरं म्हणजे आपल्या अड्डयाची जागासुद्धा आता बदललये. ‘ चल. ’ म्हणून तिनं त्याचा हात पकडला आणि ती त्याला आणखी विचार करू न देता आत ओढून नेऊ लागली.

गॅन तिच्या पाठोपाठ आला. तिच्या त्या शब्दां-मुळंसुद्धा त्याला थोडं सुरक्षित वाटू लागलं. त्या रात्रीत त्याच्या पाठलागावर कोणी आलं नाही. पण अधिक सावधगिरी घ्यायचं ठरवून कुएन त्याला दुसऱ्या दिवशी संध्याकाळपर्यंत भेटलीच नाही. दुसऱ्या दिवशी रात्री ती तळघरात आली. त्याला अटक कशी झाली. त्याचा किती आणि कसा छळ झाला. सगळं सगळं तिला त्याच्या तोंडून ऐकायचं होतं. एकीकडे तिनं त्याला कपडे काढायला लावले. साऊनं हिवतापावरच्या औषधाचा लेप केला होता. तो तिनं त्याच्या अंगाला लावला. त्याच्या उघड्या अंगावरून हात फिरवताना दिसलेल्या जखमा पाहून तिच्या डोळ्या-तून पाणी आलं. सू आणि आई त्याच्यासाठी कोंबडीचा रस्सा बन-वीत होती. त्याची ग्लानी अद्याप गेली नव्हती. पण तशाच अर्धवट ग्लानीत त्यानं त्याच्या अटकेनंतर काय काय घडले ते विचारलं. अफवासंबंधी त्याच्यापाशी बोलावं की नाही याचा थोडा वेळ मना-तल्या मनात विचार करून शेवटी कुएननं त्याला सारं सांगून टाकलं. अफवामुळं तिच्या मनाची झालेली चलबिचल ती सांगू लागली. तेव्हा तो एकदम उठून बसला. ‘ तुरुंगातल्या छळाचं काही नाही, पण कुएन तू सुद्धा–’

कुएननं बारीक सारीक तपशीलासह आपली त्यावेळची अवस्था त्याला समजावून देण्याचा प्रयत्न केला. तिचं सांगून झाल्यावर तो परत आडवा झाला. आणि आपल्या अंगावरचा तिचा हात झिडकारून पुटपुटला– ‘ हं असं आहे तर. एवढा महिना लोटला आणि मला काहीच कळले नाही. ’

मग एकदम अंथरुणावर उठून बसत त्यानं कुएनकडं रोखून’ बघत म्हटलं– ‘ हं, आणि तुलाही माझा तिरस्कार वाटला असेल ? कुएनच्या उत्तराची वाट न पहाताच तो परत आडवा झाला आणि शून्य नजरेनं आढ्यातल्या तळघराच्या लाकडी चोरदरवाजाकडे बघत राहिला. मग कुणा तिसऱ्याच माणसाशी बोलावं तसं बडबडला– ‘ गॅन जर असं वागला तर तू तुझ्या हातांनी त्याचा मुडदा पाड. पण गॅनच्या स्वप्नातसुद्धा अशी दगाबाजी करण्याचं कधी आलं नाही. मागच्या वेळेप्रमाणेच ह्यावेळीही मी माझे ओठ दाताखाली घट्ट दाबून ठेवले होते. त्यांनी छळ केला तेव्हा मी एवढंच म्हणालो– मला काही माहीत नाही आणि समजा मला काही माहीत असलंच तर मी ते तुम्हाला सांगणार नाही. बस. एवढंच मी त्यांना सांगितलं. ’

त्याच्या आवाजात तिरस्कार भरला होता. त्याला खरं तर म्हणायचं होतं– ‘ इतर लाखजण कसल्याही अफवेवर विश्वास ठेवोत पण तुला कशी माझी शंका आली ?’

कुएन गप्प होती. गॅन तिच्यावर यापूर्वी एवढा कधीच रागावला नव्हता. बराच वेळ शांततेत गेल्यावर तिनं धीर करून म्हटलं– ‘ पण मी कधीच त्यावर पूर्णपणे विश्वास ठेवलेला नव्हता. ’–

–‘ पूर्णपणे नाही. ’ तिला तोडीत गॅन म्हणाला. ‘ पण थोडा तरी विश्वास ठेवला होतास ना ?’

–नेमकी याचवेळी चोरदरवाजावर थाप पडली. सू सूप घेऊन येत होती. तिला तिच्या धाकट्या बहिणीच्या गालावर ओघळलेली आसवं स्पष्ट दिसत होती.

[ क्रमशः ]


तिकिट घेऊन प्रवास करणे
केंव्हांही स्वस्त असते
विना तिकिट प्रवास करण्याबद्दल किमान दंड रु. १०
मध्य रेल्वे
A.N.

## हैदराबाद मुक्तिसंग्रामातील अज्ञात कथा क्रमांक १२

**अशोक परळीकर**
**परभणी**

# हुतात्मा श्रीधर वर्तक

१५ ऑगस्ट १९४७. भारताला स्वातंत्र्य मिळाले. परदास्याचे जोखड झुगारून देऊन अनेक वर्षांनंतर भारत स्वतंत्र झाला. सच्या भारतीयाला याचा आनंद वाटणे स्वाभाविक होते. परंतु या आनंदाला दुःखाची किनार होती. कुटिल इंग्रजांनी जाता जाता या 'आसेतूहिमाचल' भारत वर्षाचे विभाजन केले. मुसलमानांचे स्वतंत्र राष्ट्र भारतभूमीचा तुकडा पाडून निर्मिण्यात आले. त्यामुळे स्वातंत्र्याच्या आनंदाबरोबरच फाळणीचे दुःखही भारतीयांच्या चेहऱ्यावर जाणवत होते. त्यातच नवनिर्मित पाकिस्तानात हिंदूवर होणाऱ्या भीषण आणि राक्षसी अन्यायाच्या कथा रोज धडकायच्या. पाकिस्तानातून लक्षावधी हिंदू आपले सर्वस्व सोडून भारतात आश्रयार्थ येत होते. स्वातंत्र्याच्या पार्श्वभूमीवर अनुभवावयास येणारे हे प्रसंग कसे होते?

हैदराबादकरांचे हाल तर कुत्राही खात नव्हता. भारत स्वतंत्र झाल्याचा आनंद मानावा, नवनिर्मित पाकिस्तानाबद्दल दुःख मानावे का हैदराबाद स्वतंत्र ठेवून, इस्लामी राज्य स्थापन करू इच्छितो म्हणून निझामाचा राग मानावा? निझाम भारतीय संघराज्यात सामील व्हावयास तयार नव्हता. 'आज शतकानुशतके आम्ही हिंदूवर राज्य केले आहे. आम्ही शासक आहोत, ते आमचे गुलाम आहेत' ही त्याची व त्याच्या अन्य सल्लागार मित्रांची भूमिका. इस्लामी राज्य हैदराबादेत स्थापन करावयाचे म्हणजे बहुसंख्य हिंदूंना भयभीत करावयाचे, त्यांचा आवाज बंद करावयाचा, त्यांना निःशक्त, शस्त्रहीन करावयाचे, त्यांना पिडावयाचे, हिंदू आयाबहिणींवर बलात्कार करावयाचा, त्यांना लुटायचे, हिंदूंना कापावयाचे, त्यांचे मनोधैर्य, साहस, पराक्रम, प्रतिकारशक्ती, आर्थिकशक्ती, या सर्वांचे हरण करून, त्यांना असहाय्य, निर्बल, अशक्त बनवायचे आणि मग सुखेनैव स्वतंत्र इस्लामी राज्याचा उपभोग घ्यावयाचा—असा डाव निझाम आणि त्याचे जात्यंध सहकारी योजीत होते.

निझामाच्या या कल्पनेला उचलून धरण्यासाठी—नव्हे हैदराबादला स्वतंत्र इस्लामी राज्य बनविण्याचे त्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी, हैदराबाद राजकारणात कासिम रझवीचा उदय झाला. एक फडतूस माणूस, पाहाता पाहाता, निझामाच्या नाकातला बाल बनला. निझामाला या माणसाबद्दल भलतीच आत्मीयता वाटू लागली. आपले स्वप्न पूर्ण व्हावे म्हणून 'अल्लाने' हा खास 'प्रेषित' पाठविला असे त्याला मनोमन वाटू लागले. त्याने कासिम रझवीस अमर्याद सत्ता बहाल केली. कासिम रझवी हा अत्यंत महत्त्वाकांक्षी, धर्मांध, दुष्ट परंतु संघटनाकुशल होता. त्याने मुसलमानांची एक लष्करी संघटना उभारली. त्याची कवायत घेण्यात येई. त्यांना शस्त्रास्त्रांची माहिती दिली जाई. प्रत्यक्ष शस्त्राचा उपयोगही करविला जाई. या रझाकारांच्या सहाय्याने कासिम रझवीने—आता तो फिल्डमार्शल सालारे आझम-झाला होता—हैदराबाद राज्यात दहशत निर्माण करण्याचे कार्य सुरू केले. जाळपोळ, मारकाट, अन्याय, अत्याचार, बलात्कार—इत्यादींना ऊत आला. निझामाचे राज्य नावापुरतेच होते. राज्यात कासिमरझवी आणि त्याच्या रझाकार संघटनेच्या रूपाने राक्षसाचेच राज्य अस्तित्वात आले होते. हिंदूंचा नायनाट करण्यासाठी जमेल ते सर्व या संघटनेने, निझामी पोलीस दल आणि सैनिकाने केले. परंतु जसजसे अन्याय वाढू लागले, अत्याचारांनी भीषण रूप घेतले, बलात्कार खून यांनी हैदोस घातला तसतसे हिंदूंचे रक्त तापले. मरायचेच आहे ना, मग प्रतिकार करून का मरू नये? अशी एक भावना हिंदूंत बळावली. विलग विलग दिसणारे हिंदू, अठरा पगड जातीमध्ये विखुरलेला हिंदू समाज, मरायचेच तर विरोध करून मरू, लढा देऊन मरू या जिद्दीने एकत्र आला. निझामाला आणि कासिम रझवीला वाटले त्यापेक्षा अनपेक्षित घडत चालले. अन्याय-अत्याचार वाढले की प्रतिकाराची भावना वाढीस लागते. हिंदू एकत्र आले आणि त्यांनी संघटितरित्या प्राणपणाने निझामी सत्तेला तडाखे द्यायला, सुरुंग लावावयाला आरंभ केला. पाशवी अत्याचार करणाऱ्या सत्ताधाऱ्याविरुद्ध उभे रहाणे म्हणजे आत्महत्त्या हे माहीत असून सुद्धा स्वातंत्र्यप्रेमाने झपाटलेले अनेक तरुण, वेगवेगळ्या स्तरातले, वेगवेगळ्या जातीपक्षाचे, शिक्षित-अशिक्षित 'हैदराबादला पारतंत्र्यातून मुक्त करायचेच'

या ध्येयाने एकत्र आले. 'देशास्तव मेलो तर जाईन स्वर्गात, जगलो तर भोगीन मी सौख्य स्वराज्यात' अशी भूमका या ध्येयवेड्या तरुणांनी घेतलेली होती. अशा तरुणांपैकी होते एक तडफदार, उत्साही, साहसी, पराक्रमी तरुण श्री. श्रीधर वर्तक.

श्रीधर वर्तकांचा जन्म एका मध्यमवर्गीय ब्राह्मण कुटुंबात झाला. स्वभावानं तो अत्यंत गरीब आणि सालस होता. तसाच बाणेदार आणि स्वाभिमानी होता. स्वतःहून कोणाच्याही वाटेला जावयाचे नाही हा त्याचा बाणा. अकारण खुसपट काढणार नाही, अकारण खोड्या करणार नाही. आपण बरे, आपले काम बरे हा त्याचा खाक्या. जिवाला जीव देणारासच्चा मित्र म्हणून तो मित्रपरिवारात अत्यंत प्रिय होता. त्याची शरीरयष्टी भारदस्त नव्हती. तारुण्यातही म्हणावे तसे अंग भरले नाही. परंतु एकूण तब्येत चांगलीच होती.

विवेक वर्धिनी हायस्कूलमध्ये त्यांनी शिक्षकाची नोकरी पत्करली. भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि इकडे निझामी राज्यात निझामी पोलिसांचा आणि रझाकारांचा हैदोस सुरू झाला. रोज नव्या नव्या वार्ता कानावर येत. एरवी शांत आणि आनंदी वर्तक गंभीर होत. 'काय वर्तक, काय झाले?' एखाद्या सहकाऱ्याने विचारल्यास 'छे! छे! कुठे काय?' म्हणून म्हणावयाचे. परंतु अंतर्यामी कशाचे तरी मंथन चालावयाचे. मनातली खळखळ कधीकधी चेहऱ्यावर दिसावयाची. आपण काहीतरी केले पाहिजे असे त्यांना वाटे. पण काय करावे हे मात्र समजत नसे. विवेक वर्धिनी मधील शिक्षकांनी बसविलेल्या आणि सादर केलेल्या आचार्य अत्रे लिखीत ऐतिहासिक नाटक 'वीरवचन' मध्ये त्यांनी विनोदी भूमिका फारच उत्कृष्ट केली होती. (प्रस्तुत लेखक तेव्हा त्याच शाळेत विद्यार्थी होता. ती भूमिका पाहाण्याचे भाग्यही त्याला लाभले.) या नाट्यप्रयोगानंतर वर्तकांचे मन शाळेत लागेना. कानावर येणाऱ्या अत्याचाराच्या वार्तांनी ते विचलित होत. रझाकारी संघटना, निझामी पोलीस आणि सैन्य यांना काटशह देण्यासाठी आपल्याला काय करता येईल? ते रोज मनाला हा प्रश्न विचारीत. त्यांच्या भावनाप्रधान मनावर या अत्याचारांच्या वार्तेने गंभीर जखम केली होती. शेवटी त्यांनी निश्चय केला आणि हैदराबाद मुक्तिलढ्यात एक सैनिक म्हणून बेदरकार उडी घेतली. मुसलमानांच्या अन्यायाने, निझामाच्या स्वप्नाने ज्यांची झोप उडाली, ज्यांनी लढ्यात निश्चयाने, भाग घेतला आणि प्रसंगी प्राणावर बेतलेले दिसूनही कार्य केले त्यापैकी श्रीधर वर्तक एक होत.

तत्कालीन लढ्याचे स्वरूप दुहेरी होते. (१) शांततामय आंदोलन–सत्याग्रह, (२) सशस्त्र चळवळ–निझामी पोलीस ठाण्यावर हल्ले चढवणे, रझाकारांशी लढा देणे, हिंदू प्रजेचे मनोबल वाढवणे यासम. ही सशस्त्र चळवळ, निधड्या छातीचे, मरणाची तमा न बाळगणारे तरुण यशस्वीरीत्या चालवीत होते. हैदराबाद राज्याच्या सीमेवर किंवा सीमेपलीकडे या सशस्त्र सैनिकांचे कॅम्पस् असत. प्रत्येक कॅम्पचा प्रमुख कृतिसमितीची योजना, तळहातावर शिर घेऊन, पूर्णत्त्वाला नेण्यासाठी आपल्या सहकाऱ्यांसह धडपडे. कॅम्पस्‌मधील शिस्त केवळ अपूर्व होती. या सैनिकांनी स्वयंस्फूर्तीने शिस्तीचा स्वीकार केला होता. सर्वजण एकाच विचाराने, एकाच ध्येयाने झपाटलेले, त्यामुळे कोणतीही तक्रार नव्हती. अर्जुनाला, द्रोणाचार्यांनी घेतलेल्या परीक्षेत, जसा फक्त पक्षाचा डोळा दिसला–लक्ष्यच दिसले, तसे या सैनिकांना फक्त, निझामी अन्याय्यसत्ता उलथवून लावण्याचे लक्ष्यच दिसे.

चिंचोळी कॅम्पमध्ये श्रीधर वर्तकांसारखे अनेक उत्साही, धाडसी, पेटल्या रक्ताचे तरुण होते. त्यांना जोखमीचे कार्य करण्याची इच्छा होती. त्यांचे हात शिवशिवत होते.



शेंद्री पोलीस ठाण्यावर भर दिवसा हल्ला

लवकरात लवकर ही अन्याय्यसत्ता संपुष्टात यावी म्हणून जबरदस्त धडक देण्याची इच्छा होती. हा कॅम्प शस्त्रदृष्टया सुसज्ज, निभिड सैनिकानी युक्त असा होता. आज–उद्या आदेश येईल म्हणून अत्यंत उत्साहाने ते वाट पहात. परंतु कृतिसमितीचा आदेश त्याना येईना. नुसते स्वस्थ बसणे त्याना मानवण्यासारखे नव्हते. सर्व तरुण बेचैन आणि उतावीळ झालेले होते आणि त्यात एके दिवशी 'आगळगाव' कॅम्पने ऐंशी–शभरएक मैल आत जाऊन वर्दापूर ठाणे काबीज केल्याचे वृत्त आले. आगळगाव कॅम्पच्या या विजयाने सर्वांना आनंद झाला. निझामी सत्तेला बसलेल्या धक्क्याने सैनिक सुखावले. 'वंदे मातरम्', 'भारतमाता की जय', 'म. गांधीकी जय' हा निनाद दुमदुमला. हे कौतुक अनुभवीत असता 'चिंचोली' कॅम्पवाल्याना आपल्याला संधी मिळेना याचे दु:खही वाटले. इतराच्या पराक्रमाचे गोडवे गाऊन काय होणार? इतरांच्या धाडसाचे पोवाडे गाऊन काय मिळणार? किती दिवस हे मिळमिळीत जिणे अनुभवावयाचे? केवळ अधूनमधून सरहद्दीच्या आत जावयाचे, लोकाना धीर द्यावयाचा, कृतिसमितीचा कार्यक्रम पार पाडावयाचा, योगायोगाने रझाकाराशी गाठभेट पडली तर दोन हात करावयाचे–बस्स! हा सारा प्रकार त्याना आळणी वाटू लागला. आपण पराक्रमी आहोत, धाडसी आहोत, विश्वासू आहोत, प्रशिक्षित आहोत–मग आपणावर एखादी जबाबदारी का टाकण्यात येत नाही? आपण जबाबदारी स्वीकारण्याइतपत, पार पाडण्याइतपत, लायक नाही आहोत काय? आपल्यात कोणती उणीव आहे? आपल्यावर, आपल्या कर्तृत्वावर विश्वास का टाकण्यात येत नाही? आपण फक्त इतराचे पराक्रम पहाणार का? तरुण सैनिकांचे मन अत्यंत नाराज झाले, विषण्ण झाले. काही जणाच्या लक्षात सैनिकाची मन:स्थिती आली. त्यानी धाडसी योजना सुपूर्त करू म्हणून आश्वासन दिले. एवढेच नव्हे तर त्या दृष्टीने हालचालही सुरू झाली. स्वातंत्र्यसैनिकांना स्वपराक्रम दाखविण्याची संधी मिळणार म्हणून आनंद वाटला. श्री. वर्तकांना तर अत्यानंद झाला. अटीतटीचा लढा द्यावयाचा, रक्त सांडले, देह पडला तर उत्तमच. देशासाठी मरणाऱ्याचे रक्त वाया जात नसते. रक्ताच्या एकेका थेंबातून स्फूर्ती घेऊन असंख्य सैनिक लढतील आणि निझामाची सत्ता संपुष्टात आणतील. स्वर्गी स्वागतासाठी देवदेवता येतील. पारतंत्र्यातल्या जिण्यापेक्षा स्वातंत्र्यासाठी मरण श्रेयस्कर–' एक ना दोन असे अनेक विचार वर्तकांच्या मनात आले. कृतिसमितीच्या आदेशाची ते आणि अन्य सर्व सहकारी उत्सुकतेने वाट पाहू लागले

श्री. राघवेंद्रराव दिवाण यांनी चिंचोळी कॅम्पमधील प्रमुखाशी चर्चा केली आणि शेंद्री येथील पोलीस ठाण्यावर हल्ला करून तो हस्तगत करावयाचा अशी योजना निश्चित केली. निझामी पोलीस हे प्रत्यक्षाप्रत्यक्ष रझाकाराना सहाय्य करीत तेव्हा त्यांना हुसकावून लावून, निदान व्यवस्थित ठोक देऊन, परतायचे असा कार्यक्रमही असावयाचा.

पोलीस ठाणे, मुक्काम शेंद्री, लक्ष्य ठरले. योजनेचा आराखडा आखण्यात आला, जुळवाजुळव सुरू झाली. कोणत्या सैनिकाना या मोहिमेत घ्यावयाचे? सर्वांनाच भाग हवा होता. सर्वांचेच बाहू स्फुरण पावत होते. काहीतरी पराक्रम गाजवावा असे प्रत्येकाला वाटत होते. मरणाची तमा नव्हतीच सैनिक म्हणून येतानाच 'समाधी' बांधून ते निघाले होते. निवड करणे अत्यंत कठीण. प्रत्येकजण तेवढाच धाडसी, पराक्रमी. लक्ष्य ठरले असे कळताच प्रत्येकाला आनंद झाला. या मोहिमेत भाग घ्यावयाचा, पराक्रम दाखवावयाचा म्हणून प्रत्येकजण सिद्ध झाला. चिंचोली कॅम्पवरील नैराश्याचे ढग विरले आणि नवचैतन्याचे वारे वाहू लागले.

सैनिकाची निवड करण्यात आली. आपणाला संधी मिळाली नाही म्हणून काही सैनिक नाराज झाले. पण रागावले नाहीत. निवड झालेल्या लोकाच्या आनंदाला तर पारावार नव्हता. ज्या संधीची ते वाट पहात होते ती संधी आज चालून आली होती. श्रीधर वर्तक आणि अन्य सर्वांनी इतरापेक्षा आपल्या मोहिमेचे वेगळेपण असावे असा आग्रह धरला. बरीच चर्चा झाली आणि शेवटी शेंद्री येथील पोलीस ठाण्यावर भरदिवसा हल्ला करावयाचा असे ठरले. बेत आणि निर्णय धाडसी खरा. परंतु एकाने, असा हल्ला करण्यापूर्वी, योग्य वाटल्यास, नुकतीच यशस्वी मोहीम केलेल्या कॅम्पप्रमुखाचा सल्ला घ्यावा असे ठरविले. अर्थात मानापमानाचा प्रश्न नव्हता. सर्वजण एकाच ध्येयाने, एकाच वेडाने झपाटलेले. आलेली सूचना स्वीकारण्यात आली आणि आगळगाव कॅम्पप्रमुखाशी विचारविनिमय केला जावा हे नक्की ठरले. पण कसे? तर हल्ल्याच्या सर्व तयारीनिशी जावयाचे, वाटेत आगळगाव कॅम्पप्रमुखाशी चर्चा करावयाची आणि थेट शेंद्रीला जाऊन पोलीस ठाण्यावर धडकायचे. भलतीच घाई झाली होती.

'आगळगाव' कॅम्पवर लवाजम्यासह 'चिंचोळी' कॅम्पप्रमुख आले. योजनेची कल्पना देण्यात आली अनेक बाबी 'आगळगाव' कॅम्पवाल्यानी उपस्थित केल्या. ज्या ठिकाणावर हल्ला करणार त्या ठिकाणाची कितपत माहिती आहे? जवळपास आश्रय घेण्याजोग्या जागा आहेत काय? आजुबाजूला मित्राची घरे आहेत का? गावात मित्र आहेत का? शत्रूपक्षाची तयारी कितपत आहे? गावात रझाकार किती आहेत? आपले हितचिंतक किती आहेत? 'चिंचोली' कॅम्प एकमेकाकडे पाहू लागला. व्यवस्थित माहिती कोणीही मिळविली नव्हती. योजना मोठी होती. परंतु तयारी? तेव्हा आत्महत्या केली जाऊ नये असा सल्ला दिला गेला. अपयश पदरात घेण्यात अर्थ नाही. तेव्हा हा विचार बाजूला सारावा आणि दुसरी योजना नीट आखावी असे सांगण्यात आले. परंतु या विचाराने सैनिकाच्या उत्साहावर विरजण पडले. तेव्हा शेंद्रीपर्यंत जाऊन माहिती घ्यावी आणि शक्य असल्यास तातडीने हल्ला करावा अशा विचाराने आगळगाव कॅम्पमधील काही सैनिक आणि प्रमुखासह हा लवाजमा पुढे सरकला. शेंद्रीपासून काही अंतरावर ट्रक थांबला. सैनिक तिथे उतरले. आता हल्ला करावयाचा म्हणून मोठ्या उत्साहाने ते गावाकडे वळले. परंतु 'अविचाराने हल्ला करण्यात अर्थ नाही. तेव्हा हल्ला न करताच आपणास परतावयाचे आहे' असे प्रमुखाने जेव्हा सांगितले तेव्हा सैनिकाचे चेहरे बघण्यासारखे झाले. हातातोंडाशी आलेला घास अशा रीतीने काढून घेतला गेला म्हणून ते खट्टू झाले. नसतेच परत जाणे त्यांना बरे

वाटेना. शेंद्रीबद्दल माहिती नाही. परंतु अपसिंगाबद्दल माहिती आहे. तेव्हा तेथील पोलीस ठाण्यावर आणि रझाकारांवर हल्ला करावा असे एकाने सुचविले. पोलीस आणि रझाकार मिळून शे-दीडशे आहेत–आराखडा आणि योजना तयार आहे. माहितीचे लोकही बरोबर आहेत. तेव्हा अपसिंग्यावर हल्ला करावयास हरकत नाही. शिवाय यापूर्वी गौडगाव कॅम्पच्या सैनिकांनी प्रयत्न केला होता. ते जाऊन परत आल्यामुळे शत्रू बेसावध असेल–इत्यादी विचार समोर आले. भवती न भवती होऊन अपसिंग्यावर हल्ला करावयाचा हे नक्की ठरले. 'शेंद्रीची मोहीम नाही तर नाही निदान अपसिंगा सही–' म्हणून सैनिक सुखावले. हा लवाजमा आगळगाव कॅम्पकडून गौडगाव कॅम्पकडे वळला.

'तेथील लोकांनी शंकाकुशंका काढल्या आणि या शंकाकुशंकांनी सैनिक भलतेच नउमेद व्हावयास लागले म्हणून उपसिंग्यावर चढाई करायची–परिणाम काय वाटेल तो झाला तरी–असा निर्णय घेण्यात आला. अपसिंग गावात पोलीस आणि रझाकार तयारीत आहेत. स्वारी झालीच तर यशस्वी टक्कर देता यावी म्हणून खंदक खणलेले आहेत, मोर्चे बांधलेले आहेत–शिवाय भाग डोंगराळ–स्वाभाविकपणेच परिसर दऱ्या, कपारी आणि घळींनी युक्त. तेव्हा रात्री शत्रू सावध असणार म्हणून भल्या पहाटे हल्ला करावयाचा असे ठरले. सैनिकांना विश्रांती घेण्यास सांगण्यात आले.

सकाळी २–२॥ लाच सर्व सैनिक जागे झाले. थोडचाच वेळात ते तयार होऊन आले. ट्रकचा प्रवास सुरू झाला. अपसिंगाजवळ आले. तसे ट्रक्स थांबले. सैनिकांना उरलेले अंतर पायी जावयाचे होते.

रग जिरली नाही म्हणून उतरलेल्या चेहऱ्यांनी सैनिक कॅम्पबाहेर पडले. अर्थात् योजनेप्रमाणे कॅम्पवर ताबा मिळवला याचे समाधान त्यांना होतेच. तोच त्यांच्या कानावर समोरच्या दर्ग्यातून घोषणा आल्या आणि मागोमाग गोळ्यांचा पाऊस. स्वातंत्र्य सैनिक उघड्यावर तर रझाकार आणि पोलीस एका मजबूत इमारतीच्या आश्रयाला. त्यांचे ठिकाण सुरक्षित तर स्वातंत्र्यसैनिक गोळ्यांच्या माऱ्यात. मोठी विचित्र परिस्थिती निर्माण झाली.

वर्तकांनी दात ओठ खाल्ले. आता माघार नाही. आपल्याही सैनिकांना त्यांनी फायरचा आदेश दिला. परंतु समोरचा दर्गा उंचावर होता. शत्रू यांना अचूक हेरु शकत होता–टिपू शकत होता. बरे! शत्रूच्या गोळीबारांनी संपूर्ण रस्ता अडवलेला. माघार घ्यावी, निसटावे, तरी अशक्य. मृत्यूने त्यांची कोंडी केली होती. निदान आपल्या सहकाऱ्यांना सुरक्षितता लाभावी, त्यांना निसटता यावे म्हणून वर्तकांनी आपल्या सैनिकांना माघार घेण्यास सांगितले. परंतु ते स्वतः मात्र गोळीबार करीतच राहिले. आपली सहजासहजी सुटका होणार नाही हे त्यांच्या लक्षात आले, तेव्हा त्यांना हसू आले. 'देशास्तव मेलो जरी जाईन स्वर्गात, जगलो तर भोगीन मी सौख्य स्वराज्यात–' मनावर विचार तरळले. त्यांनी गोळीबार चालूच ठेवला. त्यांचे कांही सहकारीही त्यांना यथोचित मदत करीत होते. काही माघार घेण्यात यशस्वी झाले होते. दोन्ही बाजूंनी गोळ्यांचा पाऊस पडत होता. वर्तक उत्साहाने लढत होते. त्यांचे सहकारी त्यांनीही निसटण्याचा प्रयत्न करावा म्हणून सांगत होते. परंतु वर्तकांच्या अंगात वीरश्री संचारली होती. त्यांना आता देहभान उरले नव्हते. शत्रूपक्षाचे लोकही वर्तकांचा त्यावेळचा अवतारा पाहून भ्याले. स्तिमित झाले. ती लढाई वर्तकांच्या दृष्टीने स्वर्गारोहणाची होती. त्यांना मृत्यूची चाहूल लागली होती. त्यांनी मनाची तयारी केली होती. एकाग्र चित्ताने ते शत्रूवर गोळ्यांचा मारा करीत होते. त्यांच्याकडील गोळ्या संपल्या म्हणून सहकाऱ्याकडून गोळ्या घ्याव्यात म्हणून वर्तक वळले. त्यांचे चित्त क्षणभरच विचलित झाले. नेमक्या याच संधीची वाट पाहाणाऱ्या सावध शत्रूनी त्यांच्या वर ठरल्याप्रमाणे तीन विभागात 'सैनिक पुढे निघाले. श्री. वर्तक यांनी आपल्या सहकाऱ्यांसमवेत कॅम्पवर हल्ला करावयाचा आणि अन्य दोघा प्रमुखांनी आपापल्या सैनिकांसह आपल्या लक्ष्याकडे कूच केले.

वर्तक आपल्या सैनिकांसह कॅम्पकडे निघाले, दबत दबत, आवाज होऊ न देता ते सर्व आपला मार्ग आक्रमीत होते. 'देशास्तव जरी मेलो जाईन स्वर्गात–जगलो तर भोगिन मी सौख्य स्वराज्यांत'–मनातील हे गीत पावलांच्या लयीत आणि होणाऱ्या हळूवार आवाजाच्या सुरात आठवले जाऊ लागले.

अजून अंधारच होता. परंतु अंधारास सरावलेल्या डोळ्यांना मार्ग दिसत होता.




सैनिकांची पावले निश्चयाने लयबद्ध पडत होतो. होता होता ते सर्वजण कॅम्पजवळ आले. वर्तकानी आपल्या सहकाऱ्याकडे पाहिले. सर्वांच्या चेहऱ्यावर अमाप उत्साह, विलक्षण तेज जाणवत होते. आता हळुहळू प्रकाशाने आपली पावले पृथ्वीवर पसरावयास सुरवात केली होती. सर्वांनी वर्तकांकडे पहिले अधुक प्रकाशात वर्तकाच्या चेहऱ्यावरील भाव सहकाऱ्यानी टिपला. त्यात त्याना सदेश दिसला. 'काळजी करू नका. धडक द्या. देशासाठी मेलात, स्वर्गात जाल, जगलात तर स्वराज्यात रहाल' उठा'–

ठरलेली वेळ झाली. कॅम्पवर चौफेर हल्ला करण्यात आला. गोळयाचा पाऊस कॅम्पवर पडला, पण आतून उत्तर नाही. काही अदाज लागेना. शेवटी हिम्मत करून काही सैनिक पुढे सरसावले. सावधपणे ते ठाण्यापर्यंत गेले. आतली काहीच हालचाल नाही. सर्वजण खलास झाले की काय म्हणून सैनिक ठाण्यात शिरले तर ४–५ जण मरून पडलेले दिसले म्हणजेच बाकीचे पळाले, पण केव्हा? निदान शस्त्रे, दारूगोळा? त्याचाही पत्ता नाही. आपली फसवणूक झाली हे सैनिकाच्या लक्षात आले रिकामा कॅम्प शत्रूंनी या सैनिकाना 'नजर' केला होता. अर्थातच हल्ल्याची पूर्वसूचना शत्रूंना होती. शत्रू सावध होता–आहे–दबा धरून बसलेला आहे हे सर्वाच्या ध्यानी आले.

या हल्ल्याची पूर्वसूचना शत्रूना मिळाली होती. त्यानी कुमक मागविली होती. आणि कॅम्पमधील सामानसुमानासह सर्वजण एका मजबूत अशा दर्ग्यात आश्रयाला गेले होते. गोळयाचा चौफेर वर्षाव केला. एक गोळी वर्तकाच्या जिव्हारी लागली आणि स्वर्गाची अभिलाषा धरणारे वर्तक रक्तबबाळ होऊन धरणीवर कोसळले. त्यांचा आत्मा मुक्त झाला. स्वर्गी देवदेवतांनी त्याचे अपूर्व स्वागत केले. त्याची इच्छा पूर्ण झाली. त्यांना लढता लढता मरण आले. वीरमरण प्राप्त झाले.

आत्मा कुडीतून मुक्त झाला परतु शरीर मागे राहिले. वर्तक पडले हे पाहाताच सैनिक दुःखी झाले. परतु ती वेळ दुःखाची–दुःख करण्याची–नव्हती. वर्तक पडल्याचे शत्रूना दिसले तेव्हा दर्ग्यातून 'शाहे उस्मान झिंदाबाद,' 'आझाद हैदराबाद दाइंदाबाद' आदी घोषणा देण्यात आल्या. वर्तक पडल्यामुळे शत्रूपक्षाला चेव आला. त्यानी अत्यत उत्साहाने गोळयाची बरसात चालविली. आपल्या सैनिकाना काय करावे काही सुचेना. आता केवळ माघार घेणेच नव्हे तर वर्तकाचे प्रेतही घेऊन जाणे अत्यावश्यक होते. आपल्या या परमवीराचे शरीर शत्रूला मिळू द्यावयाचे नाही, त्याची विटबना होऊ द्यावयाची नाही म्हणून काही जणानी प्रेत उचलून माघार घेण्याचा प्रयत्न चालविला. परतु आज त्याचे नशीबच त्याच्यावर रुसले होते. त्याची चौफेर कोंडी झाली तेव्हा प्रेताला खाली ठेवून, सुरक्षिततेसाठी आसरा शोधणे आणि लढा देणे त्याना क्रमप्राप्त होते. शत्रूसैनिकाची तयारी जबरदस्त होती. ते पुढे पुढे येतच होते. वर्तकाचे प्रेत पडले होते तेथे येताच रझाकार आणि पोलिसाना आसुरी आनद झाला. 'दुश्मन जिंदा न सही उसका मुडदा हाथ आ गया। चलो ले चले!' एकाने सागितले. सर्वांनी होकार दिला. इकडे शत्रू वर्तकाच्या प्रेताभोवती असताना आपले सैनिक माघार घेण्यात यशस्वी होऊन ट्रक्सपाशी आले. वर्तकानी जिवंत असताना आपल्या सहकाऱ्याना माघार घेणे शक्य व्हावे म्हणून शत्रूपक्षावर अचूक गोळीबार केला होता– आणि आताही त्याचे निष्प्राण कलेवर, आपल्या उरल्या सहकाऱ्याना वाट मोकळी व्हावी म्हणून, शत्रूला गुंतवण्यात यशस्वी झाले होते. वर्तकाचे प्रेत शत्रूच्या हातात पडले होते याचे दुःख मात्र सर्वच सहकाऱ्याना झाले होते. पण काय करणार? त्याची जबरदस्त फसवणूक झाली होती.

वर्तक आणि त्याच्या सहकाऱ्याच्या माऱ्यामुळे शत्रूचीही बरीच हानी झाली होती. त्यामुळे ते भयकर चिडले होते. आपल्याकडचे १७–१८ रझाकार–पोलीस पडावेत आणि शत्रूचा मात्र एकच माणूस कामास यावा हे त्याना फार अपमानकारक वाटले. मारला गेलेला माणूस श्रीधर वर्तक असून, तो कॅम्प प्रमुख होता हे कळताच त्या सर्वाना खूप आनद झाला. रझाकाराना तर स्वर्ग चारच बोटे उरला. त्यांनी प्रेताचा सूड घ्यावयाचा निर्णय घेतला. तत्कालीन पोलीस अधिकाऱ्याने (D. S. P.) आपल्या जीपला, पराक्रमी आणि धारातीर्थी पडलेल्या श्रीधर वर्धकाचे प्रेत बाधविले. जीप उस्मानाबादला पोहोचली तेव्हा कै. श्रीधर वर्तकाचे प्रेत फरफटत नेल्यामुळे छिन्नविछिन्न झाले होते. प्रेताची अगदी दुर्दशा झाली होती. त्या नरपशूना त्या प्रेताची झालेली अवस्था बघून राक्षसी आनद वाटत होता. उकळया फुटत होत्या. आपला पराक्रम, आपले शौर्य हिंदूना जाणवावे, त्याना भीती वाटावी, दहशत बसावी म्हणून प्रेत त्यानी फरफटत आणले होते. निष्प्राण देहाची विटबना भ्याड करतात. पराक्रमी पराक्रमाचा नेहमीच गौरव करतात.

श्रीधर वर्तक पडले. लढता लढता मेले. वीरगती प्राप्त झाली. त्यांची इच्छा पूर्ण झाली. त्याचे सोने झाले. श्रीधर वर्तकाचे प्रेत हिन्दूना दहशत बसावी म्हणून फरफटत नेण्यात आले. परतु घडले उलटेच. सभाजी राजाचा क्रूरवध करून धर्मांध औरगजेब मराठेशाही नेस्तनाबूत करू इच्छित होता. परतु सभाजीराजाच्या धीरोदात्त मरणाने अवघा महाराष्ट्र जागा झाला. सताजी–धनाजीच्या रूपाने मराठी शक्ती औरंजेबाच्या बलाढ्य शक्तीसमोर उभी राहिली. मराठेशाहीची कबर बांधणे दूर– औरगजेबाचीच कबर इथे बांधली गेली. इथेही नेमके तेच घडले. वर्तकाच्या शवाची झालेली विटबना हिन्दूना डिवचून गेली. वर्तकाच्या प्रेताच्या विटबनेने उस्मानाबाद कॅम्पमध्ये अनेक सताजी–धनाजी निर्माण झाले आणि निझामाच्या अन्यायी व धर्मांध सत्तेची कबर बाधण्याचा प्रसग लवकरच आला.

वर्तक, तुमचे बलिदान सार्थकी लागले. देशासाठी मरण पत्करून तुम्ही स्वर्गात स्वत:साठी मानाचे स्थान मिळविले. तुमचे वीरमरण विसरले जाऊ नये– देशासाठी मरणाऱ्या कोणाचेही मरण विसरले जाऊ नये. तुमच्या त्यागातून, बलिदानातून, जळण्यातूनच घरोघर दीप उजळलेले आहेत. याचा विसर पडू नये– देशासाठी मरणाऱ्याचे विस्मरण झाले तर देश अधोगतीस जाईल.

**धारातीर्थी ज्या वीरांनी**
**प्राण समर्पित केले**
**स्वर्गी उधळतील देवदेवता**
**त्यांच्यावरती फुले ॥**

□ □

गजाआडच्या माणसाची माणूसमधून प्रकाशित
होत असलेली ही दुसरी आत्मकथा.
दोन वर्षांपूर्वी दिवाळी अंकातून सादर केलेली
बाबा महाडिक यांची कैदी नं. ३१४६७ ही
स्वतंत्र आत्मकथा वाचकांच्या स्मरणात असेलच.
पॅपिलॉन ही दुसरी आत्मकथा
या अंकापासून क्रमशः सुरू होत आहे....

# पॅपिलॉन

मूळ लेखक : **हेन्री शॅरियर**

अनुवाद : **रवींद्र गुर्जर**



पॅपिलॉन ही हेन्री शॅरियर या कैद्याची मूळ फ्रेंच भाषेत प्रसिद्ध झालेली आत्मकथा. फ्रान्समध्ये पॅपिलॉन प्रसिद्ध झाल्यावर सर्व जगात या पुस्तकाने विक्रीचे जुने उच्चांक मोडले. नुकतेच त्याचे चित्रपट हक्क पाच लाख डॉलर्सला विकले गेले आहेत. साहित्य नव्या जाणिवांनी परिपूर्ण होऊ लागल्यानंतर एका नव्या जगाची ओळख करून देणारे सरळ, ओघवत्या पण सामर्थ्यवान शब्दातील जिवंत अनुभवांचे दर्शन या पॅपिलॉनमध्ये घडते. सुरुवातीपासून अखेरपर्यंत अनेक नाटयपूर्ण घटनांनी भरलेल्या या आत्मकथेचे वाचक निश्चितच स्वागत करतील....

# पॅपिलॉन

## प्रकरण एक : अंधारयुगाची सुरुवात

तो आघात इतका जबरदस्त होता की मला त्यातून सावरायला तेरा वर्षे लागली. त्या सर्वांनी आपला डाव व्यवस्थित साधला.

दिनांक २६ ऑक्टोबर १९३१. कस्टडीमधील माझ्या कोठडीतून मला सकाळी आठ वाजता बाहेर काढण्यात आलं. गेले एक वर्ष मी तेथं होतो. चांगल्यापैकी दाढी करून मला सुरेख पोशाख देण्यात आला. पांढरा शर्ट, अंगात योग्य रीतीने बसणारा सूट आणि निळसर रंगाचा टाय. त्यामुळे मी रुबाबदार दिसू लागलो. पंचवीस वर्षाचा असूनही विशीतला वाटत होतो. फ्रेंच पोलिसांवर त्याचा प्रभाव पडला की काय कोण जाणे, पण त्यांनी मला अगदी छान वागणूक दिली; हातातल्या बेड्यासुद्धा काढून टाकल्या. एका रिकाम्या खोलीत दोन बाकांवर पाच पोलिस व मी असे एकूण सहाजण बसलो. आमच्या समोरचे दार या सुप्रसिद्ध पॅरिस बिल्डिंगमधील न्यायालयाचे असणार हे मी ओळखले.

माझ्यावर सहेतुक मनुष्यवधाच्या आरोपावरून भरलेल्या खटल्याची सुनावणी काही क्षणातच सुरू होणार होती. माझे वकील मि. ह्युबर्ट मला भेटायला आले. ते म्हणाले, 'तुमच्याविरुद्ध भक्कम पुरावा मुळीच नाही. मला खात्री वाटते की आपण निर्दोष सुटू.' त्या 'आपण' शब्दाचं मला हसू आलं; कारण एखाद्याला स्वाभाविकच असं वाटलं असतं की मि. ह्युबर्ट सुद्धा आरोपीच्या पिंजऱ्यात उभे राहाणार आहेत आणि दोषी ठरल्यास तेही माझ्याबरोबर शिक्षा भोगतील.

द्वारपालाने दार उघडून आम्हाला आत बोलावले. बाजूला एक सार्जंट आणि चार पोलिस यांच्यामधून मी प्रचंड कोर्टरूममध्ये प्रवेश केला. त्या जागेत सर्वत्र लाल रंगाचा प्रामुख्याने वापर केलेला दिसत होता. भिंतीचा रंग, खिडक्यांचे पडदे, जाजम एवढेच काय पण केवळ दोन तीन मिनिटातच जे माझा 'निकाल' लावणार होते, त्या

न्यायाधीशांचा गाऊनही लालच रंगाचा होता.

'सभ्य गृहस्थहो, न्यायधीश महाराज!'

उजवीकडील दारातून एका ओळीत सहाजण आत दाखल झाले. मुख्य न्यायाधीश आपल्या स्थानाजवळ व इतर आपापल्या जागी उभे होते. खोलीत विशेष शांतता होती आणि माझ्यासह सर्वजण उभे होते. न्यायाधीशांनी आपली जागा घेताच सर्वजण खाली बसले.

त्या न्यायाधीशांचा चेहेरा गुबगुबीत होता आणि गाल गुलाबी होते. डोळे थंड. त्यांनी सरळ माझ्याकडे निर्विकारपणे दृष्टिक्षेप केला. त्यांचं नाव होतं बेव्हिन. माझ्यावर गुन्ह्याची सर्व जबाबदारी व्यवस्थित टाकणे एवढीच त्यांच्यावर सोपवलेली कामगिरी होती. माझ्याविरुद्ध खटला चालविण्यासाठी 'प्रेडल' नावाचा नामांकित सरकारी वकील नेमला होता. सर्व बॅरिस्टर्स त्याच्यापुढे दबून असत. जास्तीत जास्त लोकांना गुन्हेगार ठरवून मृत्युदंडाची शिक्षा मिळवून देणे किंवा निदान जन्मठेप भोगण्यासाठी देशाबाहेर घालवणे, यात इतर कोणीही त्याचा हात धरू शकत नव्हते. समाजाच्या 'सुस्थिर' अस्तित्वासाठी कायद्याचा प्रतिनिधी व न्यायाचा आदर्श म्हणून तो उभा होता. कायदा किंवा न्याय त्याच्या मनाप्रमाणे होण्यासाठी तो शक्य ते सर्व काही करीत असे.


त्याने गिधाडाप्रमाणे दिसणाऱ्या आपल्या डोळ्यांवरील भुवया उंचावून माझ्याकडे टक लावून पाहिले. माझ्यावर वर्चस्व स्थापन करण्यासाठी किंचित वाकून लक्षपूर्वक पाहात तो जणू काही म्हणत होता की 'बच्च्या, माझ्या तडाख्यातून तू सुटशील अशा भ्रमात राहू नकोस. ती तुझी मोठीच चूक होईल. माझे हात कदाचित भक्ष्याला पकडणाऱ्या पंजाप्रमाणे नसतील, पण माझ्या हृदयात जे पंजे आहेत, त्यायोगे मी तुझे तुकडे तुकडे करणार आहे. आणि न्यायाधीश किंवा सर्व बॅरिस्टर्स मला जे थरथर कापतात, त्याचे कारण म्हणजे माझं भक्ष्य मी कधीच सोडीत नाही. तू दोषी आहेस की निष्पाप आहेस याच्याशी मला यत्किंचितही कर्तव्य नाही, मी इथे फक्त याचसाठी उभा आहे की तुझ्या विरुद्धच्या सर्व गोष्टींचा पुरेपूर उपयोग करून घेणे—तुझं अनियमित, अस्थिर आयुष्य; पोलिसांनी जमा केलेला पुरावा आणि साक्षी. न्यायाधीशांच्या मनात तुझ्याविषयी तिरस्कार निर्माण होईल अशी कथा उभारून, पंचांच्या द्वारे समाजातील एक पाप नष्ट करणे, हेच माझे काम आहे.'

एकतर मला स्वप्न तरी पडले असेल किंवा मला त्याचे बोलणं प्रत्यक्ष स्पष्टपणे तरी ऐकू येत असावे; पण या नरपशूमुळे मी अक्षरशः हादरलो. 'गुन्हेगार माणसा, मुकाट्याने स्वस्थ बैस आणि स्वतःचा बचाव करण्याचा तर मुळीच प्रयत्न करू नकोस. मी तुला रसातळाला नेऊन पोचवणार आहे, समजलास. मला ठाऊक आहे की पंचांवर तुझा विश्वास नाही. त्या बारा जणांना जीवन म्हणजे काय याची अजिबात जाण नाही. त्यांच्याकडे नीट पाहा. देशातल्या गचाळ खेड्यांमधून या बारा बेअकली लोकांना पॅरिसमध्ये आणलेले आहे. तुला ते नीट दिसताहेत ना? त्या सर्वांना आपण येथे पंच म्हणून येतो याचा शब्दातीत आनंद होत असतो. मी त्यांच्यापुढे तुझ्याविषयी अत्यंत भडक चित्र उभे करणार आहे. त्यांना बुद्दू बनविणे ह्यासारख दुसरे सोपे काम नाही. शिवाय आज तू आवश्यकता नसताना फारच चांगले कपडे घातले आहेस; वस्तुतः तू अगदी साध्या कपड्यात नम्रपणे यावयास हवे होते. ही तुझी घोडचूक झालेली आहे. तुझ्या लक्षात येत नाही का की सारे पंच तुझ्या कपड्यांचा द्वेष करीत आहेत? कारण असले कपडे त्यांना कधीच पाहावयास मिळालेले नाहीत.'

दहा वाजले, आम्ही सर्वजण खटल्याची सुरुवात होण्याची वाट पाहात होतो. माझ्यासमोर सहा वकील बसले होते. त्यातील मुख्य प्रेडल आपल्या सर्व पाशवी शक्तीसहित आणि बुद्धिकौशल्याने बारा भोळसट पंचांना पटवून देणार होता—एक म्हणजे मीच दोषी आहे आणि दुसरे म्हणजे त्याबद्दल योग्य शिक्षा मृत्युदंड किंवा जन्मभर सक्तमजुरी.

'मॉन्टे मार्त्र' मधील गुन्हेगार जगतामध्ये वावरणाऱ्या एका इसमाचा खून केल्याबद्दल माझ्यावर हा खटला भरला होता. म्हणजे केवळ संशयावरून. तो इसम पोलिसांचा खबऱ्याही होता. या कृत्याचा पुरावा काहीही मिळालेला नव्हता. पण पोलिस मात्र डोळे झाकून शपथ घ्यायला तयार होते की मीच दोषी आहे. प्रत्येक खेपेला अशाच पद्धतीने त्यांना 'खरा' गुन्हेगार शोधल्याचे श्रेय मिळते. माझ्याविरुद्ध 'अत्यंत गुप्त' पुरावा असल्याचा त्यांचा दावा होता. त्यामुळे अर्थातच घडलेल्या गुन्ह्याविषयी वेगळ्या पुराव्याची आवश्यकताच राहिली नाही. त्यांनी पढवून ठेवलेला एक साक्षीदार हाच त्यांचा भक्कम पुरावा होता. त्या साक्षीदाराचं नाव होतं पोलेन. पोलिसांना नेहमी उपयोगी पडणारा तो एक जिवंत ग्रामोफोन होता. मी वारंवार जीव तोडून सांगत होतो की या माणसाला मी अजिबात ओळखत नाही, पण त्यावर न्यायाधीशांनी मला कौशल्यपूर्वक विचारले, 'तू सांगतोस की हा साक्षीदार खोटं बोलतोय, ठीक आहे, पण त्याला खोटं सांगण्याची आवश्यकताच काय आहे?'

'अध्यक्ष महाराज, मला अटक झाल्यापासून कित्येक रात्री मी झोपेविना काढल्या आहेत. पण त्या खुनाबद्दलच्या पश्चात्तापामुळे मात्र अजिबात नाहीत. कारण खून मी केलेलाच नाही. मी सतत हाच विचार करतोय की, पुरावा अगदी कमकुवत ठरत असताना, हा अनोळखी प्राणी, माझ्यावर गुन्हा शाबीत व्हावा म्हणून नवे नवे पुरावे निर्माण करून जोरात का बरे तुटून पडत आहे. आणि आता माझ्या ते संपूर्णपणे लक्षात आलेले आहे. या इसमाला एखाद्या



'बच्चा, माझ्या तडाख्यातून तू सुटशील या भ्रमात राहू नकोस

गंभीर गुन्ह्याबद्दल अटक झाली असणार आणि-'पॅपिलॉनविरुद्ध साक्ष देशील तर तुझ्या गुन्ह्याकडे आम्ही दुर्लक्ष करू-' असे आश्वासन त्याला नक्कीच पोलिसाकडून मिळालेल असावं.'

या वेळी नकळत मी सत्यच बोलून गेलो होतो. कारण काही दिवसानंतर याच 'प्रामाणिक' माणसाला-पोलेनला-कोकेनच्या व्यवहारावरून अटक करण्यात आली.

माझ्या वकिलानी बचावाचा खूप प्रयत्न केला. पण प्रेडलच्यापुढे त्याचा टिकाव लागला नाही. त्या सरकारी वकिलान आपल्या चातुर्याच्या बळावर पचांना आपलसं केल. रात्री सुमारे अकराच्या सुमारास तो बुद्धिबळाचा डाव सपला. माझ्या वकिलावर आणि अर्थात माझ्यावर मात झाली होती. निर्दोष असूनही मला दोषी ठरवले गेले. एका केवळ पचवीस वर्षांच्या तरुणाला समाजाने सरकारी वकिलामार्फत आयुष्यातून उठवले. आभार! लोकहो, मनःपूर्वक आभार! न्या. बेव्हिन यानी निकालपत्र वाचून दाखविले. भावनाविरहित आवाजात ते म्हणाले,

'आरोपी, उभा राहा.' मी उभा राहिलो. कोर्टात पूर्णपणे स्तब्धता होती. लोक श्वास रोखून बसले होते आणि माझ्या छातीचे ठोके जरा जलद पडू लागले होते. काही पचानी माझ्याकडे पाहिल, इतरानी तोंडे फिरवली. कारण त्याची त्यानाच लाज वाटली असावी.

'आरोपी, तुला पंचांनी एकमुखाने दोषी ठरविलेले आहे. तथापी सदर गुन्हा पूर्वनियोजित असल्याचे सिद्ध होऊ न शकल्यामुळे तुला जन्मठेपेची शिक्षा देण्यात येत आहे. यावर तुला काही सागायचे आहे?'

किंचितही न बिचकता, स्थिरपणे उभा राहून मी म्हणालो, 'होय, महाराज; मला हे सागायच आहे की, मी पूर्णपणे निरपराध आहे आणि पोलिसानी रचलेल्या डावाला निष्कारण बळी पडत आहे.' न्यायाधीशाच्या मागे बसलेल्या काही मान्यवर उपस्थितांमधून आणि अद्ययावत् पोशाख केलेल्या स्त्रियामध्ये मला कुजबूज ऐकू येऊ लागली. आवाज किंचितही न चढवता मी त्याना उद्देशून म्हणालो, 'गप्प बसा, इथे येऊन धाडस करण्याचा आवटशौक भागवणाऱ्या श्रीमत स्त्रियानो, एकदम गप्प बसा. हे नाटक आता संपलेल आहे. तुमच्या हुशार पोलिसानी आणि न्यायाच्या पद्धतीने एका खुनाचे रहस्य सोडवले आहे-तुम्हाला जे अपेक्षित होत ते मिळालेलं आहे.'

'कैद्याला येथून घेऊन चला.' वॉर्डराना हुकूम मिळाला.

मला तेथून नेण्यापूर्वी माझ्या कानावर आवाज आला, 'प्रियतमा, मुळीच काळजी करू नकोस. मी तिथे येईन आणि तुला शोधून काढीन.' ती माझी शूर, सुदर बायकोच बोलत होती. माझ्यावरच प्रेम तिच्या आवाजातून पुरेपूर जाणवत होतं. गुन्हेगार जगातल्या माझ्या मित्रानी माझी वाहवा केली. झालेल्या खुनाचा तपास कसा लावायचा हे त्यांना पूर्णपणे माहीत होते. आणि मी गुप्तता बाळगून आणखी कोणालाही त्यात न गोवल्याबद्दल त्यानी समाधान व्यक्त करणे आवश्यकच नव्हते काय?

खटला सुरू होण्यापूर्वी बसलो होतो त्या खोलीत आम्ही पुन्हा गेलो. एका पोलिसाने माझ्या हातात बेड्या ठोकल्या.त्यात साखळी अडकवून ती त्याने आपल्या डाव्या हातात घेतली. सर्वजण गप्प होते. मी एक सिगारेट मागितली. सार्जंटने ती मला दिली आणि पेटवली. सिगारेट तोंडात धरताना आणि खाली नेताना साखळी हातात धरलेल्या पोलिसाला सारखा हात खालीवर करावा लागत होता.

जवळजवळ पाऊण सिगारेट सपेपर्यंत मी तिथे उभा होतो. एकानेही आपल तोंड उघडल नव्हतं. शेवटी मीच सार्जंटकडे पाहिल आणि म्हणालो, 'चला, जाऊ या.'

सुमारे बारा पोलिसांचे मधून जिना उतरून आम्ही कोर्टाचे मधल्या भागात आलो. तिथ गाडी आमची वाट पाहात होती. आम्ही दहाजण आत शिरून बाकांवर बसलो. सार्जंट ओरडला, 'चलो कस्टडी.'

### कस्टडी

मुक्कामाचे ठिकाणी पोचल्यावर पोलिसानी मला मुख्य वॉर्डरचे स्वाधीन केले आणि कागदपत्रांवर रीतसर सही घेतली-एकप्रकारची पावतीच होती ती काहीही न बोलता ते सर्वजण निघून गेले, फक्त तत्पूर्वी सार्जंटने माझे अडकलेले दोन्ही हात आपल्या हातात घेऊन हलवले. खरोखर आश्चर्य!

मुख्य वॉर्डरने मला विचारले, 'त्यांनी तुला काय शिक्षा दिली.'

'जन्मठेप.'

'काय सागतोस?' त्याने माझ्या उद्गाराच्या खरेपणाची खात्री पोलिसांकडे पाहून करून घेतली. त्या पन्नास वर्षांच्या वॉर्डरने जग खूप पाहिलेले होते आणि माझ्या पूर्वीच्या उद्योगांविषयी त्याला सपूर्ण माहिती होती. 'हरामखोर! ते बहुधा शुद्धीवर नसावेत.' माझं असं सांत्वन करण्यात त्याचा चागुलपणाच होता.

सावकाशपणे त्यानं माझ्या बेड्या काढून घेतल्या आणि मला माझ्या कोठडीपर्यंत त्यानं स्वतः येऊन सोडल. ती कोठडी खास मृत्युदडाची शिक्षा झालेले, मायेफिरू, अत्यत धोकेबाज व जन्मठेप मिळालेले कैदी याच्यासाठी राखून ठेवली होती.

'मन शात ठेव, पॅपिलॉन,' दार बंद करताना तो म्हणाला, 'तुझ सामान आणि खायपदार्थ तुझ्याकडे आम्ही रवाना करतो, तू मस्त मजेत राहा.'

'धन्यवाद. माझ मन पूर्णपणे ताळ्यावर आहे-विश्वास ठेवा; त्यानी मला दिलेली जन्मठेप त्यांना महागात पडणार आहे.'

काही वेळानतर दारावर खरवडल्याचा आवाज आला.

'काय चाललय?' मी विचारलं.

'काही नाही.' आवाज आला, 'मीच आहे. दारावर एक चिठ्ठी अडकवतो आहे.'

'का? त्यावरती काय लिहिलय?'

'जन्मठेप. काळजीपूर्वक देखरेख ठेवणे.'

ते किती मूर्ख आहेत, मला वाटल; या भक्कम खोलीत मी काय आत्महत्या करणार आहे असं त्यांना वाटलं? मी अत्यत धीट आहे आणि कायम तसाच राहाणार आहे. प्रत्येक गोष्टीसाठी मी एकेकाशी झगडीन. फार कशाला, उद्यापासूनच त्याला सुरुवात करतो.

दुसऱ्या दिवशी कॉफी घेताना मी विचार करू लागलो की कोणत्या

मुद्यावर सुरुवात करावी ! शिक्षेच्या निकालाविरुद्ध अपील करून आपल्या नशिबाची परीक्षा पहावी काय ? त्यात साधारण किती काळ जाईल ? एक वर्ष, कदाचित दीड वर्षही. आणि होऊन होऊन काय होणार– तर जन्मठेपेऐवजी वीस वर्षांची शिक्षा !

मी मनोमन पळून जाण्याचा निश्चय केलेलाच होता. त्यामुळे शिक्षेच्या वर्षांना काहीच अर्थ उरत नाही. मला आठवतं की एका शिक्षा झालेल्या कैद्याने न्यायाधीशाना विचारल होत, 'महाशय, फ्रान्समध्ये जन्मठेप किती वर्षांची असते ?'

माझ्या खोलीत मी येरझारा घालू लागलो. एक तार माझ्या बायकोला दिलासा देण्यासाठी आधीच पाठवली होती आणि दुसरी बहिणीला, जिने आपल्या भावाचा बचाव करण्यासाठी शक्य ते सर्व केले होते. आता सर्व समाप्त झालं होत. अकाचा पडदा पडला होता. माझ्या जवळच्या माणसाना माझ्यापेक्षाही जास्त मनस्ताप भोगावा लागणार होता, आणि खूप दूरच्या गावातील माझ्या वडिलांना हा धक्का सहन करणं फार कठीण जाणार होतं.

एकाएकी माझा श्वास थाबला. पण मी निर्दोष आहे ! खरच निर्दोष आहे. आता हे सागायच कुणाला ? आणि कशासाठी ? जरूर काय ? त्यात तुझ हस मात्र होईल. माझ्यावर निष्कारण खोटा आळ आला आहे, अस आता सांगण म्हणजे मोठा विनोद होईल. पॅपिलॉन, मुकाटचान गप्प बैस !

मात्र सुरुवातीपासूनच माझ्या डोक्यातही आल नाही की आपल्याला जन्मठेप होऊ शकेल. त्यामुळे अशा रीतीन आयुष्यातून उठण म्हणजे काय याचा मी विचारही केला नव्हता.

ठीक. आता पहिल्याप्रथम अशी गोष्ट करायला हवी की ज्याना माझ्यासारखीच जन्मठेप मिळाली आहे अशांना गाठणं. कारण भविष्यात पलायन करताना त्याची साथ मिळू शकेल. मी मार्सेलिसच्या देगाला प्रथम निवडला. तो दाढीसाठी न्हाव्याच्या खोलीत जाताना रोज दिसत असे. मी लगेच दाढीच्या निमित्ताने तिथे गेलो. देगा भितीकडे तोड करून उभा होता; आणि जास्त वेळ काढता यावा म्हणून मागच्या लोकाना पुढे जाऊ देत होता. एकाला बाजूला ढकलून मी त्याच्या उजवीकडे आलो. त्वरेने हळूच पुटपुटलो,

'ठीक आहेस ना, देगा ?'

'ठीक. पपी, मला पंधरा वर्षे मिळाली आहेत. तुझं काय ? असं ऐकतो की...

'होय : मला जन्मठेप झाली आहे.'

'तू अपील करणार ?'

'नाही. पण आता एकच गोष्ट ध्यानात ठेवायची– भरपूर खाणे आणि शरीर उत्तम स्थितीत राखणे. तू पण बळकट राहा, देगा : आपल्याला खरोखरच चांगल्या स्नायूची आवश्यकता आहे. तुझ्या जवळ माल आहे ?'

'हो. दहा हजार फ्रँक्स् आहेत. आणि तुझं काय ?'

'काही नाही.'

'मग माझा सल्ला ऐक. ताबडतोब त्याची व्यवस्था कर. माझ्या विश्वासातील एक माणूस आहे. तुझ्या बायकोला निरोप पाठवून बोलावून घे. म्हणजे त्या मनुष्याकरवी पैशाची लांबट चपटी डबी– चार्जर– मागवण्याची व्यवस्था करता येईल.'

'हळू बोल, तो पोलिस आपल्याकडे बघतोय.'

'तुम्हाला गप्पागोष्टी करण्यासाठी इथं आणल आहे काय ?' पोलिस खेकसला.

'छें, छे ! तसं विशेष काही नाही.' देगा म्हणाला, 'याला जरा बर वाटत नसल्याच तो सागतोय.'

'काय झालय त्याला ? पोटात दुखतय का ?' अस म्हणून तो लठ्ठ कुल्ले असलेला पोलिस खिदळला.

असल्या गोष्टीची आता सवय करायला हवी. आपल सार आयुष्य असच जाणार का ? म्हणजे वेड लागायची पाळी !

देगाच्या सागण्यानुसार पैशाची चपटी डबी– चार्जर– माझ्यापर्यंत सुखरूपपणे येऊन पोचती झाली.

ती एक अत्यत सुदर पॉलिश केलेली अॅल्युमिनियमची नळी होती. उघडण्याची सोय मध्यभागी आणि तिचा अर्धा भाग पुरुषाचा व अर्धा भाग स्त्रीचा होता. त्यात पाच हजार सहाशे फ्रँक्स्च्या कोऱ्या करकरीत नोटा होत्या. माझ्या ताब्यात चार्जर येताच मी तिचं प्रेमभराने चुबन घेतल. होय, त्या साडेतीन इच लाबीच्या आणि अंगठ्याएवढ्या जाडीच्या नळीच मी एकदा चुबन घेतल. नतर माझ्या गुप्तभागात–ढुगणात–ती सरकवली. मोठ्या आतड्याच्या आतपर्यंत ती पोचावी म्हणून एक प्रदीर्घ श्वास घेतला. आता तीच माझी 'सुरक्षित ठेव' होती. पोलिसानी कितीही कसून झडती घेतली तरी ती त्याच्या हाताला लागणे शक्य नाही. आतड्यामध्ये खूप वरपर्यंत ती सरकली होती. माझ्या शरिराचा एक भागच म्हणा ना ! माझ्यात मी स्वातत्र्य आणि जीवन बाळगून होतो. बदला ! आता फक्त सूड घेण्याचा विचारच करायचा. मी तशी प्रतिज्ञा केली.

बाहेर अधार पसरला होता. खोलीत मी एकटा होतो. छतावरील प्रखर दिव्यामुळे पहारेकरी दारामधील छिद्रातून मला पाहू शकत होता. प्रकाशाने माझे डोळे दिपून गेले म्हणून हातरुमाल घट्ट बाधून मी ते झाकून टाकले– खरोखर प्रकाश त्रासदायक होता. लोखंडी बिछान्यावरील गादीवर मी पडलो होतो– उशी नव्हतीच– आणि माझ्यावर भरलेल्या त्या खटल्याचा प्रसग जसाच्या तसा माझ्या डोळ्यासमोर उभा राहिला.

आता यापुढे येणारे काही तपशील कदाचित कटाळवाणे वाटण्याचा सभव आहे, पण माझी सत्यकथा नीट कळायला हवी असेल आणि कोणत्या सामर्थ्यावर मी त्याही परिस्थितीत टिकाव धरला हे जाणण्यासाठी मला ते द्यावेच लागणार आहेत. त्या काळात माझ्या मनात आलेले सर्व विचार, मनश्चक्षूसमोर प्रत्यक्ष जे जे

---

**'Papillon'! A marvellous adventure story told in a direct, colloquial style.... by a born teller of tales.** *—Times Literary Supplment. London.*

---

उभं राहिले ते सर्व काही मी सांगणार आहे– जेव्हा मी जिवंत गाडला गेलो होतो.

एकदा सुटका करून घेतल्यानंतर पुढच्या सर्व अपेक्षित गोष्टी कशा काय पार पाडाव्यात ? जवळ पैसे असल्यामुळे तो एक प्रश्न मिटलेला आहे. यशस्वी पलायनाविषयी मला तिळमात्रही शंका वाटत नाही. सर्वप्रथम लवकरात लवकर पॅरिसला दाखल व्हावे. पहिला खून खोटी साक्ष देणाऱ्या पोलेनचा करावा लागेल. नंतर पाळी येते केसमधील दोन मुख्य पोलिसांची. पण दोनच पोलिसांवर भागणार नाही. सर्वच पोलिसांना एका हप्त्यात मारून टाकावे किंवा निदान जितके जमतील तितके तरी जास्तीत जास्त लोकांना एकदम कसे मारता येईल याची योजना मी आखू लागलो. स्फोटक पदार्थ, डायनामाईट, नायट्रोग्लिसरीन वगैरे सर्व पदार्थांची वर्णी लागली.

अद्यापी मी डोळे मिटून पडलो होतो, त्यावर हातरुमाल होता तरीही मी योजलेल्या सूडाची चित्रे मला अगदी स्पष्टपणे दिसत होती. कमीत कमी दीडशे पोलिसांचा तरी फडशा पाडलाच पाहिजे. कुठेही लहानसुद्धा चूक होता कामा नये. एखादी योजना बारगळण्याची शक्यता गृहीत धरून दुसरी तयार ठेवलेली बरी. मी पुन्हा डोकं खाजवलं. आपल्याला अचूक योजना हमखास तयार करता येईल याबावत स्वत:विषयी खात्री वाटत होती.

तहान लागली म्हणून पाणी पिण्यासाठी उठलो. सतत विचारांमुळे डोकं दुखू लागलं होतं. डोळ्यावर रुमाल न ठेवता पुन्हा गादीवर पडलो: हळुहळू वेळ जात होता. तो समोरचा प्रकाश, परमेश्वरा, नको तो प्रकाश ! मी हातरुमाल ओला करून पुन्हा डोळ्यांवर ठेवला. गार पाण्यानं जरा बरं वाटलं, आणि रुमाल जरा जड झाल्यामुळे डोळ्यांवर व्यवस्थित बसला. यापुढे नेहमी असंच करावं झालं.

भविष्यकाळच्या योजनांमध्ये मी दीर्घकाळ दंग होऊन जात असे आणि पुढचे प्रसंग माझ्यासमोर जणु काही प्रत्यक्ष घडत असावेत इतके स्पष्ट दिसत. तुरुंगातून पळून आलेलो आहे असं मानून मी त्यावेळच्या सर्व रात्रींमध्ये आणि दिवसाच्याही बऱ्याच काळामध्ये पॅरिसच्या रस्त्यांवर वावरत असे. येथून पळून जाऊन लगेच पॅरिसला जावयाचे हे तर ठरल्यासारखेच होते, आणि अर्थातच पहिली गोष्ट कोणती करायची तर पोलेनचा हिशेब पुरा करायचा; नंतर पोलिस आणि पंच मंडळींचं काय ? त्यांना शांतपणे जगू द्यावं काय ? ती नालायक माणसं मोठी प्रौढी मिरवत आपापल्या घरी गेली असतील आणि शेजाऱ्यापाजाऱ्यांना आपला मोठेपणा त्यांनी सांगितला असेल.

ठीक मग पंच लोकांचं काय करावं ? जाऊ दे. त्यांना केवळ मूर्ख म्हणून सोडून द्यावं. सरकारी वकिलाच्या प्रभावामुळे ते वाहवले गेले. त्यांना दोष देता येणार नाही. म्हणजे तो एक प्रश्न सुटला; मी त्यांना काही एक त्रास देणार नाही.

हे सर्व लिहिताना कित्येक वर्षांपूर्वी मनात आलेले विचार आजही सुस्पष्टपणे उफाळून येत आहेत. माझ्यासारख्या केवळ पंचवीस वर्षांच्या तरुणाच्या नशिबी एकाकीपण आणि स्मशान शांतता आल्यामुळे, सतत काल्पनिक जग समोर उभं असायचं. डोकं पार फिरून जात असे. ते जग इतकं तीव्र आणि सत्य वाटायचं की अशा वेळी माझी दोन व्यक्तीत विभागणी व्हायची. एक तटस्थ अन् दुसरी क्रियाशील. ज्या ज्या वेळी इच्छा होईल तेव्हा कल्पनेच्या पंखांनी प्रत्यक्ष भरारी मारलीच ! घर, वडील, आई, कुटुंब, बालपण–आयुष्याची निनिराळी वाटचाल, कल्पनेच्या साम्राज्यात जणु प्रत्यक्षच वावरतो आहे.

त्या गोष्टीला आता छत्तीस वर्षे उलटली आहेत, जीवनातील एक केवढे मोठे पर्व ! यत्किंचितही कष्ट न पडता सर्व आठवतंय.


तर नाही; पंच लोकांना काहीही त्रास देता कामा नये.

माझी लेखणी विचारांबरोबर धावत आहे,

पण माझ्याविरुद्ध खटला चालवणाऱ्या त्या नीच वकिलाचं काय ? त्याला सोडता कामा नये. त्याच्यासाठी अलेक्झँडर ड्युमासने आयता मार्ग लिहून ठेवलेला आहे. त्याने ' दि काऊंट ऑफ मॉन्टे क्रिस्टो 'मध्ये एकाला भुकेने तडफडून मारले त्याप्रमाणे !

खरोखर त्या वकिलाचा न्याय करायलाच हवा. त्या तांबड्या पायघोळ झगा अडकवणाऱ्या गिधाडाला जास्तीतजास्त क्रूरपणे मृत्युपंथाला पाठवावे; याखेरीज अन्य पर्याय नाही. होय. पोलेन आणि पोलिस यांच्यानंतर त्याचाच क्रमांक. नव्हे आता सर्व वेळ या योजनेच्या मागे लागणे बरे. एक बंगला भाड्याने घ्यावा. त्यात खूप खोल असे तळघर बनवून त्याला एक जाड दरवाजा तयार करून घ्यावा लागेल. दार जर फार जाड नसेल तर मलाच ते गादी वगैरेच्या साह्याय्याने ती खोली आवाज बंद करून घ्यावी लागेल. एकदा बंगला ताब्यात आल्यावर त्याच्याविषयीची व्यवस्था पक्की झाली की त्याला पकडून आणावा. तळघराच्या भिंतीत कड्या आणि साखळ्या अगोदरच ठोकलेल्या असतील, मग सरळ त्याला साखळ्यांनी जखडून टाकावे. आणि नंतर आम्हा दोघांची मन:स्थिती कशी असेल बरं ?

मी त्याला कल्पनेने समोर उभा केला. माझ्या बंद पापण्यांमधून मी त्याला वैशिष्टयपूर्ण ठळकपणे पाहू शकत होतो. कोर्टात त्यानं माझ्याकडे ज्या जहरी दृष्टीनं पाहिलं, त्याची मी परतफेड केली. तो प्रसंग इतका स्वच्छ आणि जिवंत होता की त्याचा गरम श्वासो-च्छवास माझ्या चेहेऱ्याला जाणवत होता; कारण मी अगदी जवळ जवळ होतो. त्याला स्पर्श करूनच म्हणा ना ! मी त्याच्यावर केन्द्रित केलेल्या प्रखर दिव्याच्या किरणांमुळे त्याचे घुबडासारखे डोळे दिपून गेले होते आणि भय व्याकुल दिसत होते. त्याच्या गुलाबी, फुगीर चेहेऱ्यावरून घामाच्या धारा वाहू लागल्या. माझे प्रश्न मलाच ऐकू येऊ लागले आणि त्याच्या उत्तराकडे मी काळजीपूर्वक लक्ष देऊ लागलो. ते क्षण मी अत्यंत उत्कटपणे अनुभवले.

' हलकटा, मला ओळखतोस ना? मी पॅपिलॉन ज्याला तू मोठ्या सहजपणे जन्मठेपेकडे रवाना केलेस. खूप उच्च शिक्षण घेण्यासाठी तू आपल्या पुस्तकावर वर्षानुवर्षं घाम गाळलास; रोमन कायदा आणि इतर तसलेच प्रकार घोकण्यात रात्रीच्या रात्री घालवल्यास. तू मुद्दाम लॅटिन आणि ग्रीक शिकलास, आणि उत्कृष्ट वक्ता होण्यासाठी आपले तारुण्य तू वाया घालवलेस. हे सर्व तू केलस खरं, *पण ते योग्य होतं अस तुला वाटत?* कुठुन तुला अस सर्व काही करावसं वाटलं? पाजी माणसा, त्याचा तुला कशासाठी उपयोग झाला? समाजासाठी नवे सुरेख कायदे करण्यासाठी? का लोकांना हे पटविण्यासाठी की शांती हीच जगातील सर्वांग सुंदर गोष्ट आहे? एखाद्या भयानक धर्माचे तत्त्वज्ञान पढविण्यासाठी? का चांगली माणस निर्माण करण्यासाठी–निदान दुष्ट होण्यापासून परावृत्त करण्यासाठी? सांग मला, तुझ्या ज्ञानाचा उपयोग तू कधी लोकाना पाण्यातून बाहेर ओढण्यासाठी केलास, का उलट पाण्यात ढकलण्यातच खर्ची पाडलास? तू आत्म्यापर्यंत कधीच पोचला नाहीस. तुझ उद्दिष्ट होत फक्त एकच–महत्त्वाकाक्षा! सारख वर वर चढत जाणे हाच आयुष्यक्रम! जन्मठेपसाठी माणस पुरवणे, असंख्य लोकाना मृत्युदडाकडे रवाना करणे यातच तुझ्या आयुष्याचे सार्थक! असो, आता तू माझ्या तावडीत चांगला सापडला आहेस. *तुझं कण्हण आज मी ऐकतोय. होय, माझ्यावरच्या खटल्याचा निकाल* लागल्यावर तू केलेल विजयी हास्य मला स्पष्ट आठवतय. तो प्रसग अगदी काल घडल्यासारखा दिसतोय, जरी आता त्याला खूप वर्षे लोटली आहेत. किती बरं? दहा वर्षं? की वीस?

पण हे मला अस काय होतय? दहा वर्षे काय म्हणुन? वीसही का? शुद्धीवर ये, पॅपिलॉन; तू तरुण आहेस, सशक्त आहेस, आणि तुझ्याजवळ पाच हजार सहाशे फ्रँक्स् आहेत. दोन वर्षं. होय. जन्मठेपेपैकी मी फक्त दोनच वर्षं शिक्षा भोगीन, त्यापेक्षा एक दिवसही जास्त नाही. मी तशी शपथच घेतली

यातून बाहेर पड, पॅपिलॉन, तू वेडा बनत चाललायस्. शातता आणि ही कोठडी तुला बधीर बनवत्येय जवळच्या सिगारेट्स कालच सपल्या आहेत. मी आता चालण सुरू करीन. ठीक. मी उभा आहे. कोठडीची लाबी दारापासून भिंतीपर्यंत सुमारे बारा फूट आहे–*थोडक्यात* म्हणजे पाच लहान लहान पावल. मी हात पाठीशी बाधून चालू लागलो. नतर मी पुन्हा सुरुवात केली, ' ठीक आहे, तर मी काय म्हणत होतो? हं! मी तुझं विजयी हास्य पाहिल होतं. आता परिस्थितीत थोडा बदल होणार आहे. म्हणजे अगदी आमूलाग्र. तुला जितकी बोब ठोकायची असेल तितकी ठोक. कितीही जोरात. मी तुझ काय करणार आहे? ड्युमासच्या घडयाप्रमाणे! पण तुला भुकेनं तडफडून मरू देऊ? छे तेवढं पुरेस नाही. सुरुवात म्हणून मी तुझे डोळे बाहेर काढून टाकतो. काय? अजूनही तू विजयी दिसतोस? तुला अस वाटतय ना की मी तुझे डोळे बाहेर काढल्यावर निदान मी न दिसण्याचा फायदा होईल, आणि तुझ्या डोळ्यातील भीती दिसण्यापासून मी वंचित होईन? होय, तुझंच बरोबर आहे. मी तस करता कामा नये. निदान आत्ता ताबडतोब तरी नाही. ते काम पुढच्यासाठी राखून ठेवू. मग मी तुझी जीभच छाटतो, जरी ती जहाल जीभ वस्तऱ्याएवढी–छे त्याहूनही–धारदार आहे. तुझ्या घाणेरड्या महत्त्वाकांक्षेला तू ती जीभ विकली होतीस. अर्थात त्याच जिभेनं तू बायका मुलांशी गोडगोड बोलत असशील. *आणि गर्ल फ्रेंडशी ... गर्ल फ्रेंड?* बहुधा बॉय फ्रेंडच! तेच अधिक सभवनीय वाटतं. मग हे ठीक आहे, तुझी जीभ उखडण्यापासूनच सुरुवात करावी; कारण तुझ्या मेंदूनतर घोटाळा करणारी तीच तर आहे. तिच्याच साहाय्यानं तू पचांना आपलस केलंस आणि तुझ्या इच्छेनुसार निकाल लागला. तिच्यामुळे मी पॅरिसमधील एक अत्यत धोकेबाज गुन्हेगार ठरलो. जर तुझ्या जवळ असली खोटारडी, कौशल्यपूर्ण आणि मन वळवणारी जीभ नसती तर आज मी पॅरिसमधल्या एखाद्या सुदर उपाहार गृहात मजेत बसलेला असतो आणि मला हे काहीच करावं लागलं नसत. तर आता हे नक्की झाल की तुझी जीभ उपटून काढायची. पण तिला घेऊन तरी मी काय करणार आहे?

मी एकसारखा पुढे मागे चालतच राहिलो. डोक गरगरत होत, पण मी आणि तो वकील अजूनही समोरासमोर तोड करून उभे होतो. *आणि अचानक वीज बद पडली, त्याबरोबर खिडकीच्या* बारीक छिद्रातून दिवसाच्या प्रकाशाचा बारीक कवडसा दिसू लागला.

हे काय? सकाळ केव्हाच झाली? मी बदल्याच्या विचारात सारी रात्र काढली काय? खरोखर किती मस्त तास गेले ते! ती लावच लाव रात्र कशी छान निघून गेली.

बिछान्यावर बसून मी ऐकू लागलो. काहीच नाही. प्रचड शातता. वारवार दारापाशी लहानसा आवाज येई. माझ्या लक्षात न याव अशा हेतून दारावरच्या भोकातून तो पहारेकरी माझ्याकडे बघत असे.

फ्रान्सच्या प्रजासत्ताकान नेमलेली यत्रणा आता आपल्या पुढच्या कार्याचा टप्पा सुरू करत होती. खरोखर किती व्यवस्थितपणा! पहिल्या प्रथम एका व्यक्तीला–ती आपल्याला त्रासदायक ठरण्याच्या शक्यतेवरून त्या यत्रणेनं समोरून नाहीसं केलं. पण नेवढ्यावरच कुठे भागतय? त्या माणसानं लवकर मरता कामा नये. त्यान आत्महत्या करून पुढच्या त्रासातून सुटता कामा नये. तो जगण फार जरूरीच आहे. जर एकही कैदी नसेल तर तुरुगाची सेवा उपयोगी पडेल? गटारं साफ करण्यात? म्हणून त्याच्यावर लक्ष ठेवलं पाहिजे. जन्मठेप भोगण्यासाठी त्यानं जिवत जायला पाहिजे, जिथे आणखी सरकारी कर्मचाऱ्यांना कामगिरीचा काहीतरी वाव मिळेल. पुन्हा दारावर तसला आवाज ऐकू आला अन् मला हसूच आलं.

*गाढव माणसा, मुळीच काळजी करू नकोस, मी अजीबात* पळून जात नाही. म्हणजे तुला जी भीती वाटत आहे त्या आत्म-

**' Papillon ', Racy and occasionally horrifying... an instant, runaway best seller.**

*–NewsWeek*

हत्येच्या मार्गानं तर मुळीच नाही. उलट जास्तीत जास्त चांगल्या शारीरिक स्थितीत मला जन्मठेप भोगण्यासाठी केव्हा एकदा फ्रेंच गियानाला रवाना करणार आहेत याचीच मी वाट पाहतोय- बाबा रे! धन्यवाद.

पुन्हा आवाज झाला. आठ चौरस इंचाचं छिद्र उघडून त्यातून कॉफी आणि दीड पौंड ब्रेड त्यानी आत सरकवला. आता शिक्षा झालेली असल्यामुळे मला बाहेरच्या हॉटेलमधून कुठलाही जिन्नस मागवता येत नव्हता. फक्त तियल्या छोटचा कॅंटीनमधून काही प्रमाणात अन्न आणि सिगारेट्स विकत घ्यायची परवानगी होती– तेही तुमची ऐपत असेल तर. ही कस्टडी म्हणजे जन्मठेपेकडे रवाना होण्यापूर्वीची पायरी होती. तुरुंगातील भत्त्याच्या पैशातून मी सिगारेट्स्ची दोन पाकिटं विकत घेतली. त्यातल्या एकीचा मनमुराद आस्वाद घेतला.

## पुढील योजनेची तयारी

देगानं माझ्या ब्रेडमधून एक चिठ्ठी पाठवली. त्यात तुरुगाच्या आवारातील एका विशिष्ट खोलीत भेट घेण्याविषयी सागितलं होतं. त्या खोलीत कृमिकीटक नष्ट करण्याची सोय होती. 'काडचापेटीत तीन जळू आहेत.' मी काडचा बाजूला सारून पाहिले तर खरोखरच चागल्या मोठचा जळवा मला दिसल्या. त्याचा अर्थ माझ्या लगेच लक्षात आला. मी त्या वॉर्डरला दाखवल्या म्हणजे आता तो दुसऱ्या दिवशी मला आणि माझ्या सर्व चीज वस्तूंना वाफेच्या त्या खोलीत रवाना करणार. तिथे सर्व बाडगुळे किंवा लहानसहान प्राणी मारण्यात येतात– अर्थात आम्ही सोडून. आम्ही जगलच पाहिजे. आणि दुसऱ्या दिवशी अपेक्षेप्रमाणे माझी व देगाची भेट झाली. त्या खोलीत सुदैवाने एकही वॉर्डर नव्हता. फक्त आम्ही दोघेच होतो.

'तू खरंच चागला माणूस आहेस, देगा. मला माझी पैशाची डबी मिळाली, आभार.'

'तिच्यामुळे तुला त्रास तर होत नाही ना?'

'अजीबात नाही.'

'सडास उरकल्यावर ती पुन्हा आत सरकवताना नीट धूत जा.'

'होय. मला वाटत ती पाण्यापासून सरक्षित असावी. आत घडचा घातलेल्या नोटा व्यवस्थित आहेत.'

'म्हणजे एकंदरीत सर्व ठीक आहे तर!'

'तुझा पुढचा विचार काय आहे देगा?'

'मी वेड लागल्याच नाटक करणार आहे. मला गियानाला अजीबात जायच नाही. मी इथे फ्रान्समध्ये आठ-दहा वर्षं शिक्षा सहज भोगू शकेन. माझ्या काही ओळखी आहेत. त्यामुळे निदान पाच वर्षांची शिक्षा तरी माफ होईल.'

'तुझं वय काय आहे?'

'बेचाळीस.'

'मग तू मूर्खपणा करणार आहेस. जर तू दहा वर्षं इथे घालवशील, तर बाहेर पडेपर्यंत म्हातारा होशील. जन्मठेपेची तुला भीती वाटते का?'

'होय, हे तुझ्यापाशी कबूल करताना मला अजीबात लाज वाटत नाही, पॅपिलॉन; पण मला खरंच भीती वाटते आहे. फ्रेंच गियाना भयानक आहे. तिथे मृत्यूचं प्रमाण ऐशी टक्के आहे. जर तुम्हाला महारोग झालाच नाही, तर पिवळा ताप येईल, किंवा ज्याच्यात सुधारणा होणे सर्वस्वी अशक्य अशा प्रकारची हगवण लागेल. नाहीतर मलेरिया आहेच. त्यातून बचावलात आणि सुटका करून घेतलीच तर तुमच्या जवळील पैशासाठी खून होण्याची शक्यता. सुटकेच्या प्रयत्नात ठार होण्याचा धोका आहे तो निराळाच. माझ्यावर विश्वास ठेव, पॅपिलॉन, मी तुला निराश करण्याचा प्रयत्न करीत नाही तर पाच-सात वर्षे शिक्षा भोगून तिथून परत आलेले माझ्या माहितीचे लोक आहेत, त्याच्या प्रत्यक्ष अनुभवावरून हे सागत आहे. ते जवळजवळ मृत्युपथाला लागलेले आहेत. वर्षातील नऊ महिने ते रुग्णालयात काढताना ते म्हणतात की सुटका करून घेणं म्हणजे लोकाना वाटत तितक सोप काम नाही.'

'माझा तुझ्यावर विश्वास आहे देगा. पण माझा माझ्यावरही पूर्ण विश्वास आहे. मी तिथें फार वेळ वाया घालवणार नाही याची तू नि:सशय खात्री बाळग. मी खलाशी आहे आणि समुद्र म्हणजे काय ते मला चागल माहीत आहे. मी जेव्हा म्हणतो आहे की लवकरच तिथून पळ काढायचा, तेव्हा त्यावर तू डोळे झाकून विश्वास ठेव, विसबून राहा. आणि तुझं-काय? तुला दहा वर्षे इथे काढण तरी शक्य आहे अस वाटत? जरी तुला पाच वर्षांची सूट मिळाली तेही आज नक्की नाहीच म्हणा–तरी एकाकीपणात तू खरोखरच वेडा होणार नाहीस कशावरून? आता माझ नीट ऐक. त्या खोलीत एकटच राहाणं, पुस्तक नाहीत, बाहेर जाणं नाही, कोणाशीही सभाषण नाही. असे दिवसाचे चोवीस तास काढायचे. प्रत्येक तासामध्ये साठ नाहीत तर सहाशे मिनिटे मोजावी लागतील. तरी अद्यापी सत्यापासून तू खूपच दूर आहेस.'

'ते काहीही असो. पण तू तरुण आहेस आणि मी आज आहे बेचाळीस.'

'ऐक देगा, मला सरळ सांग, अशी कोणती गोष्ट आहे ज्याची तुला इतकी भीती वाटते आहे? इतर गुन्हेगार, बरोबर ना?'

'खर सांगायच तर पर्या, त्याचीच मला सर्वांत धास्ती वाटते. प्रत्येकाला माहीत आहे की मी लक्षाधीश आहे. आणि माझा गळा कापणं ही त्यांना अगदी सोपी गोष्ट आहे. त्यांचा समज असा झालेला आहे की मी एक लाखापर्यंत माल बाळगून आहे.'

'ऐक. आपण एक करार करू या का? तू मला फक्त अस वचन द्यायच की कोणताही वेडेपणा करणार नाही, आणि मी सदैव तुझ्या पाठीशी राहाण्याचं अभिवचन देतो. मी सशक्त आहे आणि जलद हालचाल करू शकतो. मी लहान होतो तेव्हापासून मारामारी करायला शिकलो आहे, करीत आलो आहे. आणि चाकूवर माझी चागली हुकूमत आहे. जोपर्यंत इतर गुन्हेगारांचा प्रश्न आहे तोपर्यंत तू निश्चित राहा. आपला त्यांच्यामध्ये चांगला आदरसत्कार होईल. त्यापेक्षाही आपल्याला तेच घाबरतील असं म्हणण सयुक्तिक ठरेल. आणि सुटका करून घेताना आपल्याला दुसऱ्या कोणाचीही जरूरी नाही. तुझ्याजवळ रोकड आहे, माझ्याही जवळ आहे. होकायंत्राचा वापर कसा करायचा याच ज्ञान मला अवगत आहे, शिवाय मी बोट उत्तम चालवू शकतो. बोल, तुला आणखी काय हवंय?'

त्यानं माझ्याकडे डोळे फाडून पाहिलं, अगदी खोल डोळचात पाहिलं. आम्ही एकमेकांना आलिंगन दिलं.

......तो करार पक्का झाला.

काही क्षणानंतर देगा त्याच्या सर्व सामानासह खोलीबाहेर पडला आणि एका दिशेला निघून गेला, मी दुसऱ्या दिशेला. नतर आम्ही फार दूर राहिलो नाही. न्हाव्याकडे, डॉक्टरच्या खोलीत किंवा रविवारी ख्रिस्त मदिरात आमची वारवार भेट होत राहिली.

देगाला बनावट राष्ट्रीय कर्जरोख्यांच्या प्रकरणात पकडण्यात आल होतं. एका निष्णात बनावट कागदपत्र-तज्ज्ञानं आगळया पद्धतीन ते कर्जरोखे तयार केले होते. त्याने पाचशे फ्रँक्सच्या कर्जरोख्यावरील मजकूर नाहीसा करून त्यावर पुन्हा दहा हजार फ्रँक्स् रकमेचा रोखा वाटावा अशी छपाई करून घेतली. कागद तोच असल्याने बँका व व्यापाऱ्यांनी ते तसेच स्वीकारावेत यात त्यांची चूक नव्हती. हा प्रकार वर्षानुवर्षे सुरळीतपणे चालू राहिला आणि सरकारची आर्थिक घडी पार विस्कटली. शेवटी सरकारला कसून तपास केल्यावर ब्राऊलेट नावाच्या इसमाला पुराव्यानिशी पकडण्यात यश आल.

त्यावेळी मार्सेलिसमधील आपल्या मालकीच्या बारमध्ये लुईस देगा शांतपणे बसून सर्वत्र लक्ष देत होता. दक्षिण भागातील गुन्हेगार जगतातल्या अट्टल बदमाशांचा तो भेटण्याचा अड्डा होता—आतरराष्ट्रीय सकेतस्थान. ही गोष्ट १९२९ मधील होती आणि तोपर्यंत देगा लक्षाधीश बनला होता. अशाच एका रात्री एक सुदर, तरुण आणि नीटनेटका पोशाख केलेली युवती तिथे दाखल झाली. तिने देगाला भेटण्याची इच्छा व्यक्त केली.

'मीच तो; आपलं माझ्याकडे काय काम आहे बाईसाहेब? आपण पलीकडच्या खोलीत निवात बसू या.'

'हे पहा, मी ब्राऊलेटची पत्नी आहे. तुम्हाला माहीतच आहे की माझा नवरा बनावट कागदपत्रांच्या आरोपावरून सध्या अटकेत आहे. मी त्याची पॅरिसच्या तुरुगात भेट घेतली. त्यान मला तुमचा पत्ता दिला आणि वकिलाची फी भागवण्यासाठी तुमच्याकडे वीस फ्रँक्सची मागणी केली आहे.'

या स्त्रीला आपल्या धद्याविषयी बरीच माहिती आहे हे ओळखल्यावर, देगासारख्या मान्यवर बुद्धिमान व्यक्तीच्या हातून घडू नये जशी घोडचूक झाली. तो तिला म्हणाला, 'बाईसाहेब, नीट ऐका. मी तुमच्या नवऱ्याला अजीबात ओळखीत नाही त्यामुळे पैसे वगैरे देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. आणि जर तुम्हाला खरोखरच पैशाची आवश्यकता वाटत असेल तर बेलाशक रस्त्यात उभ्या राहा. तुम्ही तरुण आणि सुदर आहात, त्यामुळे गरजेपेक्षा तुम्ही नक्कीच जास्त कमाई कराल.' सतापाने बेभान होऊन अश्रू आवरीत ती स्त्री बाहेर पडली.

तिच्या नवऱ्याला हे समजल्यावर तो जणू वेडाच बनला आणि दुसऱ्या दिवशी, चौकशी करणाऱ्या न्यायाधीशाला त्यान जे जे काही त्याला ठाऊक होत ते ते घडाघडा सागून टाकल. बनावट कागदपत्राचे मागे देगा प्रमुख आहे हे त्यांना अशा प्रकारे कळले. एकाच् वेळी ठिकठिकाणी धाडी घालून देगा आणि त्याच्या सहकाऱ्याना लवकरच अटक झाली. त्याच्यावर रीतसर खटला भरण्यात आला. खटला चौदा दिवस चालू होता. प्रत्येक आरोपीच्या बचावासाठी सुप्रसिद्ध वकील झगडत होते. ब्राऊलेटन आपल्या जबानीतील एक शब्दही मागे घेतला नाही. आणि या महामूर्ख देगाला केवळ वीस हजार फ्रँक्स् वाचविण्याच्या खटाटोपात पधरा वर्षांची सक्तमजुरी मिळाली. तो एकदम दहा वर्षांनी म्हातारा झाल्यासारखा दिसू लागला आणि मनातून पार खचला.

आणि याच देगाबरोबर मी एक करार केला होता—जीवन व मृत्यूचा करार!

माझे वकील श्री. हयूबर्ट मला भेटावयास आले. स्वत:च्या कामगिरीवर ते नाखुष होते. पण मी त्याबद्दल अवाक्षरही काढल नाही.

एक, दोन, तीन, चार, पाच, अबाउट टर्न......एक, दोन, तीन, चार, पाच अबाउट टर्न. कित्येक तास झाले असतील, मी कोठडीच्या दरवाजापासून खिडकीपर्यंत येरझारा घालीत होतो. धूम्रपान करीत होतो. मला वाटल की, माझा स्वत:वर पूर्ण ताबा आहे, शरीर स्थिर आहे आणि वाटेल त्या परिस्थितीला तोंड देण्याची आपली तयारी आहे. कोणाचाही बदला घेण्याविषयी तूर्त विचार न करण्याच मी ठरवल. त्या सरकारी वकिलाला खोल तळघरात साखळदडान डाबलेल्या अवस्थेत तसच सोडाव झाल! त्याच नक्की काय करायच हे अजून ठरलेल नाही.

अचानक एक अस्फुट आवाजातील किंचाळी दारातून ऐकू आली. हा काय प्रकार आहे? आवाज तर माणसाचा आहे. वेदनेनं ओरडल्यासारखा काहीच कळायला मार्ग नव्हता. रात्रीच्या त्या किंचाळीनं माझ्या पोटात गलवलल. एवढया जाड दारातून ती माझ्यापर्यंत पोचली म्हणजे किती जोरात असेल! कदाचित एखादा


**गोवा :**

ऊन आणि सावल्याची
सागर आणि वाळूची
हिरण्यागार भूमीची
रसरशीत माणसाची
एक भावकविता.

**गोवा :**

आरोग्य आणि जोम
विश्रांती आणि सुख
परत मिळवून देण्याचे
आश्वासन.

**गोवा :**

पूर्व आणि पश्चिम
दोन्हीचा वारसा सागणारी
सस्कृती.

**गोवा :**

एक आमत्रण
निनादणारे
सर्वत्र—दूरवर
आपण हे कसे नाकारु शकाल?

गोव्यातील कुठल्याही प्रकारच्या पर्यटनविषयक
माहितीसाठी सपर्क साधा.—

**टुरिस्ट ब्युरो,**
ज्युडिशियल कमिशनरच्या कोर्टासमोर,
पणजी—गोवा.
दूरध्वनी क्रमाक.—(१) २२२८. (२) २६७३.

**माहिती आणि पर्यटन खाते,**
गोवा, दमण व दीव सरकारतर्फे प्रकाशित.



**त्यानं प्रार्थना सुरू करताच माझ्या डोळ्यातून अश्रू ओघळू लागले.**

वेडा असावा. अशा ठिकाणी वेड लागणं असंभवनीय नाही. मी माझ्याशीच मोठ्याने बोलू लागलो. मी स्वतःला म्हणालो, तुला त्याची काय जरूर आहे ? तू तुझं मन फक्त ताळ्यावर ठेव, फक्त तू आणि तुझा नवा साथीदार देगा यांचीच चिंता कर. मी खाली वाकलो, पुन्हा सरळ उभा राहिलो आणि छातीवर जोरदार दणका मारून घेतला. मार खरोखरच जोरात बसला. म्हणजे सर्व काही ठीक आहे तर—माझ्या बाहूंचे स्नायू उत्तम काम देत आहेत. आणि तुझ्या पायांचं काय ? तू त्यांचं वास्तविक अभिनंदनच करायला हवंस. कारण रोज जवळजवळ सोळा तास एकसारखं चालूनही ते अजिबात थकलेले नाहीत.

चिनी लोकांनी कैदेत तुमच्या डोक्यावर पाण्याचे थेंब सोडण्याचा शोध लावला. फ्रेंचांनी एकांतवास शोधून काढला. तुमच्या मनात घर करतील अशा सर्व गोष्टी त्यांनी तुमच्यापासून दूर ठेवल्या. पुस्तकं, वर्तमानपत्रं, कागद, पेन्सिल काही नाही. फक्त जाड गजांच्या बंदिस्त खिडक्या आणि बारीक छिद्रातून झिरपणारा अगदी अंधुक प्रकाश.

त्या किंचाळीमुळे माझा थरकाप उडाला आणि पिंजऱ्यामधील एखाद्या हिंस्र जनावराप्रमाणे मी हालचाल करू लागलो. माझा असा भयानक समज झाला की, मला फक्त एकट्यालाच टाकून सर्वजण निघून गेले आहेत आणि मला अक्षरशः जिवंत पुरलेलं आहे. मी एकटा होतो--अगदी एकटा. माझ्यापर्यंत पोचणारी गोष्ट फक्त एकच—ती मघाचीच किंचाळी !

तेवढ्यात दार उघडलं. एक वयस्कर धर्मोपदेशक आत आला. म्हणजे तू अगदीच एकटा नाहीस. तुझ्यासमोर आणखी एक माणूससुद्धा उभा आहे.

'शुभ प्रभात, मुला. मी यापूर्वीच येऊ न शकल्याबद्दल मला माफ कर, पण मी काही दिवस सुटीवर होतो. तुझं कसं काय चाललं आहे ?' असं म्हणून शांतपणे चालत तो माझ्याजवळ येऊन बसला.

'तू कुठला आहेस ?'

'आर्डिकचा.'

'आणि तुझे नातलग ?'

'मी अकरा वर्षांचा असताना आई गेली. माझे वडील माझ्याशी फार चांगले वागत असत.'

'ते काय करीत होते ?'

'शाळा-शिक्षक.'

'अजून ते जिवंत आहेत ?'

'होय.'

'ते अद्यापी जिवंत असूनही त्यांच्याविषयी तू भूतकाळात का बोललास ?'

'कारण ते जरी जिवंत असले तरी मी मात्र मृत झालेला आहे.'

'अरे, हे काय बोलतोस ! तू काय केलंस म्हणून इथं आलास?'

क्षणार्धात मनात आलं की, मी निर्दोष आहे असं सांगितलं तर कितपत योग्य ठरेल. मी उत्तरलो, 'पोलीस म्हणतात की मी खून केला आहे आणि ते असं म्हणतात त्या अर्थी ती गोष्ट खरीच असणार.'

'तो काय व्यापारी होता ?'

'नाही. एक गुन्हेगारच होता.'

'आणि त्यांनी तुला तुमच्या गुन्हेगार जगातच घडलेल्या एका घटनेवरून जन्मठेप दिली ? माझा विश्वास बसत नाही. तो खून होता का ?'

'नाही, अजाणता झालेला मनुष्यवध.'

'दुर्दैवी मुला, हे सारं अगदी विश्वास ठेवता न येण्यासारखं आहे. मी तुझ्यासाठी काय करू ? माझ्याबरोबर प्रार्थना करायला तुला आवडेल ?'

'मला कोणतेही धार्मिक पाठ मिळालेले नाहीत. प्रार्थना कशी करतात हेसुद्धा मला अजीबात माहीत नाही.'

'त्यामुळे काहीच बिघडत नाही. मी तुझ्यासाठी प्रार्थना करीन. परमेश्वराला त्याची सर्व मुले सारखीच प्रिय असतात, मग त्यांना दीक्षा मिळालेली असो किंवा नसो. मी म्हणतो तसंच तूही मागोमाग म्हण हं.'

त्याचे डोळे इतके दयार्द्र होते आणि त्याचा चेहराही इतका कनवाळू होता की, मला नकार देणं अशक्य होतं. तो गुडघ्यावर बसताच मीही तसंच केलं. त्यानं प्रार्थना सुरू केल्यावर माझ्या डोळ्यातून अश्रू ओघळू लागले. त्या मोठ्या मनाच्या पाद्र्याच्या लक्षात ते येताच त्यानं माझ्या गालावर ओघळणारा एक मोठा अश्रू आपल्या गोंडस बोटांवर गोळा केला; तो त्यानं तोंडात सोडला आणि पिऊन टाकला.

'मुला,' तो उद्गारला, 'हे देवानं आज मला पाठविलेलं सर्वात मोठं पारितोषिक आहे आणि तेही तुझ्याद्वारा माझ्यापर्यंत पोहोचतं झालं आहे. मनःपूर्वक आभार.' आणि उभं राहून त्यानं माझ्या कपाळाचं चुंबन घेतलं.

आम्ही परत बिछान्यावर एकमेकांशेजारी बसलो. 'आज किती दिवसांनी तुझ्या डोळ्यात पाणी आलं ?' त्यानं विचारलं.

'चौदा वर्षांनंतर.'

'त्यावेळी कशामुळे वरं आलं होतं ?'

'त्या दिवशी माझी आई हे जग सोडून निघून गेली.'

त्यान माझा हात आपल्या हातात घेतला आणि म्हणाला, 'हे बघ, ज्यांच्यामुळे आज तुला हे दुःख भोगाव लागतय त्याना आता क्षमा कर.'

मी त्याचा हात हिसडला आणि कोठडीच्या मध्यावर जाऊन उभा राहिलो– एक स्वाभाविक प्रतिक्रिया. 'ते कदापी शक्य नाही, मी त्यांना कधीही माफ करणार नाही. आणि मी तुम्हाला एक सांगून ठेवतो, तेही नीट ऐका. फादर, असा एकही दिवस नाही किंवा रात्र, जेव्हा मी त्यांना ठार करण्याची योजना तयार करत नसेन; ज्यानी मला इथे रवाना केल आहे– केव्हा, कस आणि कशान ?'

'तुझा संताप समजण्याजोगा आहे. तू तरुण आहेस. अगदी जवान. तू जसजसा मोठा होशील, तशी तुझी सूडाची भावना नष्ट होत जाईल.' आज त्या गोष्टीला चौतीस वर्षे झाली आहेत, आणि मी त्याच्या मताशी पूर्ण सहमत आहे.

'मग मी तुझ्यासाठी काय करू ?' त्यानं पुन्हा विचारलं.

'एक गुन्हा, फादर.'

'कसला गुन्हा ?'

'सदतीस क्रमांकाच्या कोठडीत जाऊन तिथे असलेल्या देगाला कृपया अस सागा की आपल्या वकिलाच्या मदतीने 'सीन' येथील मध्यवर्ती तुरुंगात रवाना होण्याची खटपट कर– त्याला सांगा की आज मी तीच गोष्ट केलेली आहे. सध्याच्या कस्टडीतून आपल्याला ताबडतोब बाहेर पडून एखाद्या मूख्य तुरुगात जाण जरूरीच आहे, जिथून 'गियाना 'ला रवाना केलं जातं. त्याचं कारण असं आहे की जर आपली पहिली बोट हुकली तर दुसरी मिळेपर्यंत सुमारे दोन वर्षं, आपल्याला इथेच एकातवासात रखडावी लागतील. आणि फादर तुम्ही त्याला हे सर्व सांगितल्यावर मला परत येऊन भेटू शकाल ?'

'मला त्यासाठी काय कारण सागता येईल ?'

'तुमचा एक ग्रंथ विसरला असं सागता येईल. मी उत्तरासाठी वाट पाहतो.'

'पण तू तसल्या भयानक ठिकाणी जन्मठेप भोगण्यासाठी जायची इतकी घाई का करतो आहेस ?'

मी त्याच्याकडे निरखून पाहिलं. हा सुस्वभावी सच्च्या दिलाचा माणूस आपल्याला केव्हाही दगा देणार नाही. 'जास्तीत जास्त लवकर तिथून पळ काढण्यासाठी, फादर.

'ईश्वर तुला साह्य करील, मुला, मला ह्याची पूर्ण खात्री आहे; आणि मला वाटत की तुझ नव जीवन पुन्हा सुरू होईल. मला तुझ्या डोळ्यात स्वच्छ दिसतंय की तू शुद्ध अंतःकरणाचा आहेस, आणि तुझ हृदय पूर्णपणे आपल्या जागेवर आहे. मी तुझ्यासाठी ३७ क्रमाकाच्या खोलीत जातो. तू उत्तरासाठी माझी वाट पाहा.'

तो लवकरच परत आला. देगान मान्यता कळविली होती. फादरनं त्याच उपदेशपाठाच पुस्तक दुसऱ्या दिवसापर्यंत माझ्याजवळ ठेवले होत.

या प्रसगामुळे माझ्या जीवनात स्वच्छ प्रकाश पडला. माझी कोठडी त्या दयाळू माणसामुळे उजळून निघाली–प्रकाशात न्हाऊन निघाली. जर ईश्वर अस्तित्वात असेलच तर तो जगात अशी भिन्न भिन्न स्वभावाची माणस का बरं निर्माण करतो ? त्या सत्त्वशील चागल्या माणसाच्या एका भेटीमुळे मी उत्साहित झालो, ताजातवाना झालो; आणि त्याचा खरोखरच उपयोग झाला. आमची विनती लगेच मंजूर झाली. सुमारे आठवड्यानतर एका पहाटे चार वाजता कस्टडीच्या बाहेरील व्हराड्यात आमच्यातील सातजणांना ओळीत उभे केले. सर्व पहारेकरी तिथे उपस्थित होते.

'कपडे काढा.' आज्ञा मिळाली. प्रत्येकाने हळूहळू आपले कपडे काढले. थंडी मी म्हणत होती. मला हुडहुडी भरली.

'तुमच्या सर्व वस्तू समोर टाका. मागे वळा. एक पाऊल मागे.' आणि आमच्यासमोर कपड्याचा ढीग पडला.

'आपापले कपडे घाला.' काही क्षणापूर्वी मी घालत असलेला तागाचा उत्तम शर्ट टाकून रग विटलेला कॅनव्हसचा कपडा घालावा लागला आणि चागल्या सुटाची जागा जाडघाभरड्या जाकिट–विजारीने घेतली. बूट जाऊन त्या जागी लाकडी खडावा आल्या. यावेळी मी इतर सामान्य लोकाप्रमाणे दिसू लागलो होतो. इतर सहा जणाकडे मी नजर टाकली–अरे देवा, केवढा मोठा धक्का ! स्वतत्र व्यक्तिमत्त्व शिल्लकच राहिल नव्हत. त्यानी दोन मिनिटांच्या आत आम्हाला समान कैदी बनवल.

'उजव्या बाजूने पुढे चला.' वीस वॉर्डसच्या ताफ्यासह आम्ही बाहेर मोकळ्या जागेत आलो, एका मागोमाग एक, अरुद अशा कपाटवजा गाडीत बसलो. गाडी 'ब्यूलियू' कडे निघाली. 'सीन' मधील तुरुगाच ते नाव होत.

[ क्रमशः ]

---

'पॅपिलॉन, उद्या ते आपल्या सुंदर फ्रान्सपासून आपल्याला तोडून फार दूर घेऊन जाणार आहेत.'
'आपल्या सुंदर देशाजवळ काही फारशी चांगली न्यायदान पद्धती नाही, देगा. कदाचित आपण अशा एखाद्या देशाला जाऊ, की जो देश विशेष सुंदर नसेलही, पण तिथे लोकांना माणुसकीने वागवण्याची रीत असेल.'

**पॅपिलॉनच्या बंडखोरीला सुरुवात आणि त्याचे फ्रेंच गियानाकडे प्रयाण.**

## माणूस पुढील अंकी

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### २५-१-७५ ते ३१-१-७५

**बिहारच्या राजकारणाला नवी कलाटणी**

सबंध देशभरच या वेळी जयप्रकाश नारायण यांचा दक्षिण भारत दौरा फार कलाटणी देणारा ठरणार आहे. महाराष्ट्र, आंध्र वा गुजराथ इथे चांगलेच सादपडसाद उठतील. पण त्याहीपेक्षा ते बिहारच्या राजकारणाला कलाटणी देतील. पतप्रधान इंदिरा गांधी याना यावेळी माघारीचे राजकारण करावे लागेल. मंत्रिमंडळातील त्यांचे ज्येष्ठ सहकारी त्यांना 'थोडेफार' सुनावण्याइतके धीट बनतील. महाराष्ट्रात अतर्गत मतभेदाना मोकळी वाट मिळेल परराष्ट्र मंत्री श्री. यशवतराव चव्हाण लोकांची अनुकूल मते स्वत:कडे खेचून घेतील. मुंबई विरुद्ध महाराष्ट्र काँग्रेस असे वादळ निर्माण होऊन ते शमेल. ब्रह्मानंद रेड्डीच्या गृहखात्याला बदलाची चाहूल लागेल. नैसर्गिक आपत्तीचा धोका.

**मेष : आशादायक स्थिती**

विचार शक्तीचे नियंत्रण करणारा गुरू आता लवकरच बारावा होणार आहे. त्या वेळी आपणास बरीच सावधगिरी बाळगावी लागेल. पण या वेळी दहावा रवी व भाग्यस्थानी मंगळ ही इतकी उत्कृष्ट ग्रहपरिस्थिती जुळून आली आहे की अनेक क्षेत्रात उभे राहिलेले अडचणीचे डोंगर आता दूर होऊ लागणार आहे. इच्छा आकांक्षा सफल होऊ लागणार आहेत. बुधवार ते शुक्रवार नोकरीत महत्त्वाच्या घटना घडणार आहेत. अधिकारावरील मोठ्या व्यक्तीची मर्जी संपादन होईल. विवाहाचा प्रश्न सुटेल. खत व्यापारी व प्लॅस्टिक सामानाचे दलाल चार पैसे मिळवू शकतील. आर्थिक स्थिती सुधारेल एखादा प्लॉट खरेदी करू शकाल. महिलाना मनासारखे कापडचोपड मिळेल. नोकरीत बढती. शुभांक २-४-८

**वृषभ : आनंद लाभेल**

रवी नववा व मंगळ आठवा अशा अद्वितीय ग्रहाची सध्या तुम्हाला मदत होत आहे गुरू दहावा आहे तो लवकरच लाभस्थान भूषवील. मग मात्र आर्थिक समृद्धीची तुमची इच्छा आकाराला येणार आहे सध्या तुम्हाला दूरचा प्रवास घडण्याची शक्यता आहे. रविवार ते बुधवार नोद ठेवा. एखाद्या राजकारणी नेत्याच्या कृपाप्रसादाने हे घडू शकेल. सासुरवाडीकडून काही पैसा मदत म्हणून मिळेल. नोकरी व्यवसाय-अडचणीतून बाहेर पडेल. नोकरीत बढती बदलीचा योग आहे. धंद्यात-प्रामुख्याने-कापड व्यापार नफा मिळवून देईल. विद्यार्थ्यांनी अभ्यासात परिश्रम करायला हवेत. विवाहेच्छु तरुणानी जास्त ताणून धरू नये. महिलानी-विशेष करून पदवीधर महिलानी वरिष्ठ पदाच्या नोकरीसाठी प्रयत्न करावेत. शुभांक ५-६-११

**मिथुन : प्रगतीकडे वाटचाल**

हा आठवडा अनेक दृष्टीने महत्त्वाचा ठरणार आहे. अंतरिक्षातील सामर्थ्यवान ग्रहाचे बळ तुमच्या पाठीशी उभे आहे. रवी-शनीचा षडाष्टक योग वैचारिक व व्यावसायिक जीवनात काही वादळे निर्माण करील. व्यवसायात नसत्या कटकटी निर्माण होऊ शकतील. पण अखेरीस तुमच्या मनाप्रमाणे घडून त्या वादळाचा शेवट गोड होईल. नोकरीत वरिष्ठाचे अगर मालकाचे मन कलुषित होण्याची, त्याच्या मनात संशय निर्माण होण्याची शक्यता आहे. पण हा प्रसंग तात्पुरता असेल. कोणत्याही क्षेत्रात या राशीच्या लोकाना कर्तृत्वाची संधी मिळणार आहे. लेखकाना सरकारी सन्मान अगर पुरस्कार मिळेल. संसारात भांडणे टाळा. नवविवाहितानी जास्त काळजी घ्यावी. विवाहेच्छूचे विवाह ठरतील. महिलाना स्वतंत्र उद्योगात मदत मिळेल. नोकरीसाठी प्रयत्न हवेत. शुभांक ३-७-१०

**कर्क : महत्त्व वाढेल**

बाराव्या शनीची उग्रता आता बरीच कमी झाली आहे. या आठवड्यात सहावा मंगळ तुमच्या शत्रूची दाणादाण उडवून देणार आहे ज्या ज्या लोकांनी आजवर तुमच्याविरुद्ध कारवाया केल्या. तुम्हाला दगा देण्याचा प्रयत्न केला. त्यांना आता तुम्ही चांगलाच धडा शिकवू शकाल. तुमचा अनेकांना हेवा वाटावा असे सार्वजनिक व राजकीय क्षेत्रात तुमचे महत्त्व वाढणार आहे. राजकारणातील तुमची घसरगुंडी थांबणार असून वरिष्ठ पातळीवर तुमच्या कार्याचा गौरव होणार आहे. तुमची गरज निर्माण होणार आहे. नोकरी विषयक अनेक महत्त्वाची कामे, तुमची मागणी या आठवड्यात मार्गी लागणार आहे. दुय्यम व्यवसायाची सुरुवात करायला हरकत नाही. रविवार ते बुधवार महत्त्वाचे दिवस आहेत. महिलांच्या सेवा कार्याचा सरकारकडून गौरव होईल. शुभांक १, ३, ५.

**सिंह : नोकरीत वर्चस्व**

पाचवा मंगळ झाल्यापासूनच खरे म्हणजे तुमचे वर्चस्व वाढू लागले आहे. तुम्हाला पाण्यात पाहाणारे तुमचे हितशत्रू आता तुमची स्तुतिस्तोत्रे गाऊ लागले तर त्याचे श्रेय तुम्ही ग्रहांना द्या. ग्रहाचे पाठबळ असले की शत्रूसुद्धा मित्र बनतात. तसाच अनुभव यावेळी तुम्हाला येणार आहे. तुमच्या राजकीय वृत्तीला आवडेल असे क्षेत्र तुम्हाला मिळू शकेल. उच्चपदस्थ अशा व्यक्तीबरोबर तुम्हाला मोठेपणा मिळू शकेल नोकरीत महत्त्वाच्या वरिष्ठ जागी तुमची खास नियुक्ती होण्याची बरीच शक्यता आहे. व्यापार व कारखानदारीचा उद्योग प्रगतीकडे झुकेल. सोमवार ते गुरुवार आर्थिक वृद्धीचा योग. महिलाना नोकरीत प्रमोशन व बदली. शुभांक ४-७-११.

**कन्या : नोकरीत अनुकूलता**

मकरस्थ रवी तुमच्या जीवनात काही महत्त्वाच्या गोष्टी-घटना घडवणार आहे. त्याचबरोबर चौथा मंगळ मनात साशकता निर्माण करील. मनस्वास्थ्य बिघडवून टाकील. घरात तंटेबखेडे निर्माण होऊ शकतील. भाऊबंदकीमुळे त्रास होईल. पण हे सारे अगदीच तात्पुरते घडेल. पाचवा रवी तुमची शान वाढवणार आहे. नोकरीत तुमच्याविषयी वरिष्ठांच्या मनात ओलावा निर्माण होऊ लागेल. चालू कामात थोडा त्रास वाढेल. पण तो जाणवणार नाही. यावेळी एकूण व्यवसायातदेखील कामाचा व्याप वाढणार आहे. मानसिक स्वास्थ्य मिळवण्यासाठी कुलदेवतेची उपासना करा. दर्जा व प्रतिष्ठा

वाढेल, मानमान्यता मिळेल. अशाप्रकारची कामगिरी तुमच्याकडून या आठवडयात होणार आहे. महिलांना कायम नोकरी मिळेल. शुभांक १–५–६,

**तूळ** : जागेची समस्या

तुम्हाला गुरूचे उत्तम पाठबळ आहे व हर्शल गुरुचा उत्साह निर्माण करणारा त्रिकोण योग तुमच्या सध्याच्या कुंडलीत आहे. तुम्ही अकारण चिंता करीत आहात किंवा मन साशंक बनले आहे हे सारे मनातून काढून टाका. कुणीही तुमचे स्थान हिरावून घेऊ शकत नाही. नोकरी धंदा प्रगतीचा विशेष टप्पा गाठणार असून पैसा मिळवून देणाऱ्या योजना अनपेक्षितरीत्या प्रत्यक्षात येण्याची शक्यता आहे. धंद्यात यश मिळणार आहे. नोकरीत आजवर सफल न झालेले महत्त्वाचे काम आकाराला येणार असून तुमच्या व्यावसायिक जीवनाला कलाटणी मिळणार आहे. तुम्ही लेखक असाल तर सोमवार, गुरुवार व शुक्रवार अनुकूल घडवणारे आहेत. महिलांना या आठवडयात नव्या उपयुक्त वस्तूंची भेट मिळेल. शुभांक ३–४–७.

**वृश्चिक** : धनस्थिती सुधारेल

राशीस्वामी जेव्हा पैशाच्या प्राप्ती-स्थानाचा वा पैसा मिळण्याच्या योजना-कार्याचा ताबा घेतो तेव्हा तो तुमच्या आर्थिक परिस्थितीला मूलभूत अशी कलाटणी देत असतो. या आठवडयात मंगळ तेच करणार आहे. रेस, लॉटरी वा अशाच प्रकाराने तुमची ददात मिटवणार आहे. प्रामुख्याने बुधवार ते शुक्रवार या दरम्यान व्यावसायिक क्षेत्रात ज्या घटना घडतील त्या आगामी काळाचे अनुकूल चित्र तुमच्या समोर उभे करतील. नोकरीत या वेळी तुम्ही ' वरिष्ठ ' बनणार आहात. मालकांची एवढी मर्जी तुमच्यावर बसेल की तुम्ही म्हणाल ती पूर्वदिशा होईल. चालू धंद्यात भागीदार असेल तर ती भागीदारी सोडता येईल. जमिनीचा व्यवहार अवश्य करावा. लेखी करारमदार नकोत. महिलांना माहेरची प्रॉपर्टी मिळेल. शुभांक ७–१–११.

**धनू** : स्वभावात बदल

पहिला मंगळ व दुसरा रवी विशेष असे काही तरी घडवणार आहेत. नोकरीत तुम्हाला जी भीती वाटते अगर तुमच्या समोर जी अडचणीची परिस्थिती निर्माण झाली होती त्या परिस्थितीला सामर्थ्याने तोंड देण्याइतकी मनःस्थिती सुधारेल. आता तुम्ही मनात भीती बाळगू नका. तुमचे कुणीही काही करू शकत नाही. मध्यंतरी नोकरीबद्दल जी वादळे निर्माण झाली होती ती शमतील. तुमचे हेतू साध्य व्हायला अजून काही काळ वाट पहावी लागणार आहे. पण ती प्रक्रिया सुरू झाली आहे असे आता मानायला हरकत नाही. तुमच्या हाती जर महत्त्वाचे अधिकार असतील तर हाताखालच्या माणसांचे तुम्ही मन जिंकणे आवश्यक आहे. शनिवार ते बुधवार महत्त्वाचे दिवस. महिलांनी उर्मट बनू नये. सौजन्य यश देईल. शुभांक ६–७–१०.

**मकर** : स्वास्थ्याला हादरा

तुम्हाला रवी संरक्षण देत आहे. मंगळ बारावा आहे तो अनुकूल नाही. शनी-रवीचा षडाष्टक योग माणसाकडून विपरीत घडवतो. म्हणूनच तुम्ही मन ताब्यात ठेवावे. गुरूची उपासना करावी. नोकरीत एखाद्या उच्च पदावर जर तुम्ही असाल तर तुमची वृत्ती अत्यंत बेदरकार, स्वार्थी बनणार नाही याची काळजी घ्या. शत्रुत्व निर्माण करण्यासारखे वागणे तुम्ही अभिमानाचे समजत राहाल. व्यापारी वा दलाल असाल तर कायदा मोडण्याचा मोह तुम्हाला होईल. व्यसनाबद्दल व त्यासाठी पैसा उधळण्याबद्दल तुम्हाला कोणताच विधिनिषेध वाटणार नाही. रविवार, सोमवार व शुक्रवार या दिवशी फार काळजी घ्या. पैशाच्या नादी लागू नका. सामान्य माणसांनी आपली नोकरी सांभाळावी. महिलांनी व्यवसायात काळजी घ्यायला हवी. शुभांक १–५–८.

**कुंभ** : राजकीय यश

मध्यंतरी काही काळ तुमचे प्रगतीचे गाडे पार थांबल्यासारखे झाले होते. पण आता त्या परिस्थितीत बराच फरक पडणार आहे. गुरू लवकरच बदलणार आहे. तो तुमचे काही तरी भले करून जाणार आहे. सध्या रवी बारावा व्ययात असला तरी मंगळाचे भरपूर बळ तुम्हाला लाभलेले आहे. गुरू–हर्शलचा त्रिकोण योग महत्त्वाचा बदल घडवणार आहे. राजकारणात तुमचे महत्त्व वाढावे असा बदल होऊ शकेल. तुमच्या कार्याची दखल घेतली जाईल व तुम्हाला योग्यतेचे स्थान मिळेल. नोकरीत बढती प्रमोशन व बदली होईल. वेगळे काम मिळेल. स्वतंत्र धंदा मात्र तूर्त अनुकूल नाही. इंजिनियरिंग उद्योग थोडा फायदा करील. या राशीच्या वकिलांना ऑफिसरची नोकरी मिळेल. महिलांना नोकरीत अधिकारप्राप्ती. शुभांक ३–७–८.

**मीन** : लाभदायक कालखंड

मित्र हो बाराव्या गूरूची प्रतिकूल कारकीर्द आता इतिहासजमा होण्याच्या तयारीला लागली आहे. त्यांची चिन्हे याच आठवडयात दिसू लागतील. प्रामुख्याने पैसा मिळवून द्यायला इतका छान ग्रहयोग फार दिवसांनी येत आहे. तुमचा लॉटरीवर अगर रेसवर विश्वास असो वा नसो तुम्ही या वेळी या अकल्पित धनलाभाचा अवश्य फायदा घ्या. जन्माचे दारिद्र्य फिटून जाईल. स्वतःची गाडी घेऊ शकाल. नोकरीत साधी नोकरी बिनदिक्कत नाकारा. वरिष्ठ दर्जाची नोकरी चालत येणार आहे. व्यापाराच्या बाबतीत सहज जमून जाईल. सिल्क वा टेरिलीनच्या कापडाचा व्यापार करा. सोन्याचा धंदा यश देईल. लेखनात कीर्ती व मोठा मान मिळेल. आशा सफल होईल. महिलांना आर्थिक स्वास्थ्य लाभेल. शुभांक २–३–५. □


बॉंबे डाइंग
एकमेव वितरक
पराग
डेक्कन जिमखाना पुणे-४ लक्ष्मीरोड पुणे-३०
मिलच्या दरांत खरेदी करा !
मिलच्या दुकानांत खरेदी करा !!
सुपर ऑफर

चकनाचूर
भाऊ पाध्ये

# राजा शिवछत्रपती

**ऐतिहासिक मेळ्यांच्या जमान्यातील चित्र !**

अलीकडे आजच्या पिढीला इतिहासाचा महिमा समजाऊन देण्यासाठी भाराभर ऐतिहासिक नाटके निघत आहेत. त्यांच्याच जोडीला राजा शिवछत्रपती या चित्रपटाच्या रूपाने सिनेमा व्यवसायानेही हातभार लावला आहे, असे म्हणावयास काही हरकत नाही.

ऐतिहासिक नाटके मी पहात नाही. कारण, त्यामुळे माझा इतिहासाच्या महिमा चुकतो असे मी मानीत नाही. शालेय क्रमिक पुस्तके इतिहास विद्यार्थ्यांच्या डोक्यावर मारीत असतानाच शिवाय संयुक्त महाराष्ट्राच्या चवळीपासून राजकारणी मते जमवण्यासाठी तो लोकांच्या डोक्यावर मारू लागले आहेत. आता तर ते काम पैसे जमवण्यासाठी नाटकवाल्यांनी आपल्याकडे घेतले आहे. आणि राजा शिवछत्रपतीचे निर्माते किशोर मिस्किन आणि दिग्द. चंद्रवदन शहा यांनी ते आपल्याकडे ओढून घेऊन, त्यांनीही पैसा बरा केला आहे असे दिसते. अर्थात इतिहासाचा महिमा कुणाला कुठपर्यंत पटला ही गोष्ट आपल्याला ठाऊक नाही ! मला मात्र या ऐतिहासिक सिनेमा नाटकाच्या विषयी कायम शंका आहे. रेशनिंग आणि घ्यासलेटच्या लायनीत उभी हयात उभे रहाणाऱ्या, साजुक तुपावर पाणी सोडून वनस्पती तुपावर पोसलेल्या आपल्या पिढीला आपल्या ऐतिहासिक हीरोंचा आदर्श दाखवण्याचा हा खटाटोप फालतुच नाही काय ? आजच्या पिढीमध्ये त्यांचा हा मर्दानकी निर्माण करण्याचा खटाटोप पाहून मला ‘ धी ब्रिज ऑन धी रिव्हर क्वाय. ’ या चित्रामधील एका प्रसंगाची याद आली. सारे जग युद्धाने ग्रासले असताना रंगूनमध्ये जंगल पट्टीमध्ये जपान्यांनी पकडलेल्या युद्ध कैद्याचा अधिकारी गिनेस, युद्ध छावणीचा जपानी मुख्य सेसु हायाकावा याला एक चोपडे फडफडवीत म्हणतो ‘ तुम्ही आम्हाला जिनेव्हा कराराप्रमाणे वागवले पाहिजे. ’ तर गिनेसचे म्हणणे जितके हास्यास्पद तितकेच वनस्पती तूप खाणाऱ्यांनी अधिक प्रोटीन्स–युक्त अन्न मिळविण्याचा खटाटोप करण्याचा नाद सोडून ऐतिहासिक हिरोजच्या सूर्यमंडळावर झेप घेण्याचा प्रयत्न हास्यास्पद ! नतीजा ! आमचे अत्यंत हास्यास्पद ऐतिहासिक नाटक–सिनेमे. पूर्वी आमचे पोलिटिकल लोक आरशात स्वतःच्या प्रतिबिंबा ऐवजी शिवाजी महाराजांनाच साक्षात पहात. ( इतकी त्यांची नजर बिघडली होती ! ) तर आतांचे सिनेमा नाटकवाले, एखाद्या चिकण्या नाकेल्या हिरोला जिरेटोप, नाहीतर तुळतुळीत गोट्याचा टोप, मोत्यांच्या माळा, दाढी, नाहीतर सफाचट करून एखाद्या ऐतिहासिक वाड्याचा चकाचक सेट उभा करून त्यावर पुट्ठ्याचा हीरो करून उभा करतात. एकूण एकच ! म्हणजे ऐतिहासिक हिरोज विषयी आपले मन दयेनं ओथंबून जाते. वाटते. परमेश्वरा ! या शिवाजीसारखा पराक्रम आपल्या हातून न घडो. न जाणो, आपणही हीरो बनलो तर आपले वंशज आपल्या पराक्रमाचा असाच एक मेळा पेश करतील !

एकूण शिवाजी महाराजांचे सध्याचे भाष्यकार आपल्या भाषणातून शिवाजी महाराजांची महती काय सांगत असतील ती सोडा पण, राजा शिवछत्रपती मधील जिरेटोप, दाढी, मोत्यांच्या माळा सांभाळण्याची जोखीम अंगावर असल्यामुळे आक्रसलेल्या शिवाजीने अफझूलखानाच्या हातातून सुटून, त्याच्या पोटात वाघनखं खुपसण्याची जी चपळाई दाखवली असेल, किंवा औरंगजेबाच्या मिठाईच्या पेटाऱ्यातून फरारी होण्याइतकी जी मेंदूची तल्लखता दाखवली असेल ती नाटक–सिनेमातल्या शिवाजीकडे पहाता त्याच्या हातून होणे नाही असेच पटते. आमचा शिवाजी म्हणजे जिथे पहावं तिथे गादीवर मटकन जाऊन बसतो. जणु काही संगीत खुर्चीतील स्पर्धकाप्रमाणे त्याचा गादी हाच प्रॉब्लेम असावा. आणि पावन खिंडीमध्ये बाजीप्रभूला तलवारीचे फ्री-हँड-ड्रील करायला लावीत हा चक्क पालखीत बसून पळतो. त्या काळातल्या लढाया पण मोठ्या गंमतशीर वाटतात. चक्क म्युनिसिपालटीच्या शाळेतील मुलाच्या

फ्री-हँड-ड्रिलप्रमाणे तानाजी तलवारीचे हात करतो–त्याला ना दिशा; ना काही लक्ष्य ! म्हणजे लुटुपुटीचेच युद्ध. उदयभानूने तानाजीला मारलं की तानाजीने उदयभानुला मारले हे समजलंच नाही. कुणीतरी कुणाला मारलं. माझ्या आठ वर्षाच्या भाचीने तानाजीने उदयभानूला मारलं या आनंदात टाळ्या पिटल्या ! आणि शिवाजी महाराज आग्र्याहून पेटाऱ्यातून पळताना काय भलताच सस्पेन्स ! बाहेर पहारेकरी फिरताना दिसतात. पण एकदाही ते शिवाजी महाराज काय करताहेत, ते पहातसुद्धा नाहीत.

एकूण राजा शिवछत्रपती म्हणजे ऐतिहासिक गंमत होती. म्हणजे शिवाजी महाराज एका दृश्यात जणू काही पिकनिकला चालले आहेत, अशारीतीने पेश केले आहेत असं आमच्या पत्रकार मित्राने म्हटलं तेव्हा त्या मित्राला आपण मानलं.

' राजा शिवछत्रपती' ची पिकनिक संपली नी पत्रकारामध्ये चर्चा रंगली. ' शिवाजी महाराजावर सिनेमा काढणे सोपे काम नाही. त्यांच्या जीवनातील एक एक घटनेवर सिनेमा निघालाय. सिंहगड ! नेताजी पालकर. ' ' शिवाजी महाराजांच्या भूमिकेत शोभले ते शांताराम बापूच ! शिवाजी महाराजांच्या जीवनावर तेच का नाही एखादा सिनेमा काढीत ?' ' भालजी पर्वाच म्हणाले, आपल्या हातून अखेरचं काही तरी व्हायला हवं. भालजी काढणार म्हणजे शिवाजीवरच' ! वगैरे.

पण, मी ' राजा शिवछत्रपती 'च्या निर्मात्यांना दोष देत नाही. पर्वा महाराष्ट्रातील नवा ऐतिहासिक हीरो स्वामी माधवराव यांच्यावरील एका नाटकाला गेलो होतो. सारे नाटक म्हणजे डायलॉग्ज–डायलॉग्ज–डायलॉग्ज ! माधवरावांच्या काळीतील ऐतिहासिक मुत्सद्दी ते ! पण, टेनिसचा बॉल समोर येताच विजय अमृतराजला जितका सपाटयाने तो खेळावा लागतो, त्याप्रमाणे, एका डायलॉगला दुसऱ्या डायलॉगने उत्तर मिळत होते–उसंत नव्हती ! मुत्सद्दी विचार करीत नव्हते! सर्व सवालांना जबाब हाजीर होता ! आणि पब्लिक पहात होती आणि दाद देत होती. इथेही माधवराव आपल्या दयेचा विषय झाला. एवढा मोठा पेशवा. पण, सेटवरील आक्रसलेल्या शनिवार वाड्यामध्ये त्याच्या दरबारात एकूण माणसे तीन; राघोबा दादा, सखाराम बापू आणि नाना ! गेले कुठे सारे शिंदे–होळकर शिपाई–प्यादी वगैरे–' बादब–बा मुलाहिजा 'ची ललकारी द्यायला पण शनिवारवाड्यात माणूस नाही ! कसा असेल ? बिचारा माधवराव पुढे थेऊरला राजयक्ष्म्याने खोकून खोकून हैराण होतो– पण, त्याची सरबराई करायला एक चिटपाखरू असेल तर शपथ !


तर ते नाटकाचं सोडा. कारण रंगभूमीवर डायलॉग्जने ऐतिहासिक फिलिंग निर्माण करण्याची आपली जुनीच परंपरा आहे. प्रेक्षकही त्यासाठी तयार असतात. पण, सिनेमा दाखवताना प्रेक्षकांना चकवता येत नाही.

पर्वा दिलिपकुमारचा ' सगिना ' हा चित्रपट पहाताना त्या चित्रपट–घटनेचा काल मी ठरवीत होतो. काही केल्या मला तो काल नीट अजमावता येईना. त्यावेळी ' लोकसत्ते 'चे शरद गुर्जर म्हणाले, " ऐतिहासिक सिनेमे काढणे आपल्या सिनेमावाल्यांच्या बसकी बात नाही. त्यांनी अमीर–गरीब सारखे सिनेमे काढावेत. त्यात नाही का देव–आनंद आणि प्रेमनाथला मारामारी करताना अचानक भिंतीवर तलवारी मिळतात आणि त्यांची लढाई सुरू होते. आता ह्या तलवारी इथे आल्या कशा, देव आणि प्रेमनाथ तलवारीचे युद्ध शिकले कुठे, हे प्रश्न कुणी विचारतो का ?"

## सिनेमाची परिभाषा


राजेश खन्ना अँज ००७ याच्या सेटवरचा प्रसंग. सुप्रसिद्ध कला दिग्दर्शक महारुद्र शेट्टी यांनी अमेरिकन पाणबुडीचा भव्य सेट उभारलेला. या सेटचे वायरिंगचे काम एका सिनेमा व्यवसायाशी अनभिज्ञ असलेल्या परंतु कुशल इलेक्ट्रिशियनने केले होते. सुमारे चार दिवसाचे चित्रीकरण पूर्ण झाल्यावर सेटवरच्या सर्व कारागीर–कर्मचाऱ्यांबरोबर राजेश खन्ना यांची छायाचित्रे घेण्यात आली. त्यावेळी तो इलेक्ट्रिशियन नेमका गैरहजर होता. अंमळशाने तो सेटवर उपस्थित झाला. त्यावेळी कला दिग्दर्शक महारुद्र शेट्टी म्हणाले, ' अरे गृहस्था, तू होतास कुठे ? ' स्टिल्स 'साठी जो तो तुला पहात होता. ' तेव्हा इलेक्ट्रिशियन साहेब म्हणाले, ' अहो मला आधी तुमची रिक्वायरमेंट काय आहे, ते सांगायचं नाही ? लोहार चाळीमध्ये जाऊन हवे तितके ' स्टील ' आपण आणले असते. '

सेटवर एकदम हंशा. नंतर तो इलेक्ट्रिशियन छायाचित्रांनाच स्टिल म्हणतात हे समजल्यावर म्हणाला, ' च्यायला, या सिनेमावाल्यांची प्रत्येक गोष्टीत परिभाषाच वेगळी आहे !' ◻ ◻

# सर्व वस्तूंच्या किंमती भरमसाट वाढत आहेत

पण अेक अपवाद आहेच.



मनःशांती
अर्थात
आयुर्विमा.

**दररोज अवघ्या
एक कप चहाच्या किंमतीत (साधारण २५ पैसे)
आपण २५00 रूपयांचा
३0 वर्षांचा आयुर्विमा ❊
आपल्या मुलाबाळांच्या
सुखी भवितव्यासाठी
मिळवू शकता.**



❊ आज ... असल्यास

PRATIBHA 2317 IVI—MAR—1

योगक्षेमं वहाम्यहम्

**आयुर्विम्यामुळे मनःशांती अजूनही आपल्या आटोक्यात आहे**


राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**